ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४६ अंक २ पाने ७६ सप्टेंबर २०१८ मूल्य ३० रु.

विशेषांक




## रोजगार आणि स्वयंरोजगार



# उद्योगाच्या माध्यमातून सक्षमीकरण

केंद्र सरकारने रोजगार निर्मितीसाठी अनेक योजनांची सुरुवात केली आहे.
२१ व्या शतकातील गरजेनुसार मानव संसाधन निर्मितीसाठी कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे.
आजचा तरुण स्वावलंबी, रोजगारक्षम आणि रोजगार निर्मिती करणारा असावा.

*( १५ ऑगस्ट २०१७ रोजी पंतप्रधानांचे स्वातंत्र्यदिनी देशाला उद्देशून भाषण)*

आम्ही भारतातील तरुणांचे कौशल्य आणि क्षमतांवर सट्टा लावत आहोत.
'उद्योगाच्या माध्यमातून सक्षमीकरण' यावर आमचा विश्वास आहे. ज्यामुळे नावीन्यता आणि उद्योगासाठी योग्य व्यवस्था तयार होणार असून आपली भूमी मानवतेत परिवर्तन घडवून आणणाऱ्या पुढील मोठ्या संकल्पनांचे माहेर घर बनेल.

*(१६ डिसेंबर २०१७, मिझोरोम राज्यातील ट्युरिअल जलविद्युत प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यातील पंतप्रधानांचे भाषण)*

तरुणांसाठी नव्या संधी निर्माण करण्यात आल्या आहेत. कौशल्य विकास,नावीन्यता आणि उद्योजकतेच्या माध्यमातून आपले तरुण प्रत्येक क्षेत्रात अग्रस्थानी आहेत. आता ही योग्य वेळ आहे आपण भारतातील नवीन तरुणांसाठी ज्यावेळी ते १८ वर्षांचे होतील त्यावेळी त्यांना नवीन संधीची योग्य व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

*(मन की बात : ३१ डिसेंबर २०१७ )*

आपण कौशल्य विकासावर जोर देत पुढे जात आहोत.
तरुणांना शिक्षणासोबतच कौशल्य शिक्षण मिळावे यासाठी काळजी घेतली जात आहे.
स्कील इंडिया मिशनअंतर्गत लाखो तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

आम्ही आमच्या तरुणांना रोजगार देणारे बनवणार आहोत.
तसेच ते संशोधन आणि नावीन्यतेचा शोध घेणारे तरुण असतील.

*(राष्ट्रीय युवा दिन : १२ जानेवारी २०१८)*

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४६ ❖ ❖ अंक २ ❖ ❖ सप्टेंबर २०१८ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

### सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ सूक्ष्म उद्योग व रोजगार वाढीला उत्तेजन | राजीव कुमार | ५ |
| ■ रोजगार आकडेवारी बाबत नियोजित दृष्टिकोन | टी व्ही मोहनदास पै, यश बैद | १० |
| ■ भारतातील रोजगार : सुधारणारे चित्र | सुरजीत एस भल्ला | १७ |
| ■ नवप्रवर्तन व उद्यमशीलता- रोजगार निर्मितीची गुरूकिल्ली | अमिताभ कांत | २० |
| ■ भारतीय अर्थव्यवस्था: रोजगारसंधींची भरभराट | बिबेक देबरॉय | २५ |
| ■ शहरांमध्ये उपजिवीकेच्या संधी निर्माण करताना | दुर्गा शंकर मिश्रा | २९ |
| ■ गुणवत्तापूर्ण रोजगारवृध्दीचा प्रयत्न | एच. एल. समरीया | ३७ |
| ■ शिक्षण, रोजगार आणि रोजगारक्षमता | मनिष सबरवाल | ४३ |
| ■ लोकसंख्याशास्त्रीय फायद्याचा वापर | के. पी. कृष्णन | ४७ |
| ■ रोजगारविषयक विश्वसनीय माहिती- काळाची गरज | राजीव कुमार | ५५ |
| ■ सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांच्या खऱ्या क्षमतेची ओळख | अरुण कुमार पांडा | ६१ |
| ■ रस्ते विकास: अप्रत्यक्ष रोजगार संधी | युधवीर सिंह मलिक | ६७ |
| ■ बहु आयामी उपाययोजना धोरणाचा आराखडा | प्रवीण श्रीवास्तव | ७० |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# रोजगाराचे परिदृष्य

आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था अशी अभिमान वाटावी अशी भारताची ओळख निर्माण झालीय. तसेच आपला देश मानव संसाधनाची मोठी खाण आहे. विकसित देशांमध्ये वृद्धांची संख्या वाढत असताना २०२२ मध्ये जगातील सर्वाधिक तरुणांची संख्या भारतात असणार आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या तरुण असणार आहे. भारतातील तरुणांचा वर्ग बहुमूल्य असे मानव संसाधन आहे. आतापर्यंत सर्वच सरकारांचा प्राधान्यक्रम सृजनशील आणि प्रतिभावान तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देणे हाच आहे.

स्वातंत्र्यापूर्वी भारताची अर्थव्यवस्था कृषी आधारित होती आणि बहुतेक नागरिक शेती करत होते. त्यानंतर भारतात आधुनिकीकरण आणि उद्योगीकरणाने वेग घेतला. अगदी अलीकडेच स्वयंरोजगारावर जोर देण्यात आला आहे. उद्योजकता वाढीसाठी केंद्र सरकारकडून प्रोत्साहन आणि संधी देण्यात येत आहे. राष्ट्रीय युवक दिनानिमित्त भाषण करताना पंतप्रधान म्हणाले की, देशाला रोजगार मागणाऱ्या तरुणांपेक्षा रोजगार निर्मिती करणाऱ्या तरुणांची गरज आहे.

भारताची अर्थव्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण असून यात संघटित, असंघटित, कृषी, बिगर कृषी, कुशल आणि अकुशल घटकांचा एकाचवेळी समावेश आहे. या सर्व घटकांचा विकास करण्यासाठी समग्र दृष्टिकोनाची गरज आहे. तर दुसरीकडे अकुशल कामगारांना कुशल करुन असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटित क्षेत्रात समाविष्ट करणे गरजेच आहे. सध्या देशात कृषी क्षेत्रातून सर्वाधिक रोजगारनिर्मिती होते. गावामध्ये आणि लहान शहरांमध्ये लघु उद्योग,प्रक्रिया व्यवसाय, दुरुस्ती बांधकाम आणि इतर क्षेत्रातूनही ग्रामीण भागात मोठी रोजगारनिर्मिती होत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान,कृषी व्यवसाय केंद्र, कृषी क्लिनिक यासारख्या योजनांच्या पुढाकारामुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होत आहे.

सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगाला प्रोत्साहन दिल्यास मोठ्या प्रमाणार रोजगार निर्मिती होते.विशेषत: हस्तकला,हातमाग हे व्यवसाय रोजगारक्षम आहेत. राष्ट्रीय उत्पादन धोरणानुसार २००२ पर्यंत या क्षेत्रातून सुमारे १० कोटी लोकांना रोजगार मिळू शकतो. त्यामुळेच सरकारने या वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबले आहे. उद्योजकता विकास योजना,पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना (PMEGP),पारंपरिक उद्योगांसाठी पुनरुज्जीवन निधी (SFURTI) ,क्लस्टर विकास योजना राबवण्यात येत आहेत.

ग्रामीण भागासोबतच शहरी भागातही नवनवीन क्षेत्रात रोजगार निर्मिती होत आहे. विशेषत: ई-कॉमर्स क्षेत्रामुळे नव उद्योजक आणि रोजगार निर्माण होत आहे. ई -कॉमर्ससोबतच माहिती तंत्रज्ञान( आयटी) , डाटा विश्लेषण,फायनान्स,सेवा क्षेत्रातूनही रोजगार निर्मिती होत आहे. मुद्रा, अटल नाविन्यपूर्ण अभियान,स्कील इंडिया,स्टार्ट अप इंडिया,स्टँड अप इंडिया, राष्ट्रीय जीवनौत्ती अभियान या सारख्या योजनांमधून तरुणांना कौशल्य ,वित्त पुरवठा देऊन त्यांना व्यवसाय उभारण्यासाठी मदत करण्यात येत आहे.

रोजगार निर्मितीसोबतच स्वयंरोजगारलाही सरकारकडून प्रोत्साहन देण्यात येत आहे. सरकारकडून उद्योजकांना वेतन अनुदान, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPFO) ,कर्मचारी विमा (ESIC) मध्ये योगदान करत असून त्यामुळे बेरोजगारांना रोजगार मिळत आहे. पंतप्रधान रोजगार प्रोत्साहन योजनेअंतर्गत (PMPRY) कर्मचाऱ्याच्या निवृत्ती योजनेत सरकारकडून उद्योजकाचा वाटा जमा करण्यात येतो. याशिवाय सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांमुळे मोठ्या प्रमाणात अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीही होत आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजना,स्मार्ट सिटी,अमृत, हुन्नर से रोजगार तक योजनांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. या क्षेत्रातून रोजगाराची निश्चित आकडेवारी उपलब्ध करण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसली तरीही यातून होणाऱ्या रोजगार निर्मितीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. रोजगाराची निश्चित आकडेवारी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक घराचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगार निर्मितीची निश्चित आकडेवारी प्राप्त होईल.

आधुनिक अर्थव्यवस्थेचे यश आणि अपयश रोजगार निर्मितीवर अवलंबून आहे. देशातील प्रत्येक हाताला काम देणे हे चांगल्या अर्थव्यवस्थचे लक्षण आहे. सरकारच्या विविध योजनांमुळे रोजगार निर्मितीमध्ये वाढ होत असल्याने प्रत्येकाला रोजगार उपलब्ध होणार आहे.

■■■

आराखडा

# सूक्ष्म उद्योग व रोजगार वाढीला उत्तेजन

-राजीव कुमार



**सूक्ष्म उद्योग विकास व पुनर्विंत्त संस्था मर्यादित ( मायक्रो युनिटस डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लिमिटेड ) म्हणजे मुद्रा बँकेची स्थापना ही देशातील ज्या सूक्ष्म उद्योगांना पुरेसे वित्त सहाय्य मिळू शकले नाही अशांसाठी करण्यात आली. मुद्रा योजनेच्या मार्फत बँकांना पुनर्वित्ताची सोय करून देण्यात आली आहे उत्पादन क्षेत्रातील सूक्ष्म- लघु उद्योगांना कर्ज देणाऱ्या . सूक्ष्म वित्त संस्था व इतर कर्जदार संस्था सध्या कर्जाच्या उद्योगात आहेत त्यांना पुनर्वित्ताची सोय यात दिली आहे. मुद्रा योजनेतून अगदी शेवटच्या टोकाकडील वित्त संस्थांना पुनर्वित्ताची सोय देऊन मजबूत करण्यात आले आहे. त्यामुळ देशात सूक्ष्म व लघु उद्योग पूर्णस्वरूपाने वाढतील अशी अपेक्षा आहे. मुद्रा योजनेचा हेतूच सूक्ष्म उद्योग क्षेत्राची प्रगती हा आहे. त्यासाठी आर्थिक व उद्योग साक्षरतेसारखे अनेक उपक्रम राबवण्यात येत आहेत.**

देशात लहान उद्योगांची संख्या खूप जास्त आहे. असंघटित क्षेत्रात असे ५.७७ कोटी उद्योग असून यात व्यक्तीगत पातळीवर उत्पादन, व्यापार,सेवा उद्योग चालवले जातात. या व्यक्तींना औपचारिक संस्थांच्या माध्यमातून कर्जे मिळणे अवघड असते. या लोकांना कर्जे उपलब्ध व्हावीत यासाठी पूर्वीही काही उपाययोजना करण्यात आल्या पण असे असले तरी अनेक लोकांपर्यंत या योजना पोहोचल्या नाहीत. मोठ्या कंपन्या व उद्योग हे देशाच्या आर्थिक प्रगतीत वाटा उचलत असले तरी त्यांना असंघटित क्षेत्राचे मोठे पाठबळ असते हे येथे विसरून चालणार नाही. विशेष म्हणजे असंघिटत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होत असतात. असे सूक्ष्म व लघु उद्योग लोक चालवत असले तरी या लोकांकडे परिचालनासाठी पुरेसा निधी किंवा आर्थिक साधने नसतात. त्यामुळे ते नोंदणी न करताच हे उद्योग चालवत असतात. सूक्ष्म उद्योगांसाठी वित्तपुरवठा म्हणजे कर्ज उपलब्ध होणे ही महत्वाची बाब आहे पण ते त्यापासून वंचित राहतात. अधिकृत वित्त साधने नसल्याने मग ते सावकारांसारख्या अनधिकृत व्यक्ती किंवा यंत्रणेकडून अवाजवी दराने कर्जे घेतात. तेही जमले नाही तर अंतर्गत आर्थिक साधने वापरतात, घरातील मर्यादित आर्थिक साधनांवर ते फार काळ उद्योग पुढे नेऊ शकत नाहीत.

प्रधानमंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाय) ८ एप्रिल २०१५ रोजी सुरू झाली. त्यात बँका, सूक्ष्म वित्त संस्था, बँकेतर आर्थिक कंपन्या (एमएफआय, एनबीएफसी) यासारख्या या संस्थांच्या मार्फत पीएमएमवाय योजनेतील निधी नसलेल्या कर्जांना पुनर्वित्त देणे हा उद्देश होता. १० लाखांपर्यंत कर्जे यात उपलब्ध आहेत. यातील कर्जे तीन प्रकारातील असून त्यात शिशु ( रू. ५००००), किशोर (रू. ५०००० ते ५ लाख ), तरूण (रू. ५ लाख ते १० लाख) . पहिल्या पिढीतील उद्योजकांसाठी संधी वाढवण्याच्या योजनांशिवाय ही कर्जे आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या लघु उद्योगांचा विस्तार करून रोजगारांना चालना देणे हा यातील प्रमुख उद्देश आहे. ही योजना सुरू झाल्यापासून ६ जुलै २०१८ अखेर ६.१९ लाख कोटींची १३.१६ कोटी कर्ज प्रकरणे मंजूर कऱ्ण्यात आली आहेत. त्यातून वित्त पुरवठा वाढला आहे. विशेष म्हणजे तो तळापासून वाढला वरून नव्हे. योजना सुरू केल्यापासून वार्षिक उद्दिष्टे पार करण्यात यश आले आहे.या वर्षी ३ लाख कोटींचे कर्ज पुरवठा उद्दिष्ट होते.


त्यातून सूक्ष्म व लघु उद्योगांना कर्ज देणारी नवी आर्थिक परिसंस्था तयार होण्यास मदत झाली. बँकिंग मार्गाच्या पलिकडे जाऊन हे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. आर्थिक साधने उपलब्ध करताना त्याची मोठी मदत होत आहे. कर्ज घेणाऱ्यांची वाढती संख्या व कर्जाचे प्रमाण गेल्या तीन वर्षात वाढलले आहे. मुद्रा योजनेचे उद्दिष्ट या कर्जांमधून सफल होताना दिसत आहे. आजमितीस केवळ ११० बँका कर्जदार नाहीत तर ७२ एमएफआय व ९ एनबीएफसी

यांच्या मार्फत पीएमएमवाय कर्जे दिली जात आहेत. यासाठी


www.udyamimitra. या पोर्टलवर जाऊन तुम्ही अर्ज करू शकता. पीएमएमवाय योजनेत कर्जाची उपलब्धता पिरॅमिडच्या खालच्या बाजूने झाली आहे. यातून सध्याच्या सूक्ष्म व लघु उद्योगांना चालना मिळाली असून त्यातून रोजगारनिर्मितीही होणार आहे. सुमारे नव्वद टक्के कर्जे ही शिशु वर्गातील असून त्यांचा असंघटित उद्योगांवर मोठा परिणाम होत आहे. त्यातून आर्थिक विकास व रोजगार साध्य होत आहेत.


द्वारा रीसर्च यांनी केलेल्या अभ्यासानुसार पीएमएमवायमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठीचे कर्ज वाढले आहे.दोन लाखांच्या कर्जाचे वितरण वाढवण्यासाठी बँकांबरोबर एमएफआय काम करीत असून बँकांनी दिलेले कर्ज शिशु गटात २०१६-१७ कर्ज पन्नास टक्के वाढले. सगळी माहिती पाहिल्यानंतर असे सूचित होते की, सध्याचे ग्राहक आणखी मोठी कर्जे घेऊ शकतात. किशोर प्रवर्गात ते प्रवेश करतील. यातील ५५ टक्के कर्जदार हे अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीयातील आहेत. त्यात सामाजिक उद्दिष्टे साध्य होऊन त्यातून वंचितांना फायदा झाला.

पीएमएमवाय कर्जे ही महिलांना फायद्याची ठरली आहेत. त्यातून त्यांची कामगार बाजारपेठेत असलेली भूमिका वाढत आहे. जी कर्जे मंजूर करण्यात आली आहेत त्यात ७४ टक्के कर्जे ही महिलांना दिली आहे.




**श्रीमती अनिता सोनी या राजस्थानातील भिलवाराच्या निवासी असून त्या महिलांच्या कपड्यांचा उद्योग घरीच चालवतात. त्यांना आर्थिक कारणास्तव उद्योग पुढे नेता येत नव्हता. पण त्यांना मुद्रा योजनेत तरूण प्रवर्गात १० लाखांचे कर्ज मिळाल्यानंतर त्यांनी लाडली कलेक्शन हे दुकान सुरू केले व नंतर त्यांचे ग्राहक व त्याबरोबर उत्पन्नही वाढले. (स्त्रोत-** Mudra Portal (www.mudra.org.in)




बांगड्या निर्मिती, ब्युटी सलून, अगरबत्ती, शिवणकाम, इलेक्ट्रॉनिक उपकरणे दुरूस्ती , संगणक प्रशिक्षण केंद्रे यात त्यांनी काम केले. प्रोप्रायटर पातळीवरील उद्योग वाढ होण्यात यामुळे मदत झाली आहे. 2013-14 या सहाव्या आर्थिक गणनेच्या काळात ते 13.4 टक्के होते तर 2015-16 या वर्षात राष्ट्रीय सांख्यिकी 19.5 टक्के झाले. त्यातून महिलांच्या रोजगार संधी वाढत आहेत. पीएमएमवायमुळे नवीन उद्योजकांना एक मंच मिळाला आहे. त्यामुळे या योजनेत 28 टक्के कर्जे ही नवीन उद्योजकांना दिली गेली, अशा स्वपायावर उभ्या राहणाऱ्या उद्योगांची संख्या ही २०१३-१४ च्या सहाव्या आर्थिक गणनेत ३.०१ टक्के होती ती २०१५-१६ च्या एनएसएस गणनेत ५.३३ टक्के झाली. यात नियमित पातळीवर रोजगार मात्र दिले जात नाहीत.

## पीएमएमवायमुळे नवी उद्योगांना पाठिंबा व रोजगार निर्मिती

श्री.एनएसके सुभानी हे विजयवाड्याचे कुशल सुतार आहेत. त्यांचे स्वप्न स्वतचा फर्निचर व्यवसाय सुरू करण्याचे होते त्यासाठी त्यांना ५ लाखांचे कर्ज पीएमएमवाय योजनेत मिळाले. ते आता तीन जणांना रोजगार देत आहेत

असे उद्योग वाढीस लागल्यामुळे त्यांचा भविष्यात विस्तार होऊन रोजगारनिर्मितीही आणखी वाढणार आहे.

**पैशांच्या पलीकडे- सकारात्मक पत पुरवठा यंत्रणेची निर्मिती**

पीएमएमवाय योजना ही सगळे चित्र पालटणारी म्हणजे गेम चेंजर ठरली आहे. कारण अगदी तळागाळातील लोकांपासून सर्वच उद्यमींना कर्जे उपलब्ध झाली आहेत. यात सर्व पतपुरवठा यंत्रणेचे औपचारिकिकरण झाले आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीस चालना मिळत आहे.


**पोर्टफोलिओ पत हमी-**

पीएमएमवाय कर्जांमध्ये पोर्टफोलिओ पत हमी ही पन्नास टक्के नुकसानीच्या मर्यादेपर्यंत लागू करण्यात आली आहे. यातील तोट्याचा पहिला फटका हा कर्जदार संस्था सहन करणार आहे. कर्जदाराच्या मानांकनावर व अनुत्पादित मालमत्तेच्या प्रमाणावर प्रीमियमचे दर अवलंबून राहणार आहेत. त्यामुळ यात शिस्त व व्यावसायिकता आहे.

**पुनर्वित्त**

मुद्रा लिमिटेड कडून पीएमएमवायला फेर अर्थसहाय्य हे कमी दराने होत आहे. त्यात कर्जाचे व्याज दर, कमी आहेत त्यामुळे जे लोक पीएमएमवायमधून कर्ज घेतात त्यांनाही कमी दर लागू होतात. कर्ज हमी प्रमाणेच काही अटी

**महिलांचे सक्षमीकरण**




१ एप्रिल २०१५ आणि
३१ मार्च २०१८

श्रीमती हेमा राठोड या जयपूर येथील महिला उद्योजिका आहेत. केवल तीन महिण्याच्या अंतरात त्यांच्या पतीचे आणि दोन तरुण मुलांचे निधन झाले. त्यामुळे दोन विधवा सुना आणि चार नातवंडांच्या पालणपोषणाची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्या निराश अवस्थेत असतानाच प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत त्यांना कर्ज मिळाले. त्यातून त्यांनी आपल्या पतीचा ड्रायव्हिंग स्कूलचा व्यवसाय पून्हा सूरु केला आणि त्या आता दिड लाख रुपये कमवत आहेत.

पाळणाऱ्या कर्जदारांना पुनर्वित्ताची सुविधा आहे. त्यामुळे कर्ज व्यवस्थेत व्यावसायिकता ही आहे.

**मुद्रा कार्ड**


यात रूपे कार्ड हे पतसाधन म्हणून वापरले जाते ते अभिनव असे आहे यात शंका नाही. त्यातून रोख कर्ज व ओव्हरड्राफ्ट मिळू शकतात व त्याच्या मदतीने एटीएम किंवा बीसीमधून रोख रक्कम काढता येते. खरेदी करता येते. पीओएस मशीनच्या मदतीने सुटीच्या दिवशीही बँका सोडून व्यवहार करता येतात. यातून घेतलेल्या पैशावर वेगळे शुल्क आकारले जात नाही व त्यात पैसे भरण्याचीही सोय आहे.

**पत इतिहास**

पीएमएमवाय अंतर्गत वितरित केलेल्या कर्जाची नोंद पत नोंदणी विभागाकडे होते. त्यामुळे औपचारिकता निर्माण होऊन रोजगार ही वाढतो.

**एमएफआयच्या व्याप्तीत बदल**

पीएमएमवाय योजना पुनर्वित्त व कर्ज हमीवर आधारित आहे. ती




**कर्जसुलभता**

मायक्रोसेव्ह सप्टेंबर २०१६ च्या अहवालानुसार

जे कर्जदार आहेत त्यांनी तीन गोष्टी पीएमएमवाय मध्ये जास्त आवडल्या त्यात एक म्हणजे हमीदाराची गरज नाही, समांतर हमीची गरज नाही. कागदपत्रांची सुलभता व वेगाने प्रक्रिया.

कर्ज देण्यासाठी बँकांचा स्वतहून पुढाकार असून पहिल्या वेळेस कर्ज घेण्याऱ्यांना सावकरांपासून बँकिंग व अधिकृत संस्थांकडे वळवले जात आहे. पीएमएमवाय मध्ये किमान ९७ टक्के लोकांनी अधिकृत संस्थांकडून प्रथमत कर्ज घेतले आहे. यापूर्वी एमएफआय ग्राहकांत असे कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ७४ टक्के होते.

ज्या ग्राहकांनी पीएमएमवाय कर्जे बँकांकडून घेतली आहेत त्यांनी असे सांगितले की, बँका स्वतहून आमच्याकडे आल्या नसत्या तर आम्ही असे कर्ज बँकांकडून घेण्याची कल्पनाही करू शकत नव्हतो.




कामगिरीशी निगडित आहे. त्यातून चांगल्या एमएफआयला उत्तेजन मिळते.

**कर्जे, अनुदान नाही**

सर्व ग्राहकांना कर्ज दिले जाते. ते पीएमएमवायचे लाभार्थी नाहीत कारण कर्ज म्हणजे अनदान नाही.कर्जातच परतफेडीची सोय असल्याने त्याला शिस्त आहे. पैसे परत मिळण्याची हमी आहे. मुद्रा उद्योजक यातून तयार होत आहेत.

**मूल्य साखळ्यांशी सांगड**

पीएमएमवाय कर्ज ही भागीदारी व निधी मूल्य साखळ्यांशी व पुरवठा साखळ्यांशी जोडलेली आहेत. त्यात काही इ व्यापार व इतर व्यावसायिक मंचांचा समावेश आहे. यातून मुद्रा द्योजक (मुद्राआंत्रप्रेन्युर्स) तयार होतील. ते मोठ्या उद्योगांशी तर जोडले जातीलच शिवाय त्यांना संपूर्ण मूल्यसाखळीत रोजगार निर्मितीसाठी कर्जे मिळतील. भारताच्या बाजारपेठेचा आकार बघितला तर नवीन उद्योग व इतर उद्योगांच्या विस्तारास पुरेसा वाव आहे. त्या दृष्टिकोनातून विचार केला तर पीएमएमवाय हे एक मोठे पाऊल आहे. जनधन योजना, आधार व मोबाईल (जेएएम) या तीन गोष्टींमुळे पीएमएमवाय अंतर्गत बहुतांश उद्योग इच्छुकांना संस्थात्मक कर्जाचा लाभ झाला.

फिनटेकसारख्या नवीन व अभिनव अशा गोष्टींमुळे संपर्कहीन अशी कर्जव्यवस्था अंमलात आली. वेगवेगळ्या माहिती संकलन बिंदू यात होते. ट्रेड रिसीव्हेबल डिसकाउंटिंग सिस्टीम, गव्हर्नमेंट इ मार्केटप्लेस,

> मुद्रा मित्र हे मोबाईल फोन ॲप असून ते गुगल प्ले स्टोअर व ॲपल ॲपवर उपलब्ध आहे. त्यात मायक्रो युनिटस डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लिमिटेड (मुद्रा) व त्यांच्या विविध आर्थिक उत्पादने- घटक व योजनांविषयी माहिती दिली आहे. त्यातून प्रधान मंत्री मुद्रा योजनेत मुद्रा कर्ज कसे घ्यावे त्यासाठी कर्ज घेणाऱ्याने काय करणे अपेक्षित आहे याची माहिती दिली आहे. वापरकर्ते यातून कर्जाचे अर्जही डाऊनलोड करू शकतात.

**यशोगाथा:**

**यश मार्गावरील प्रवास : सुरेंद्र सिंग**

सुरेंद्र हा त्याच्या कुटुंबातील एकमेव कमवता सदस्य होता. मित्राची भाड्यावर घेतलेली ॲटोरिक्षा चालवून तो आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करित होता. रिक्षाचे भाडे वजा जाता त्याच्याकडे जेमतेम पैसे उरत असत.

त्याची दोन्ही मुले मोठी होऊ लागली तशी त्यांच्या शिक्षणाचा आणि इतर खर्च वाढू लागला. आपली अर्धी कमाई रिक्षाच्या भाड्यापोटी जात असल्यामुळे आपण फार पैसे कमवू शकत नाही हे त्याच्या लक्षात आले. त्यामुळे स्वत:ची रिक्षा घेण्यासाठी तो बँकेकडे कर्ज मागण्यास गेला. त्याच्याकडे घरदार, पैसे, सोने असे काहीच नसल्यामुळे कर्ज मिळेल की नाही याबद्दल तो साशंक होता. परंतु त्याला मुद्रा योजने अंतर्गत सहजतेने 'किशोर' कर्ज मिळाले आणि त्याने स्वत:ची नवी रिक्षा विकत घेतली. आता तो चांगले कमवु लागला असून आणखी एक रिक्षा मुद्रा कर्ज योजने अंतर्गत घेण्याच्या विचारात आहे. याद्वारे तो आणखी एकाला रोजगार देऊ इच्छितो.





जीएसटी, प्राप्तीकर परतावा या सगळ्या माहितीचे संकलन करता आले. यात अनेक भागीदार सहभागी असल्याने आता उद्यमशीलता व रोजगार निर्मिती वाढणार आहे. पीएमएमवाय योजनेने असंघटित अर्थपुरवठा यंत्रणा कमीत कमी केली व औपचारिक कर्जपुरवठा लोकांच्या दारात नेला, समाजातील तळागाळाच्या लोकांना त्यामुळे अर्थपुरवठा शक्य झाला. यातून पहिल्या पिढीच्या उद्योजकांचा आत्मविश्वास दुणावला. आधी ते उद्योग सुरू करायला घाबरत होते ते राजी झाले. आता ते उद्योग विस्तारत आहेत. आता त्यांना अनुकूल अशी वित्त पुरवठा यंत्रणा मिळाल्याने ते खुश आहेत.

■■■

*लेखक अर्थ मंत्रालयातील वित्तीय सेवा विभागाचे सचिव आहेत.*

*ई मेल: (e mail-secy-fs@nic.in)*



# रोजगार आकडेवारी बाबत नियोजित दृष्टिकोन

**-टी व्ही मोहनदास पै,यश बैद**



**१९९१, २००१ आणि २०११ च्या जनगणना लक्षात घेता दर वर्षी 2.5 कोटी बालके जन्माला येतात असे घोष अहवालात नमूद करण्यात आले आहे.परिणामी वार्षिक २.५ कोटी लोक २१ वर्ष वयोगटात येतात आणि येत्या २० वर्षातही हेच चित्र राहील. २.५ कोटी जनतेतल्या जनतेचा श्रम सहभाग दर ६० टक्के राहील असा अंदाज आहे.म्हणजेच दर वर्षी १.५ कोटी व्यक्ती श्रम बळात सहभागी होतील. ए आय एस एच ई म्हणजेच अखिल भारतीय उच्च शिक्षण आजकाल २०१६-१७ मध्ये,दर वर्षी सुमारे ८८ लाख विद्यार्थी पदवी शिक्षणपूर्ण करतात हे ठळकपणे नमूद करण्यात आहे.**

भारतातल्या रोजगार निर्मितीबाबत तपशीलवार, सर्वंकष अहवाल नाही.फॉर्मल क्षेत्रातल्या रोजगारविषयीची आकडेवारी पहिल्यांदा 'टुवर्डस पे रोल रिपोर्टिंग इन इंडिया' या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बंगळुरू चे प्राध्यापक पुलक घोष आणि एसबीआय, ग्रुप मुख्य आर्थिक सल्लागार सौम्या कांती घोष यांच्या अहवालातून प्राप्त झाली.घोष यांच्या अहवालाच्या आधी एनएसएसओ चे अहवाल होते मात्र त्यांच्या अंदाजातून देशातल्या रोजगार स्थितीचे पुरेसे चित्र सादर होत नव्हते. यामुळे देशातली रोजगार स्थिती ठरवणारी आणि त्याचा अहवाल देणारी उत्तम यंत्रणा विकसित करण्याची गरज निर्माण झाली होती.

रोजगार बाजारपेठेमधल्या मानवी भांडवल पुरवठ्याचे विश्लेषण ही यासाठी उत्तम सुरवात आहे. १९९१, २००१ आणि २०११ च्या जनगणना लक्षात घेता दर वर्षी २.५ कोटी बालके जन्माला येतात असे घोष अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिणामी वार्षिक २.५ कोटी लोक २१ वर्ष वयोगटात येतात आणि येत्या २० वर्षातही हेच चित्र राहील. २.५ कोटी जनतेतल्या जनतेचा श्रम सहभाग दर ६० टक्के राहील असा अंदाज आहे. म्हणजेच दर वर्षी १.५ कोटी व्यक्ती श्रम बळात सहभागी होतील. ए आय एस एच ई म्हणजेच अखिल भारतीय उच्च शिक्षण आजकाल २०१६-१७ मध्ये,दर वर्षी सुमारे ८८ लाख विद्यार्थी पदवी शिक्षणपूर्ण करतात हे ठळकपणे नमूद करण्यात आहे.यामध्ये रोजगार अथवा नोकरीची इच्छा नसलेल्याची संख्या सुमारे २५ टक्के,यावरून आम्हाला श्रमबळात वार्षिक अर्हता प्राप्त व्यक्तींची वाढीव संख्या ठरवण्यासाठी मदत झाली ती ६६ लाख आहे.

भारतात व्याखेनुसार रोजगार, फॉर्मल आणि इन्फॉर्मल क्षेत्रात विभागले आहेत.फॉर्मल क्षेत्रातले रोजगार सामाजिक सुरक्षेने युक्त असतात.भारतात सामाजिक सुरक्षा तीन संस्था पुरवतात-ईपीएफओ, ईएसआयसी आणि एन पी एस (एन पी एस केवळ सरकारी कर्मचाऱ्यांसाठी). फॉर्मल रोजगार निर्मिती आकडेवारीचे उत्तम स्त्रोत म्हणजे ईपीएफओ, ईएसआयसी,या संस्था, अनुक्रमे,

तक्ता १

| दर वर्षी जन्माला येणाऱ्या बालकांची अंदाजित संख्या | एकक | बालकांची वार्षिक संख्या |
|---|---|---|
| जन गणना १९९१ | लाख | २५३ |
| जन गणना २००१ | लाख | २४८ |
| जन गणना २०११ | लाख | २५२ |

तक्ता २

| भारतीय श्रम शक्ती | एकक | २०१७ |
|---|---|---|
| वरील अंदाजाप्रमाणे दरवर्षी भर पडणारी निव्वळ श्रमशक्ती | लाख | २५० |
| श्रम बाजारात स्वेच्छेने सहभागी न होणारे ४०% | लाख | -१०० |
| श्रम शक्तीत वार्षिक निव्वळ पात्र सहभागी | लाख | १५० |
| पदवीधारक वार्षिक | लाख | ८८ |
| गळती दर २५% | लाख | -२२ |
| श्रमशक्तीत दरवर्षी भर पडणारे अर्हताप्राप्त मनुष्यबळ | | ६६,००,००० |
| विनापदवी,विना अर्हता कामगार, (निव्वळ १५० लाख -६६ लाख )वार्षिक | | ८४,००,००० |

२० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या १९० तर १० पेक्षा जास्तकामगार असणाऱ्या ९० उद्योगाबाबत चित्र स्पष्ट करतात.ईपीएफओ,ईएसआयसीने गेल्या सहा महिन्यात प्रसिध्द केलेल्या आकडेवारीचे घोष अहवालात विश्लेषण करण्यात आले आहे. मार्च २०१८ नुसार ईपीएफओकडे ५५ लाख वाढीव रोजराची नोंदणी झाली तर ईएसआयसी कडे ९ लाख,एनपी एस कडे ७ लाख नोंदणी झाली. २०१७-१८ मधे वाढीव सामाजिक सुरक्षा कवचानुसार फॉर्मल क्षेत्रात एकूण ७१ लाख रोजगार निर्माण झाले. ही आकडेवारी मासिक योगदान आणि वेतन पटावर आधारित असल्याने फॉर्मल क्षेत्रात वार्षिक ७० लाख रोजगार निर्माण झाले असे गृहीत धरणे योग्य ठरेल.सामजिक सुरक्षे बाहेर असणाऱ्या लोकसंख्ये कडेही आपण पाहिले पाहिजे. सनदी लेखापाल, वकील, डॉक्टर यासारख्या व्यवसायातली रोजगार निर्मिती हा रोजगार निर्मितीतला महत्वाचा घटक आहे आणि आपल्या आकडेमोडीचा हा अविभाज्य भाग असायला हवा.आय सी ए च्या आकडेवारीनुसार २०१७ मधे १६,९७० नवे सनदी लेखापाल श्रम शक्तीत सहभागी झाले या विभागाने निर्माण केलेले एकूण रोजगार म्हणजे व्यावसायिकांनी निर्माण केलेले अतिरिक्त मानवी संसाधन आहे.

डॉक्टर आणि वकिलांनाही ही बाब लागू होत असून या दोघांनी २०१७ मधे श्रम बळात अनुक्रमे ८०,००० ची भर घातली.

थोडक्यात, या व्यावसायिकांसाठी आवश्यक सहाय्यक कर्मचारी वर्ग (कारकून, परिचारिका इत्यादी) लक्षात घेता या तीन व्यवसायांनी ६ लाख रोजगाराचे योगदान दिले.अशाच आणखी व्यवसायाच्या रोजगाराची आकडेवारी विचारात घेतलेली नाही. या तीन व्यवसायांनी एकूण सुमारे १.०८ कोटी रोजगार निर्मिती केली,प्रत्येक सनदी लेखापाल २० रोजगार,प्रत्येक वैद्यकीय व्यावसायिक ५ तर कायद्यासंदर्भात काम करणाऱ्या प्रत्येक वकीलाने ३ रोजगार निर्माण केल्याचे तक्ता ५ मधे गृहीत धरण्यात आले आहे.

प्रधान मंत्री कौशल विकास योजना आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाने पुरवलेली आकडेवारी, तक्ता ६ मधे देण्यात आली आहे.त्यांनी मागच्या वर्षात ५ लाख रोजगाराची यशस्वी निर्मिती केली. मात्र त्याचा फॉर्मल आणि इन्फॉर्मल क्षेत्रातल्या इतर वर्गवारीत विचार करण्यात आला असावा.परिवहन उद्योग,इन्फॉर्मल रोजगाराची मोठ्या प्रमाणात निर्मिती करतो.यात व्यक्ती किंवा वाहन असणाऱ्या छोट्या कंपन्यांचा समावेश आहे. भारतीय ऑटो मोबाईल उत्पादन सोसायटी कडून विक्री आणि निर्यात विषयक मिळालेल्या आकडेवारीचे वाहनाच्या प्रकारानुसार वर्गवारी करण्यात आली, व्यावसायिक वाहने, तीन चाकी आणि प्रवासी वाहने.या

तक्ता ३

| योजना | वित्तीय वर्ष २०१८ | रोजगार निर्मिती प्रति वर्ष |
|---|---|---|
| ई पी एफ ओ | ५५,००,००० | |
| एनपीएस | ७,००,००० | |
| ईएससी | ९,००,००० | |
| संघटित क्षेत्रात निर्माण झालेले नवे रोजगार | ७१,००,००० | |

तक्ता ४

| सनदी लेखापाल | वित्तीयवर्षं २०१६ | वित्तीय वर्ष २०१७ | रोजगार निर्मिती प्रती वर्ष |
|---|---|---|---|
| २०१६-१७ नवे आयसीएआय सदस्य | | १६९७० | |
| प्रॅक्टिस करणाऱ्या कंपन्या (मुख्यालय,शाखा) | ७९९९३ | ८५६१७ | |
| प्रॅक्टिस करणाऱ्या नव्या कंपन्या २०१६-१७ | | ५६२४ | |
| वार्षिक कर्मचारी रोजगार निर्मिती | | १,१२,४८० | १,१८,१०४ |
| वैद्यकीय व्यावसायिक | | वित्तीय वर्ष २०१७ | वार्षिकरोजगार निर्मिती |
| एकूण डॉक्टर्स | | २५२८२ | |
| एकूण दंतशल्य चिकित्सक | | ५३४७३ | |
| एकूण आयुष डॉक्टर्स | | २,२०० | |
| २०१६-१७ मध्ये एकूण वैद्यक व्यावसायिक | | ८०,९५५ | |
| २०१६-१७ मधें नवी भर@६०% | | ४८५७३ | |
| वार्षिक कर्मचारी रोजगार निर्मिती | | २,४२,८६५ | २,९१,४३८ |
| वकील | | वित्तीय वर्ष २०१७ | रोजगार निर्मिती वार्षिक |
| नवे वकील युजी | | ६७,९७३ | |
| नवे वकील पीजी | | ११,३८७ | |
| नवे वकील | | ७९३६० | |
| पदवीपर्यंतचे प्रॅक्टिस करणारे ६०%सहभाग | | ४०७८४ | |
| पदव्युत्तर प्रॅक्टिस करणारे ८०%सहभाग | | ९,११० | |
| एकूण नवे प्रॅक्टिस करणारेवार्षिक | | ४९,८९३ | |
| कर्मचारी रोजगार, वार्षिक निर्मिती | | १,४९,६८० | १,९९,५७४ |
| २०१६-१७ मधे व्यावसायिकाकडून झालेली रोजगार निर्मिती (सल्लागार,कॉस्ट अकाऊटंट इत्यादी वगळता ) | | | ६,०९,११६ |

तक्ता ५

| सनदी लेखापाल | वित्तीय वर्ष २०१७ | रोजगार |
|---|---|---|
| भारतात प्रॅक्टिस करणाऱ्या संस्था (मुख्यालय,शाखा ) | ८५,६१७ | |
| कर्मचारी रोजगार निर्मिती @२० प्रती प्रॅक्टिस | १७,१२,३४० | १७,९७,९५७ |
| वैद्यकीय व्यावसायिक | वित्तीय वर्ष २०१७ | रोजगार |
| एकूण डॉक्टर्स | १०,४१,३९५ | |
| एकूण दंत शल्य चिकित्सक | २,५१,२०७ | |
| एकूण आयुष डॉक्टर्स | ७,७३,६६८ | |
| एकूण वैद्यकीय व्यावसायिक@६०%सहभाग | १२,३९,७६२ | |
| कर्मचारी रोजगार निर्मिती(@५ %प्रती डॉक्टर, दंत शल्य चिकित्सक) | ३८,७७,८०६ | |
| कर्मचारी रोजगार निर्मिती(@२ %प्रती आयुष डॉक्टर प्रॅक्टिस) | ९,२८,४०२ | ६०,४५,९७० |
| वकील | वित्तीय वर्ष २०१७ | रोजगार |
| एकूण नवी प्रॅक्टिस,प्रती वर्ष | ४९,८९३ | |
| एकूण प्रॅक्टिस (गृहीतक-१५ x वार्षिक वाढ) | ७,४८,४०१ | |
| कर्मचारी रोजगार निर्मिती @३ प्रती प्रॅक्टिस | २२,४५,२०३ | २९,९३,६०४ |
| व्यावसायिकाकडून झालेली रोजगार निर्मिती (सल्लागार, कॉस्ट अकाऊंटंट इत्यादी वगळता) | | १,०८,३७,५३१ |

वाहनांपैकी व्यावसायिक वाहनाची रोजगार क्षमता प्रती वाहन २, तीन चाकी वाहनाची १.५, तर ०.२५ (प्रत्येक चार गाड्यांमागे १) गृहीत धरण्यात आली आहे.

या बाबी लक्षात घेता वाहतूक क्षेत्र दर वर्षी २० लाख रोजगाराचे योगदान देते. या आकडेवारीकडे अनेकदा रोजगार सर्वेक्षण आणि अहवालात दुर्लक्ष केले जाते. ही वाहने व्यक्तिगत मालकीची असल्यामुळे हे रोजगार इन्फॉर्मल क्षेत्रात मोडतात.यामुळे ईपीएफओ, ईएसआयसीच्या आकडेवारीत हे रोजगार दिसून येत नाहीत. भारतातली वाणिज्यिक अथवा व्यावसायिक वाहने-ट्रक,एलएमव्ही(वस्तू आणि माल), एलएमव्ही(प्रवासी)बस ही वाहने प्रती वाहन २ रोजगाराची निर्मिती करतात.या सर्वांचा एकत्रित विचार करता २०१६-१७ मधे,हा आकडा २.२५ कोटी होतो.भारतात,वाहतूक उद्योगातला रोजगार विस्तार सुमारे ३.६ कोटी आहे.

इन्फॉर्मल रोजगार निर्मितीसाठी योगदान हा इतर अनेक स्त्रोताचा घटक असून तो या विश्लेषण क्षेत्राच्या बाहेर आहे. तथापि संक्षेप आणि तर्काच्या आधारावर फॉर्मल आणि इन्फॉर्मल

तक्ता ६

| पी एम के ई वाय आणि एन एस डी सी | वित्तीय वर्ष २०१७ | रोजगार निर्मिती वार्षिक |
|---|---|---|
| पीएमकेईवाय आणि एनएसडीसी प्रशिक्षित व्यक्ती | १०,१८,५७२ | |
| नोकरीची टक्केवारी(४९%) | ४,९९,१०० | |
| पीएमकेईवाय मुळे रोजगार निर्मिती | | ४,९९,१०० |

तक्ता ७

| प्रकारानुसार वाहन विक्री | वित्तीय वर्ष २०१८ | रोजगार निर्मिती वार्षिक |
|---|---|---|
| व्यावसायिक वाहनविक्री( निव्वळ निर्यात ) | ७,५९,५८६ | |
| बदलीचा दर (२५%) | -१,८९,८९७<br>५,६९,६९० | |
| रोजगार निर्मिती(रोजगारक्षमता सुमारे २ प्रती वाहन ) | | ११,३९,३७९ |
| तीन चाकी वाहन विक्री ( निव्वळ निर्यात ) | २,५४,६९६ | |
| बदलीचा दर (१०%) | -२५,४७० | २,२९,२२६ |
| रोजगार निर्मिती(रोजगारक्षमता सुमारे1.5 प्रती वाहन ) | - | ३,४३,८४० |
| व्यावसायिक वाहन विक्री (निव्वळ निर्यात ) | २५,४०,६७८ | |
| बदलीचा दर (२०%) | -५,०८,१३६<br>२०,३२,५४२ | |
| रोजगार निर्मिती (रोजगारक्षमता सुमारे ०.२५ प्रती वाहन) | | ५,०८,१३६ |
| परिवहन क्षेत्रातली रोजगार निर्मिती २०१७-१८ | | १९,९१,३५४ |

तक्ता ८

वाहतूक क्षेत्रातील एकूण रोजगार २०१६-१७

| क्षेत्र | राज्य | ट्रक | एलएमव्ही (माल) | बसेस | टॅक्सी | एलएमव्ही (प्रवासी) | एकूण वाहतुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | पंजाब | ४,८४,२९१ | १,४६,४२३ | ५८,२५२ | ३,१२७ | ६,२७,९४६ | १३,२०,०३९ |
| | उत्तर प्रदेश | २,७७,६२७ | ३,४२,१६० | ६४,८९२ | १,१२,२७६ | २,९९,८५१ | १०,९६,८०६ |
| | हरयाणा | ३,८६,११७ | १,९९,२२६ | ५६,५४९ | ६८,५८३ | १,८७,५१९ | ८,९७,९९४ |
| | जम्मू आणि काश्मिर | ५०,५३० | ८२,८०४ | ३१,५६५ | ४१,४८३ | २१,७८१ | २,२८,१६३ |
| | हिमाचल प्रदेश | ७७,८७२ | ६९,२३४ | २२,८५३ | ३४,७०६ | ३,९५३ | २,०८,६१८ |
| | उत्तरांचल | ७३,९२९ | ४४,०१८ | ५,५७० | ४८,१८७ | २५,५७९ | १,९७,२८३ |
| | दमन आणि दिव | ४,७७८ | १,९९० | नाही | ७४ | १,३०५ | ८,१४७ |
| | अंदमान आणि निकोबार आर्यलँड | नाही | नाही | १,१०६ | ४८९ | ४,९३१ | ६,५२६ |
| पूर्व | दिल्ली | ६,५३,५०२ | नाही | ९७,०६५ | १,३२,९६७ | ६,७३,३४२ | १५,५६,८७६ |
| | मेघालय | १५,४२६ | १२,६५४ | ५,६६८ | २४,१७२ | २१,९३९ | ७९,८५९ |
| | झारखंड | ६९,१२४ | १,६२,१२२ | ७५,६३६ | १६,८३७ | १,५३,३३२ | ४,७७,०५१ |
| | पश्चिम बंगाल | ४,८१,८८० | नाही | ३५,३६९ | १,२८,३०८ | ७०,०१० | ७,१५,५६७ |
| | ओरिसा | १,६९,३२४ | १,६५,८५८ | २६,१५० | १,१५,१३९ | १,३९,७३२ | ६,१६,२०३ |
| | बिहार | १,०६,९३३ | ५५,७४४ | ३२,९४० | ९७,७०३ | २,७६,०४२ | ५,६९,३६२ |
| | आसाम | १,४७,३५५ | १,१९,१७५ | २४,९९३ | ५९,१७४ | १,०९,०२१ | ४,५९,७१८ |
| | नागालँड | १,४१,६६३ | २३,९७८ | ६,१३१ | ९,३२४ | १९,८३२ | २,००,९२८ |
| | त्रिपुरा | ९,०९५ | ११,५२५ | ३,०५१ | १२,५४२ | २६,३४० | ६२,५५३ |
| | मिझोराम | ५,८७७ | २५,५६८ | १,३०६ | ११,३६३ | ५,१३० | ४९,२४४ |
| | मणिपुर | १८,३७४ | २,६१९ | ३,८२५ | १०,४८० | ५,५४७ | ४०,८४५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व | सिक्कीम | ४,०१८ | १,५९१ | ४१७ | १४,०२८ | नाही | २०,०५४ |
| | अरुणाचल प्रदेश | ९,५७३ | नाही | नाही | नाही | नाही | ९,५७३ |
| पश्चिम | महाराष्ट्र | ४,४५,३७० | ९,९२,८५६ | १,४२,९८९ | ३,४३,६५९ | ७,१०,०६० | २६,३४,९३४ |
| | गुजरात | ४,०१,५३४ | ६,७७,९५१ | ८९,३५३ | १,२३,५३२ | ५,५१,४३४ | १८,४३,८०४ |
| | राज्यस्थान | ५,६९,३६४ | १,०८,७४२ | १,०७,९५९ | १,४१,१४६ | १,९४,५१६ | ११,२१,७२७ |
| | चंदिगड | १,९२६ | ९,४१४ | २,९२० | ८६८ | ७,६८६ | २२,८१४ |
| | दादरा आणि नागर हवेली | २,९८४ | ४,०१९ | ४२३ | २ | ४९६ | ७,९२४ |
| दक्षिण | तामिळनाडु | ५,७१,४३९ | ४,२७,३२९ | १,८६,१८२ | ३,९९,६६९ | ४,०४,३७७ | १९,८८,९९६ |
| | कर्नाटका | ३,०७,८४० | ४,०८,००५ | ९२,६०२ | २,९४,६८४ | ४,५१,९८० | १५,५५,१११ |
| | तेलंगणा | ६,१५,४२० | नाही | ५१,७४२ | १,२४,८३० | ३,४४,९९३ | ११,३६,९८५ |
| | केरला | ४,०५,६९९ | ३,२६,०३० | ३०,१९५ | ७७,४४८ | ३,५६,४९५ | ११,९५,८६७ |
| | आंध्र प्रदेश | १,६२,६९४ | २,११,१६८ | ४४,४८२ | ८२,१९० | ४,९७,६१० | ९,९८,१४४ |
| | गोवा (सी) | ४४,२१९ | १८,४१६ | ११,७३३ | १९,३५० | ४,४३३ | ९८,१५१ |
| | पाँडेचरी | १,१४३ | ११,३२५ | २,७२२ | ५,१२४ | ६,९५२ | २७,२६६ |
| | लक्षद्वीप | नाही | १,०८२ | नाही | २५० | ७५० | २,०८२ |
| मध्य | मध्यप्रदेश | २,०९,२७५ | २,६६,२७४ | ४७,८८४ | १९,९७५ | १,२७,४८७ | ६,७०,८९५ |
| | छत्तीसगड | १,२९,०४७ | ९५,४२८ | ६३,८२९ | २३,६०१ | ४०,७३३ | ३,५२,६३८ |
| एकूण | | ७०,५५,२४२ | ५०,२४,७२८ | १४,२८,३५३ | २५,९७,२९० | ६३,७३,१३४ | २,२४,७८,७४७ |

तक्ता ९

| | ट्रक | एलएमव्ही (वस्तू) | बस | ’टॅक्सी | एलएमव्ही (प्रवासी) | एकूण वाहतूक |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रती वाहन रोजगार निर्मिती गृहीतक | २ | २ | २ | २ | २ | |
| प्रती वाहन रोजगार | १,४१,१०,४८४ | १,००,४९,४५६ | २८,५६,७०६ | ५१,९४,५८० | १,२७,४६,२६८ | ४,४९,५७,४९४ |
| बंद राहिलेली वाहने गृहीतक २०% | -२८,२२,०९७ | -२०,०९ ८९१ | -५,७१,३४१ | -१०,३८,९१६ | -२५,४९,२५४ | -८९,९१,४९९ |
| परिवहन उद्योग एकूण रोजगार २०१६-१७ | १,१२,८८,३८७ | ८०,३९,५६५ | २२,८५,३६५ | ४१,५५,६६४ | १,०१,९७,०१४ | ३,५९,६५,९९५ |

तक्ता १०

| विभाग | प्रती वर्ष | नवे रोजगार |
|---|---|---|
| एकूण रोजगार निर्मिती फॉर्मल क्षेत्र (ईपीएफओ, ईएसआयसी, एनपीएस) | | ७१,००,००० |
| सनदी लेखापाल, वकील, वैद्यक व्यवसाय | ६,०९,११६ | |
| इतर व्यावसायिक | ३,००,००० | |
| वाहतूक क्षेत्र | १९,९१,३५४ | |
| एकूण रोजगार निर्मिती इन्फॉर्मल क्षेत्र | | २९,००,४७० |
| प्रती वर्ष एकूण रोजगार निर्मिती | | १,००,००,४७० |

तक्ता ११

| योजना | एकूण |
|---|---|
| ईपीएफओ(नॉन झीरो) | ६,००,००,००० |
| सरकारीपरास्टांटल | २,५०,००,००० |
| ईएसआयसी | १,००,००,००० |
| संघटीत क्षेत्रातली एकूण रोजगार निर्मिती | ९,५०,००,००० |

तक्ता १२

| क्षेत्र | एकूण रोजगार |
|---|---|
| रोजगार एकूण स्थिती फॉर्मल क्षेत्र (ईपीएफओ, जीपीएफ, ईएसआयसी) | ९,५०,००,००० |
| व्यावसायिक | १,०८,३७,५३१ |
| वाहतूक क्षेत्र | ३,५९,६५,९९५ |
| रोजगार एकूण स्थिती इन्फॉर्मल क्षेत्र | ४,६८,०३,५२६ |
| रोजगार एकूण स्थिती | १४,१८,०३,५२६ |

क्षेत्र मिळून भारतात दर वर्षी १ कोटी रोजगार निर्मिती होते. हा आकडा प्रत्यक्षापेक्षा कदाचित कमी असेल कारण अनेक इन्फॉर्मल क्षेत्राचा आणि लघु,सूक्ष्म आणि मध्यम उद्योगाचा यात विचार करण्यात आलेला नाही.व्यापक आकडेवारी आणि माहिती विश्लेषण करूनच रोजगारविषयक संपूर्ण चित्र मिळेल.

**परिवहन उद्योग,एकूण रोजगार**

यालेखात, वर्षातला रोजगाराचा ओघ निश्चित करण्यासाठी आम्हीस्वत:ला काही संघटीत व्यवसाय आणि वाहतूक क्षेत्रापुरताच मर्यादित ठेवले आहे.

विविध अभ्यास अहवालात, भारतात एकूण सक्रीय श्रम शक्ती अंदाजे ५० कोटी आहे(एनएनएसओ २०१२ वर आधारित अंदाज)जागतिक बँकेनुसार, कृषी क्षेत्राचे योगदान सुमारे ४३ टक्के, तर उद्योग आणि सेवा क्षेत्रात २८.५ कोटी कार्यबळ राहिले. ९.५ कोटी फॉर्मल रोजगार राहिले असे आपण तक्ता क्रमांक ११ नुसार म्हणू शकतो.यामुळे फॉर्मल क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करणारा भारत हा तिसऱ्या क्रमांकाचा देश ठरला आहे. चीन आणि अमेरिकेनंतर भारताचा क्रमांक आहे.

परिवहन क्षेत्र आणि व्यावसायिक क्षेत्रातले रोजगार लक्षात घेतले तर हा आकडा ४.७ कोटी होईल.याचाच अर्थ इन्फॉर्मल क्षेत्रातले उरलेले १४.३ कोटी रोजगार, हे ज्यांना विचारात घेतले गेले नाही अशा क्षेत्रातले आहेत.

भारताला खरे तर रोजगार निर्मितीची समस्या नव्हे तर वेतनाची समस्या आहे,असे या विश्लेषणातून स्पष्ट होत आहे.विशेषत: इन्फॉर्मल अर्थव्यवस्थेतील अपुरे वेतन (मासिक १५-२० हजार रुपये), यामुळे देशातले नागरिक सुखसोयींनी युक्त जीवन कंठू शकत नाहीत. सामाजिक सुरक्षा कवचाची वाढीव व्याप्ती, यासह रोजगार फॉर्मल क्षेत्रात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे ज्यायोगे,उत्तम आकडेवारी गोळा करून योग्य धोरण आखता येईल. रोजगार मांडणीसाठी आकडेवारी नसण्याची समस्या भारतात नाही ही महत्वाची बाब आहे.

योग्य आकडेवारी आणि माहिती सरकारकडे आहे,वेतनपटावर आधारित नियोजित दृष्टिकोन वापरून ही आकडेवारी व्यवस्थित करून अचूक आणि मौल्यवान माहिती पुरवता येऊ शकते हे घोष अहवालाच्या लेखकांनी सिध्द केले आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे या निर्विवाद आकडेवारीवरून हे सिद्ध होत आहे की रोजगार रहित विकास हा दावापूर्णपणे चुकीचा आहे. १९९१ ते २०१८ या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा ८.७ टक्के या वार्षिक गतीने विकास झाला असून अर्थव्यवस्था २७५ अब्ज डॉलर्स वरून २.६ ट्रिलियन डॉलर्स वर पोहोचली. ही वृद्धी रोजगार रहित वृद्धी असू शकत नाही. भारताचा सध्याचा वार्षिक ७.५ टक्के हा सकल राष्ट्रीय उत्पादन वृद्धीदर,वार्षिक किमान २.५ ते ३ टक्के रोजगार वृद्धीसाठी निश्चितच योगदान देणारा ठरेल. पंतप्रधानांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला रोजगारविषयक आणखी उत्तम आकडेवारीची गरज आहे ज्यामुळे फॉर्मल रोजगार निर्मितीवर भर देणाऱ्या उत्तम धोरणावर लक्ष केंद्रित करता येईल

■■■

*टी व्ही मोहनदास पै हे मणिपाल ग्लोबल एज्युकेशन सर्व्हिसेसचे अध्यक्ष आहेत. यश बैद हे ३ वन ४ कॅपिटलचे संशोधन प्रमुख आहेत.*

*ई मेल: mohan.pai@manipalglobal.com) (E-mail: yashbaid@3one4capital.com)*

आशा

# भारतातील रोजगार : सुधारणारे चित्र

-सुरजीत एस भल्ला




**विद्यमान सरकारने हाती घेतलेल्या काही सुधारणांमुळे रोजगाराला चालना मिळाली आहे. उदा. रस्ते निर्मितीवर भर, मुद्रा उपक्रम,(लघु उद्योजकांना कर्ज पुरवण्याची तरतूद), आस्थापनात,नवे कामगार घेणाऱ्या मालकाला वेतन अनुदान(भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांचे योगदान सरकार भरणार)**

भारतातल्या रोजगाराच्या स्थितीबाबत तीर्था दास आणि मी नुकत्याच केलेल्या संशोधनाचा संक्षिप्त सारांश म्हणजे हा पेपर आहे. २०१७-१८ मधे रोजगार वृद्धी सुमारे १३ दशलक्ष इतकी म्हणजेच मजबूत होती.या वृद्धीकडे नेणाऱ्या काही धोरणांची आम्ही इथे चर्चा करणार आहोत. २०१८ च्या वित्तीय वर्षात रोजगारात वाढ दिसत असल्याचे एक कारण असू शकते ते म्हणजे, सलग दोन दुष्काळ,विमुद्रीकरण आणि वस्तू आणि सेवा कर या मोठ्या आर्थिक सुधारणा यामुळे आधीच्या वर्षी रोजगार पातळी सर्वसाधारण पातळीच्या खाली होती त्या पार्श्वभूमीवर नंतरच्या वर्षात रोजगारात वाढ ठळकपणे दिसत आहे.

रोजगाराशी संबंधित काही महत्वाच्या प्रश्नांचे, शंकांचे समाधान करण्याचा माझा प्रयत्न आहे.

### रोजगाराचा अंदाज

गेल्या चार वर्षातल्या रोजगार निर्मितीच्या स्थितीविषयी अनिश्चितता आहे.नॅशनल सॅम्पल सर्व्हे कार्यालयाकडून, रोजगाराविषयी मोठ्या प्रमाणात सर्वेक्षणाच्या अभावामुळे ही अनिश्चितता निर्माण झाली. २०११-१२ मध्ये असे शेवटचे सर्वेक्षण झाले होते.एन एस एस ओ चे सर्वेक्षण भारतासाठी गोल्ड स्टॅंडर्ड म्हणजे दर्जेदार मानक समजले जाते.

विद्यमान सरकारने हाती घेतलेल्या काही सुधारणांमुळे रोजगाराला चालना मिळाली आहे. उदा. रस्ते निर्मितीवर भर, मुद्रा उपक्रम,(लघु उद्योजकांना कर्ज पुरवण्याची तरतूद), आस्थापनात,नवे कामगार घेणाऱ्या मालकाला वेतन अनुदान(भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांचे योगदान सरकार भरणार).

अशा महत्वाच्या विषयावर आकडेवारी नसणे ही दुर्दैवाची बाब आहे.केंद्र सरकारने ही बाब लक्षात घेऊन ऑक्टोबर २०१८ पासून नागरी भागात मोठ्या प्रमाणात तिमाही रोजगार सर्वेक्षण आणि ग्रामीण भागात वार्षिक रोजगार सर्वेक्षण हाती घ्यायचा निर्णय घेतला आहे.

एनएसएसओ साधारणत: दर पाच वर्षांनी सर्वेक्षण करते.जुलै २०१७-जून २०१८ या काळासाठीचा एनएसएसओ च्या सर्वेक्षणासाठी हाऊस होल्ड इंटरव्ह्यू नुकतेच पूर्ण करण्यात आले. या सर्वेक्षणाचे प्राथमिक निकाल चालू वर्षाच्या अखेरीला उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत ही चर्चा, रोजगार सुधारणा,व्यापक कार्यक्रम यावर आधारित खाजगी अनुमानावर आधारित असेल.

### भारतातली रोजगार वृद्धी – ऐतिहासिक विक्रम

२००४-०५ पासून तरी भारतात जोमदार रोजगार निर्मिती झालेली नाही. १९९९-२००० आणि २००४-०५ या काळात वेगाने म्हणजे दर वर्षी २.४ टक्के या गतीने रोजगार वृद्धी झाली म्हणजे वार्षिक सुमारे ९.७ दशलक्ष रोजगार लाभ.सकल देशांतर्गत उत्पादन वार्षिक सुमारे ५.६ टक्के.



एनएसएसओ च्या आकडेवारीनुसार( २००४-०५ ते २०११-१२) या काळात सकल राष्ट्रीय उत्पादन वृद्धी दर सर्वोच्च होता. चक्रवाढ वार्षिक विकास दर ७.८ टक्के होता.मात्र या सात वर्षाच्या काळात केवळ नव्या रोजगार निर्मितीत ११ दशलक्षची भर पडली. २०११-१२ या काळासाठी जोमदार रोजगार निर्मितीच्या विरुध्द अनेक घटक होते.या काळातली पहिली दोन वर्षे, २०१४-१५ आणि २०१५-१६ ही वर्षे दुष्काळाची होती गेल्या दीडशे वर्षात सलग दोन वर्षे दुष्काळ पडण्याची ही पाचवी वेळ. दुष्काळामुळे आर्थिक विकास आणि ग्रामीण कृषी रोजगारावर परिणाम होतो.

त्यानंतरची दोन वर्षे हवामान परिस्थिती ठीक होती मात्र विमुद्रीकरण आणि वस्तू आणि सेवा कर या दोन मोठ्या आर्थिक सुधारणा हाती घेण्यात आल्या.या दोनही सुधारणांमागे अनेक उद्देश होते,विमुद्रीकरणाचा प्रत्यक्ष कर तर वस्तू आणि सेवा कराचा अप्रत्यक्ष कर संकलनावर लक्षणीय परिणाम आहे.या दोनही सुधारणांमुळे सुरवातीला अनिश्चितता दिसून आल्याने अल्प काळासाठी आर्थिक वृद्धी आणि रोजगार निर्मितीवर त्याचा परिणाम झाला.

समस्यांनी ग्रासलेले बँकिंग क्षेत्र सध्याच्या सरकारला मिळाले. राष्ट्रीयीकृत बँकांची अनुत्पादित मालमत्ता दशकातली सर्वोच्च म्हणजे ८ टक्के होती.बँकिंग क्षेत्रातल्या सुधारणा म्हणजे अल्प काळासाठी विकासावर परिणाम.

वृद्धीमधे घसरणीला कारणीभूत ठरणारे घटक मोठ्या प्रमाणात नसल्याने भारतीय अर्थव्यवस्थेने २०१४ नंतर रिअल पॉलिसी दरात मोठी वाढ पाहिली. मे २०१४ मध्ये वित्तीय रेपो दर ८ टक्के होता तर ग्राहक किंमत निर्देशांक ८.३ टक्के होता.,म्हणजेच रिअल पॉलिसी रेट - ०.३ टक्के. २०१७-१८ या आर्थिक वर्षात सरासरी रिअल पॉलिसी रेट २.५ टक्के होता,आर्थिक वर्ष २००५ मध्ये भारतात रेपो सुरू झाल्यापासूनचा सर्वात जास्त दर,( त्या वेळी रिअल पॉलिसी दर २.१ टक्के होता) तर वित्तीय वर्ष १८ मध्ये जगात तिसरा होता(ब्राझील आणि रशिया मागोमाग)

### रोजगार आवश्यकता

बेरोजगारीचा दर स्थिर ठेवण्यासाठी, आवश्यकता असलेल्या रोजगाराचा आकडा अनेकदा दहा ते बारा दशलक्ष असा नमूद केला जातो. २००४-०५ पासून हा निष्कर्ष योग्य नसल्याचे आम्हाला आढळून आले कारण त्या वर्षात आवश्यक दर होता,प्रति वर्ष, १०.२ दशलक्ष रोजगार. २०११ पर्यंत ही गरज कमी करून ८.३ दशलक्ष करण्यात आली. २०१७ मध्ये केवळ ७.५ दशलक्ष ची गरज होती. २०२२ साठी ही गरज कमी होऊन ती ६.९ दशलक्ष करण्यात आली.

### रोजगार विस्तार धोरण

विद्यमान सरकारने रोजगाराला चालना मिळण्याच्या दिशेने काही सुधारणा हाती घेतल्या आहेत. उदा. रस्ते बांधणीवर भर (श्रम विषयक काम),मुद्रा योजना,(लहान उद्धोजकांना कर्ज पुरवठ्याची सोय)आणि नवे कामगार घेणाऱ्या मालकाला वेतन अनुदान,( भविष्य निर्वाह निधी साठी मालकाचे योगदान सरकार भरणार).

बांधकाम क्षेत्रातल्या सकल राष्ट्रीय उत्पादन वृद्धीची, वित्तीय वर्ष १८ मध्ल्या वाढीत मोठी भूमिका आहे. वित्तीय वर्ष २०१८ मध्ये बांधकाम क्षेत्रात सकल राष्ट्रीय उत्पादनात झालेली ५.८ टक्के वृद्धी ही गेल्या सहा वर्षातली सर्वात सर्वात मोठी वाढ आहे.वित्तीय वर्ष १८ मध्ये बांधकामाला



संख्या, येत्या पाच वर्षात २.५ दशलक्ष ने वाढण्याची अपेक्षा आहे.(२०१७ मधल्या २३६.२ दशलक्ष वरून २०२२ मध्ये २३८.७ दशलक्ष). युवकांची व्यापक व्याख्या घेतली, (१५-३४ वर्षे) तरी येत्या पाच वर्षात, केवळ ११.७ दशलक्षची वाढ होईल. २०१२ आणि २०१७ मधे हा दर जवळजवळ दुप्पट होता.

शैक्षणिक नोंदणीतही मोठी वृद्धी दिसून आली. २००४-०५ आणि २०११-१२ यामधल्या काळात,शाळा अथवा महाविद्यालयात जाणाऱ्यांची संख्या ४० दशलक्ष ने वाढली. (१५ वर्षापेक्षा कमी वर्ष वयोगट).येत्या सहा वर्षात, शैक्षणिक नोंदणीत वाढ होऊन, २०११-१२ मधल्या १०१ दशलक्ष वरून ती २०१७ मध्ये ११२ दशलक्ष झाली,असे अनुमान आहे.

भारतात, महिलांचा, श्रम बळ सहभाग दर कमी झाला असून त्याबाबत गैरसमज झाला आहे.जास्तीत जास्त महिला शाळा आणि महाविद्यालयात जात आहेत. त्यामुळे निम्मी घट दिसत आहे. दुसरे म्हणजे महिलांचा श्रम बळ दर घटत आहे त्याच दराने पुरुषांचा सहभाग दरही घसरत आहे. २४ वर्षावरील महिलांचा श्रम बळ सहभाग २००९ पासून स्थिर राहिला आहे.महिलांमधल्या वाढत्या शैक्षणिक प्रमाणामुळे त्यांचा, श्रम सहभाग आणि रोजगार, भविष्यात वाढणार आहे.

■■■

*लेखक पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेवर अर्धवेळ सदस्य आहेत.*

*ई मेल: ssbhalla@gmail.com*

मिळालेली गती ही गेल्या २० वर्षात मिळालेली सर्वोच्च होती. २०१८ या वित्तीय वर्षात बांधकाम क्षेत्राने १.७ ते ३ दशलक्ष रोजगार उपलब्ध केल्याचे अनुमान आहे.

### रोजगार वृद्धीचे खाजगी अनुमान

आतापर्यंत रोजगार वृद्धीचे तीन अनुमान उपलब्ध आहेत.सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन कंपनी या खाजगी कंपनीनकडून मुंबई शेअर बाजाराच्या सहकार्याने,देशभरातले रोजगार विषयक मासिक अनुमान,जानेवारी २०१६ पासून प्रसिद्ध करण्यात येत आहे.या आकडेवारीनुसार मे २०१७ ते एप्रिल २०१८ या काळात ३ दशलक्ष रोजगार घटले.

दुसरे अनुमान म्हणजे पुलक घोष (प्रोफेसर, आय आय एम,बंगलोर) आणि सौम्या घोष (एसबीआय) यांचा जॉईंट पेपर आहे. वेतनपटाशी संबंधित 'टुवर्डस पे रोल रिपोर्टिंग इन इंडिया' या पेपरमध्ये वेतनपटावर आधारित,भारतातील रोजगार बदलाशी संबंधित भारतातले पहिले अनुमान त्यानी प्रकाशित केले. रोजगारात वाढ झाल्याचे पाहिले अनुमान त्यांनी मार्च २०१८ मध्ये केले, अकृषक ७ दशलक्ष रोजगार निर्माण झाल्याचे अनुमान त्यांनी सांगितले.त्यांच्या नुकत्याच म्हणजे २०१८ च्या जुलै १८ मधल्या अनुमानानुसार, १८ या वित्तीय वर्षात किमान १० दशलक्ष रोजगार निर्माण झाले.

तिसरे अनुमान तीर्था दास आणि मी केले असून त्यानुसार १८ या वित्तीय वर्षात १२.८ दशलक्ष रोजगार निर्माण झाले. आमचे अनुमान व्यापक आकडेवारीवर आधारित आहे.( उदा.वर चर्चा केल्याप्रमाणे, बांधकाम क्षेत्रातली सकल राष्ट्रीय उत्पादन वृद्धी), ई पी एफ ओ आकडेवारी(१८-२१ वर्षाच्या व्यक्तींसाठी) २०१४ आणि २०१५ मधले श्रम बळ सर्वेक्षण आणि २०१६ आणि २०१७ मधली बेरोजगारी विषयी सीएमआयईची आकडेवारी.

### लोकसंख्या भारतासाठी अनुकूल

डेमोग्राफीक डिव्हिडंड आणि लोकसंख्येचा उच्च दर या बाबी आता मागे पडल्या. राष्ट्रीय प्रजनन दर आता

प्रति महिला, २.१ बालक असा तर लोकसंख्या वृद्धी दर केवळ वार्षिक १.१ टक्के असा कमी झाला आहे. दोन दशकांपूर्वी हा दर १.८ होता. १५-२४ या वयोगटातल्या युवांची

मुलाखत

# नवप्रवर्तन व उद्यमशीलता- रोजगार निर्मितीची गुरूकिल्ली

- अमिताभ कांत



**रोजगार निर्मितीसाठी आवश्यक घटक व सरकारने रोजगारवाढीसाठी केलेले प्रयत्न याबाबत निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांची योजनाच्या चमूने घेतलेली मुलाखत. या मुलाखतीत अमिताभ कांत यांनी भारतातील रोजगारासंबंधी सविस्तर विवेचन केले आहे.**



**प्र. भारतीय युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात नेमकी कुठली आव्हाने आहेत?**

भारतात युवकांची संख्या सर्वाधिक आहे. १५ ते २९ वयोगटातील युवकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या २७ टक्के आहे. युवकांच्या या शक्तीचा वापर करून भारत हा जगाची कौशल्य विकासाची राजधानी बनू शकतो. यात अनेक प्रकारची आव्हाने आहेत. एक म्हणजे शिक्षणाची कमी पातळी, दुसरे म्हणजे शाळा व महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांची गळती म्हणजे शिक्षण अर्ध्यावर सोडणे यामुळे भारतीय युवक हे रोजगार देण्यास लायक राहत नाहीत. त्यामुळे विविध भागांमध्ये आर्थिक वाढही सारखी राहत नाही. त्याचे युवकांना मिळणारे फायदेही सारखे राहत नाहीत. अनेक युवकांकडून कमी कौशल्याची कामे स्वीकारली जातात. मग त्यांच्यातले काही जण शेतात काम करतात. काही जण बांधकाम क्षेत्रात मजुरी करतात. काही जण उत्पादन क्षेत्रात सुरूवातीच्या पातळ्यांवर काम करतात. ही सगळी मुले १५ ते १७ वयोगटातील असतात. १८ ते २९ वयोगटातील काही जण व्यापार व दुरूस्ती कामे तसेच वाहतूक क्षेत्राकडे वळतात यात काही जण त्याखालोखाल बांधकाम, उत्पादन व कृषी क्षेत्राकडे वळतात. आता यात बेरोजगारीचा दर पाहिला तर तो शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच वाढतो आहे. पदवीधर व त्यापेक्षा अधिक शिकलेल्यात बेरोजगारीचे प्रमाण १८.४ टक्के आहे. प्राथमिक शिक्षणापर्यंतच्या पातळीवर हे प्रमाण ३ टक्के आहे. यात १५-२९ वयोगटातील ८५ टक्के युवकांनी नेहमीच्या सरधोपट शिक्षणक्रमांना प्रवेश घेतलेला असतो. केवळ १२.६ टक्के मुले व्यावसायिक शिक्षण घेतात तर २.४ टक्के कौशल्याधारित शिक्षण घेतात. याशिवाय संघटित क्षेत्रात रोजगार वाढवण्याची गरज आहे. एकूण आठ टक्के लोक संघटित क्षेत्रात काम करतात बाकीचे कमी वेतन असलेल्या असंघटित क्षेत्रात काम करीत आहेत. सहावीनंतर व्यावसायिक किंवा कौशल्याधारित शिक्षणास प्राधान्य देणाऱ्या शिक्षण संस्था सुरू करण्याची गरज आहे त्यामुळ नेहमीच्या शिक्षण पद्धतीमधील त्यांचे स्वारस्यही कायम राहील.शाळा ते नोकरी किंवा उद्योग या स्थित्यंतरात त्यांना आधीच रोजगारासाठीची कौशल्ये अर्जित करण्यास सक्षम केले पाहिजे. यात युवकांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची निवड करण्यावर भर देण्यास सांगितले पाहिजे कारण पारंपरिक शिक्षणातून सहजपणे रोजगार मिळत नाही. या तंत्रज्ञान व कौशल्य संस्था कमी उत्पन्नातील लोकांच्या आवाक्यात नाहीत. कारण त्यातील बहुतांश खासगी क्षेत्रात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना यात शुल्कामध्ये सवलत किंवा अनुदान यातील एक मार्ग निवडून प्रोत्साहन द्यायला हवे.

---

**सध्याच्या काळात भारत हा वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असलेला देश आहे, आपल्या देशाकडे मनुष्यबळ अधिक आहे, मनुष्यबळाचे रूपांतर योग्य कौशल्य प्रशिक्षणाच्या मदतीने उत्पादनक्षम मनुष्यबळात केले तर त्याचा उपयोग देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्यासाठी करून घेता येईल.**

---

**प्र. २०२२ पर्यंत भारताचे रोजगारक्षम मनुष्यबळ ६० कोटी असणार आहे ते पाहता भारतीय मनुष्यबळासाठी रोजगारासाठी कोणती नवीन क्षेत्रे पुढे येताना दिसत आहेत. ?**

सध्या तरी भारताची अर्थव्यवस्था ही लोकसंख्यात्मक घटकांच्या आधारे प्रगती करीत आहे. हे लोकसंख्यात्मक भांडवल सकल राष्ट्रीय उत्पन्नात तेव्हाच योगदान देऊ शकते जेव्हा मनुष्यबळ कुशल असेल त्यासाठी मनुष्यबळाचे रूपांतर उत्पादनक्षम मनुष्यबळात करणे महत्वाचे आहे. २०१३-१४ च्या उद्योग पाहणीनुसार कोक व शुद्ध पेट्रोलियम उत्पादने,मूलभूत धातू, अन्न उत्पादने, रसायने व तत्सम पदार्थ, मोटर वाहने, ट्रेलर्स व सेमी ट्रेलर्स या क्षेत्रात राज्यांचे योगदान एकूण उत्पादनात ८० टक्के आहे. एकूण औद्योगिक उत्पादनाच्या पन्नास टक्के उत्पादन हे भांडवलाधिष्ठित उद्योगातून येते. कुठल्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत आहेत याची वर्गवारी करायची म्हटली तर काही राज्यांचा शेती क्षेत्रातील रोजगाराचा वाटा राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. काही राज्यांचा उत्पादन क्षेत्रातील रोजगाराचा वाटा राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. बांधकाम व्यवसाय तसेच घाऊक व किरकोळ व्यापार तसेच सेवा क्षेत्रात असाच कल दिसून येतो. भारताची रोजगार परिसंस्था बदलत आहे. तंत्रज्ञामुळे रोजगाराचे म्हणजे कामाचे स्वरूप बदलत आहे. त्यातून काही रोजगार कमी होताना नवीन रोजगार वेगळ्या स्वरूपात निर्माण होत आहेत. कारण तंत्रज्ञानामुळे काही प्रक्रिया बदलल्या आहेत. रस्ते, जहाज उद्योग,स्मार्ट सिटी, शाश्वत उर्जा,वाहतूक व रेल्वे,विमानतळे, मालवाहतूक मार्गिका, यातून नवीन रोजगार निर्माण होत आहेत. अटल नवप्रवर्तन योजनेत महिलांच्या उद्यमशीलतेवर भर दिला आहे. मुद्रा व स्टार्ट अप, स्टँड अप योजनांमुळे ग्रामीण व शहरी भागात रोजगार संधी निर्माण होत आहेत त्यातील काही रोजगार हे कमी कौशल्याचे असू शकतील. या शिवाय माहिती तंत्रज्ञान,दूरसंचार, बँकिंग, आर्थिक सेवा, आरोग्य, किरकोळ विक्री, पर्यटन, स्वयंचलित वाहने, आदरातिथ्य उद्योग यातही रोजगार निर्मिती होत आहे. यातून एकच दिसते ते म्हणजे रोजगार धोरण ठरवताना सेवा व उत्पादन क्षेत्र या दोन्हीवर पुरेसा भर द्यायला हवा. त्यातून भारतात सध्या अनेक राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील रोजगारांचे शैक्षणिक व कौशल्यावर आधारित स्वरूप बदलेल. यामुळे एकूणच रोजगारातील कमतरता, संघटित क्षेत्रातील रोजगारांची कमी असलेली संख्या, महिलांसाठी रोजगारांची कमी या सगळ्या उणिवांवर उपाय काढणे शक्य होणार आहे.

**प्र. तुम्ही एकेठिकाणी असे म्हटले आहे की, भारतातील शिक्षण पद्धती ही केवळ पदव्यांपेक्षा कौशल्यावर भर देणारी असावी, यावर जरा सविस्तरपणे सांगा..**

भारतातील कामगार बाजारपेठेचे अवलोकन केले तर त्यात अनेक विरोधाभास दिसतात.कुठल्याही नोकरीसाठी लाखो जणांचे अर्ज येत असतात. पण जर त्या नोकरीसाठी आवश्यक असलेली कौशल्ये नसतील तर अशा लोकांना नोकरी मिळत नाही व अशांची संख्या जास्त असते. पूर्वीच्या काळात उत्पादन क्षेत्रात केवळ जुळणीचे जे कौशल्य लागत होते ते आता पुरेसे नाही आता अनेक गुंतागुंतीचे कौशल्ये आवश्यक असतात. याचे कारण तंत्रज्ञान बदलले आहे. आजच्या तंत्रज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेत कुठल्या व्यवसायांची भरभराट होईल व कुठल्या नाही हे सांगता येणे कठीण आहे. यात मुख्य आव्हान हे उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन कौशल्याधारित शिक्षणावर भर देणे हे आहे, या प्रशिक्षणातूनच सक्षम कर्मचारी तयार होऊ शकतात. यात दोन प्रकारचा दृष्टिकोन ठेवता येतो एक म्हणजे सर्वच व्यवसायात हस्तांतरित होऊ शकतील अशा कौशल्यांचा वापर.दुसरे म्हणजे उद्योगांना जी कौशल्ये हवी आहेत ती विशिष्ट कौशल्ये आंतरवासियता कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना देणे.

---

**भारतात नोकऱ्यांसाठी आवश्यक असलेली पूरक परिसंस्था बदलताना दिसत आहे. तंत्रज्ञानाधिष्ठित क्षेत्रांची वाढ होत असून त्याचा परिणाम रोजगार निर्मितीवर सकारात्मक पद्धतीने होत आहे. नवीन रोजगार निर्माण होत आहेत. हे नवीन रोजगार जुन्या रोजगारांची जागा घेत आहेत. त्यात जुनी कामाची पद्धत सोडून कामगारांना नवी कौशल्ये शिकावी लागत आहेत. काही ठिकाणी तंत्रज्ञान व प्रक्रिया संपूर्णपणे वेगळ्या असल्याने रोजगाराचे स्वरूप व त्यासाठी लागणारी कौशल्ये पूर्णपणे वेगळी व नवीन आहेत.**

---

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातून जी आकलनात्मक कौशल्ये निर्माण होतात ती इतर कौशल्ये आत्मसात करण्यासाठी मूलभूत आहेत. मूलभूत कौशल्यामुळेच तुम्ही इतर कौशल्ये कामाच्या ठिकाणी आत्मसात करू शकता. चांगले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मिळालेली मुले ही तंत्रकौशल्येही सहज आत्मसात करू शकतात.शाळकरी मुलांसाठी व्यावसायिक शिक्षणाचा भाग मजबूत केल्याने माध्यमिक शाळेत काही कौशल्ये आत्मसात करून नोकरी धंदा

**तुलनेने खूपच जास्त मनुष्यबळ असलेल्या भारतासारख्या देशात इतर विकसनशील देशांनी त्यांच्या आर्थिक प्रवासात अंगिकारलेल्या रचनात्मक बदलांचा अवलंब करण्यात आला नाही. तंत्रज्ञान क्रांतीने आपल्या रोजगारांवर परिणाम करण्याच्या खूप आधीच आपण कृषी आधारित अर्थव्यवस्थेकडून सेवा क्षेत्रावर आधारित अर्थव्यवस्थेकडे वळलो आहोत.**

करू इच्छिणाऱ्या मुलांना त्यामुळे सोय होऊ शकते. काही ठिकाणी शाळेतील शिक्षण व कार्यानुभवातून शिक्षण यावर पूर्ण भर दिलेला असतो. अशा प्रकारची उदाहरणे ऑस्ट्रिया, झेक प्रजासत्ताक, डेन्मार्क, हंगेरी, नेदरलँडस, स्लोवाक प्रजासत्ताक, स्वित्झर्लंड येथे पाहावयास मिळतात. कार्यानुभवावर आधारित शिक्षण घेऊन सार्वजनिक व खासगी भागीदारी करता येते यात नियोक्त्यांची भूमिका ही व्हीइटी कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्वाची ठरते. हरयाणा, हिमाचल प्रदेश, केरळ यांनी माध्यमिक पातळीवरच व्यवसाय शिक्षण सुरू केले आहे.महाविद्यालयातही बी .व्होक पदव्या सुरू केल्या आहेत. यात मुलांना सामान्य शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणही मिळते. त्यामुळे पदवी घेईपर्यंत ते रोजगार बाजारपेठेत स्वतला सिद्ध करण्यासाठी सज्ज असतात. मनुष्यबळ विकास मंत्रालयाने पदवी खालच्या पातळीवर १००० तास व्यावसायिक घटकाला देण्याचे ठरवले आहे. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी बीए, बीएस्सी व बी.कॉम या सर्व पदवी अभ्यासक्रमात आता सौम्य कौशल्ये, माहिती तंत्रज्ञान यासारखी कौशल्ये शिकवण्याचा प्रस्ताव आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे राष्ट्रीय कौशल्य विकास धोरणाशी संलग्न करणे तसेच राष्ट्रीय कौशल्य पात्रता यंत्रणा ही व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमांशी जोडणे आवश्यक आहे. मुलांना वेगळा विचार करण्याची सवय लागावी यासाठी अटल टिंकरिंग लॅब हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यातून त्यांना काही व्यवहार्य कौशल्ये मिळवता येतात. प्रत्येक शाळेने मुलांच्या कल चाचणीची व्यवस्था करून समुपदेशक ठेवणे गरजेचे असते. लघु मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम हे राष्ट्रीय आंतरवासियता कार्यक्रमांशी निगडित केले पाहिजेत. त्यातून विद्यार्थी रोजगारक्षम बनू शकतील. त्यांना रोजगार मिळवताना स्थानिक गरजांचा विचार करून आधीच शिक्षण देता येईल.

**प्र. रोजगार निर्मितीची क्षमता कोणत्या क्षेत्रांमध्ये अधिक आहे.?**

कामगारांची अतिरिक्त उपलब्धता असलेल्या भारतासारख्या देशात अजून विकसित देशांच्या प्रवासात आलेले स्थित्यंतरे अंगिकारण्यात आलेली नाहीत. सध्या आपण कृषीधिष्ठित आर्थिक वाढीकडून सेवा क्षेत्रावर आधारित वाढीकडे वाटचाल केली आहे. तंत्रज्ञानाधित क्रांतीने आपल्या रोजीरोटीवर परिणाम करण्यास सुरूवात केली त्याआधीपासून आपण सेवा क्षेत्राकडे वळलो आहोत. सेवा क्षेत्राने नंतर डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरूवात केली. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर युवक हे सेवा क्षेत्राकडे रोजगाराच्या आशेने पाहून लागले. कौशल्ये व फेरकौशल्य म्हणजे सुधारित कौशल्यांचे प्रशिक्षण याशिवाय भारतापुढे मोठ्या लोकसंख्येचा उपयोग करून घेण्याचे आव्हान आहे. नवीन रोजगारांचे स्वरूप, नवीन कौशल्यांची आवश्यकता आजच्या डिजिटल युगात लागणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरातून चौथी औद्योगिक क्रांती जन्म घेत आहे. यापुढे रोजगारांचे विभागवार वर्गीकरण होण्याऐवजी त्यांचे एकात्मीकरण होईल. माहिती तंत्रज्ञानाशी एकात्मिक अशा रोजगारांचे प्रमाण यात वाढू शकते. आता निव्वळ उत्पादन क्षेत्राशी नोकऱ्या शिल्लक आहेत. त्यातील बाकी रोजगार आता सेवा क्षेत्राकडे हस्तांतरित झाले आहेत. माहिती विश्लेषण,कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज म्हणज आयओटी, क्लाउड कॉम्प्युटिंग, व्हर्च्युअल रिॲलिटी, ब्लॉक चेन, विद्युत वाहने या क्षेत्रात उच्च कौशल्य रोजगार निर्माण होतील. त्या जास्त पगाराच्या नोकऱ्या असतील. कमी शिक्षण व कमी कौशल्ये असलेल्या लोकांसाठी कापड उद्योग, आतिथ्य, चर्मोद्योग, पर्यटन, बांधकाम क्षेत्र यात संधी असतील. ग्रामीण व शहरी भागात तंत्रज्ञानाधारित उद्यमशीलता वाढत जाणार आहे. स्टार्ट अप इंडिया, मुद्रा, स्टँड अप इंडिया, स्वच्छ भारत यातून रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. त्यात काही रोजगार हे कमी कौशल्यावर आधारित असतीली. सरकार धोरणात्मक बाबींवर काम करीत असून त्यात कृषी, पायाभत सुविधा, स्वयंचलित वाहने, कापड उद्योग व चर्मोद्योग यात नवीन रोजगार तयार होत आहेत. जुन्या कामगारांना नवीन कौशल्ये शिकावी लागतील तर नव्याने येणाऱ्या तरूणांना ती आधीच आत्मसात झालेली असतील.

**प्रश्न- रोजगार निर्मितीसाठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे व उद्यमशीलतेची वृत्ती निर्माण करणे गरजेचे आहे असे तुम्हाला वाटते का?**

उद्यमशीलता ही रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे. त्याबरोबर नवनवीन संकल्पनांची निर्मिती आवश्यक आहे, त्यातून रोजगार वाढू शकतात. भारताच्या संदर्भात सांगायचे तर मोठ्या मनुष्यबळाचा फायदा आपण घेतला पाहिजे. कमी कौशल्ये व शिक्षण असलेल्यांनाही त्यांच्या क्षमतेनुसार रोजगाराच्या संधी




मिळाल्या पाहिजेत. भारत सरकारने रोजगारनिर्मितीसाठी आधी लोकांची उद्यमशीलता वाढवण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या अंगी उद्यमशीलतेची वृत्ती वाढीस लागावी यासाठी वेगवेगळ्या योजनातून प्रोत्साहन दिले आहे. त्यासाठी कर्जे, बाजारपेठ सुविधा, जागा, नेटवर्क, मार्गदर्शक अशा सुविधा दिल्या आहेत. स्टार्ट अप इंडिया, इज ऑफ डुइंग बिझीनेस, स्टँड अप इंडिया, मुद्रा, अटल इनोव्हेशन योजना यांचा यात मोठा वाटा राहणार आहे. तंत्रज्ञानावर आधारित अनेक स्टार्ट अप उद्योग शिक्षण, इ व्यापार, आयटीइएस मध्ये सुरू झाले आहेत. त्यातून भारत हा स्टार्ट अपला अनुकूल परिस्थिती असलेला जगातील एक मोठा देश ठरला आहे. बीवायजेयू या शिक्षण विषयक ॲपची सुरवात जुलै २०१५ मध्ये झाली आता तीन वर्षांनी त्याचा मोठा विस्तार झाला आहे. दूरवैद्यक हाही एक मोठा विभाग खुला झाला आहे. ग्रामीण व पर्वतीय क्षेत्रातील लोकांना वैद्यकीय सल्ला बसल्या ठिकाणाहून देता येतो. त्यामुळे दूर कुठेतरी असलेल्या आरोग्य केंद्रात गर्दी करण्याची गरज उरलेली नाही. डॉक्टरांची कमतरता, विशेषज्ञ डॉक्टरांची कमतरता ही ग्रामीण भागात जास्त आहे, त्यासाठी आता काही ॲप तयार केले आहेत. त्यातून वैद्यकीय सल्ला देता येतो. या पोर्टलच्या संचालनासाठी पॅरामेडिक्सची गरज आहे. त्यात औषधतज्ञ, क्ष किरण तंत्रज्ञ, परिचारिका यांचा समावेश आहे. त्यातून अशा सेवा देणारे उद्योजक ग्रामीण व शहरी भारतात तयार होत आहेत.

**प्रश्न. अटल इनोव्हेशन मिशन (अटल नवकल्पना मोहीम) देशात रोजगार निर्मितीस कशा प्रकारे मदत करीत आहे.?**

अटल इनोव्हेशन मिशन ही सरकारची एक महत्वाची योजना आहे. ती निती आयोगाच्या अखत्यारीत असून त्यातून नवसंकल्पना व उद्यमशीलता यातून रोजगार निर्माण करण्याचे काम सुरू आहे. तरूणांनी रोजगार निर्माते बनावे, केवळ नोकरी मागणारे बनू नये यावर त्यात भर आहे. शाळा, स्वयंसेवी संस्था, विद्यापीठे, लघु व मध्यम उद्योग व कंपनी क्षेत्र यांना सामावून घेणारा सम्यक दृष्टिकोन यात आहे. त्यात सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांना समाविष्ट केले आहे. अटल इनोव्हेशन मिशनमध्ये अटल टिंकरिंग लॅब सुरू केल्या असून त्यात विद्यार्थ्यांना वेगळा व स्वतंत्र विचार करण्याची सवय लावली जात आहे.अटल इनक्युबेटर्सचा समावेश यात असून हजारो स्टार्ट अप त्यातून पुढे येत आहेत. अटल न्यू इंडिया चॅलेंजेस योजनेत उत्पादन नवप्रवर्तन व नवसंकल्पना याला उत्तेजन दिले आहे. या नव संकल्पना या राष्ट्रीय पातळीवर सामाजिक आर्थिक परिणाम साधतानाच नवीन रोजगार निर्माण करणाऱ्या असाव्यात अशी अपेक्षा आहे. देशातील ६५० हून अधिक जिल्ह्यात अशा ५४४ अटल टिंकरिंग लॅब सुरू करण्यात आल्या आहेत. १०१ अटल इनक्युबेटर्स तयार करण्यात आले आहेत. त्या प्रत्येकातून २५-३० अभिनव संकल्पनाधारित स्टार्टअप दर १८ महिन्यात निर्माण होत आहेत. अटल न्यू इंडिया चॅलेंजेसच्या एकूण २४ हून अधिक आवृत्त्यात कृषी, पिण्याचे पाणी, सांडपाणी प्रक्रिया, रेल्वे, वाहतूकीचे पर्याय या क्षेत्रांचा समावेश केला आहे. यात लघु उद्योग नवसंकल्पना व संशोधन पुढाकार म्हणजे एआयएम-एसबीआआयार ही योजना सुरू केली जात असून त्यात नवीन नोकऱ्या निर्माण होतील व उद्योगही उभे राहतील. यातून मेक इन इंडियाला प्रोत्साहन मिळणार असून त्यात तंत्रज्ञानाधिष्ठित निर्यात वाढणार आहे. आयातीवरचे अवलंबित्व कमी होणार आहे. एआयएम (अटल इनोव्हेशन मिशन) योजनेमुळे रोजगार निर्मितीला सर्व पातळ्यांवर प्रोत्साहन मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. यात शहरे, स्तर २ व स्तर २ शहरे तसेच ग्रामीण भागातही नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्ता तसेच नवीन उद्योग प्रारूपे यांना प्रोत्साहन मिळेल यात शंका नाही.

■■■

*अमिताभ कांत हे निती आयोगाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी आहेत.*

*ई मेल: amitabh.kant@nic.in*

दृष्टीक्षेप

# भारतीय अर्थव्यवस्था: रोजगारसंधींची भरभराट

-बिबेक देबरॉय



**सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे घडत आहेत. जसे, ग्रामीण भागांचा शहरी भागांत कायापालट, शेतीच्या क्षेत्रांत बिगरशेतींचे उद्योग, निर्वाहासाठी तात्पुरत्या रोजगारांपासून मासिक अथवा दैनिक वेतनाच्या रोजगारांच्या संधी, आजीवन नोकरी ऐवजी अल्प कालीन करार तत्वावरील नोकऱ्या, नियोक्ता-नोकरीदार पध्दतींच्या नोकरीऐवजी युवा पिढीचा स्वयंउद्योजकतेकडे कल इ. ही स्थित्यंतरे विकासाला समांतर किंवा एका क्रमाने न होता सर्वांगीण विकासाला पूरक न ठरता परस्पर विरूध्द परिणाम देऊन जातात.**

भारताच्या अर्थव्यवस्थेचे वर्तमान स्वरूप हे अनेक बाबतीत साचेबध्द नियमांना अनुसरून नाही. नजीकच्या भविष्यकाळातही हे स्वरूप अनेकार्थांनी अनौपचारिकच असेल. सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे घडत आहेत. जसे, ग्रामीण भागांचा शहरी भागांत कायापालट, शेतीच्या क्षेत्रांत बिगरशेतींचे उद्योग, निर्वाहासाठी तात्पुरत्या रोजगारांपासून मासिक अथवा दैनिक वेतनाच्या रोजगारांच्या संधी, आजीवन नोकरी ऐवजी अल्प कालीन करार तत्वावरील नोकऱ्या, नियोक्ता-नोकरीदार पध्दतींच्या नोकरीऐवजी युवा पिढीचा स्वयंउद्योजकतेकडे कल इ. ही स्थित्यंतरे विकासाला समांतर किंवा एका क्रमाने न होता सर्वांगीण विकासाला पूरक न ठरता परस्पर विरूध्द परिणाम देऊन जातात. विषम अर्थव्यवस्थेच्या आणि खंडीत मजूर बाजारपेठेत असे चित्र दिसणे सहाजिक आहे. अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेत तुलनेने मुबलक मनुष्यबळाचा पुरवठा असणारी क्षेत्र तसेच मनुष्यबळाचा अभाव असलेली क्षेत्रे एकाचवेळी अस्तित्वात असू शकतात. तसेच अकुशल अथवा अर्धकुशल कामगार असलेल्या व्यवस्थांसोबत जागतिक स्तरावरील विभालेल्या कुशल श्रमिक बाजारव्यवस्था एकाचवेळी एका मोठ्या व्यवस्थेचा एक भाग असू शकतात. याबरोबरच अचूक व विश्वसनीय रोजगाराची आकडेवारी मिळवण्यासाठी स्थानिक पातळीपासून घरोघरांच्या सविस्तर सर्वेक्षणातून मिळालेली माहिती उपयुक्त ठरते. केवळ उद्योगांच्या सर्वेक्षणांतून नियोक्ता- नोकरदार तत्वावर नोकरी करणाऱ्यांची आकडेवारी समजू शकत नाही. दुर्दैवाने सरकारी यंत्रणेद्वारे घराघरांचे सर्वेक्षण वरचेवर केले जात नाही. सर्वसाधारणपणे १० वर्षे किंवा पाच वर्षांच्या अंतरानेच असे सर्वेक्षण केले जाते. त्यादरम्यान काही लहान मोठे ठराविक क्षेत्रांपुरते मर्यादित बिगर सरकारी सर्वेक्षणांच्या माहितीची उपयुक्तता मर्यादित असते. त्यामुळे एकूणच रोजगारांची आकडेवारी देणारी माहिती असमाधानकारक आहे. अचूक रोजगार आकडेवारीच्या माहितीची आवश्यकता लक्षात घेऊन सुरूवातीला प्रतिवर्षी, तर या वर्षी पासून दर तिमाहीला रोजगार सर्वेक्षण करण्यात येते. वरचेवर रोजगार सर्वेक्षण, त्यातून मिळालेल्या आकडेवारीचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करण्यातून शासनाला लोकांना चांगल्या विकाससंधी उपलब्ध करण्याबाबत योग्य दिशा मिळते. कारण कोणताही विकास हा नागरिकांना चांगल्या रोजगारसंधी मिळवून देण्यास पूरक असावा. यासाठी केंद्र व राज्य सरकारांची भूमिका ही विकासाला अनुकूल वातावरण निर्मिती करण्याला प्रोत्साहित करणारी असावी

### व्यवसाय अनुपालन निधीची सुलभ उपलब्धता

वर्तमान शासनाच्या काही प्रमुख धोरणांपैकी एक म्हणजे व्यवसायाची पूर्तता करण्यासाठी भांडवली खर्चासह आवश्यक अनुपालन खर्चाच्या निधीची सुलभ उपलब्धता व व्यवसायाला आवश्यक सार्वजनिक स्तरातील

भौतिक व सामाजिक पायाभूत गरजांची व्यवस्था यांचा योग्य मेळ बसवणे हे होय. यातून व्यवसाय करण्यास अनेकांना प्रोत्साहन मिळेल यातूनच रोजगाराच्या नवनव्या संधी उपलब्ध होतील व उद्योजकतेचे प्रमाण वाढेल आणि विकासाला हातभार लागेल. भारतामध्ये उद्योजकतेला खूप वाव आहे परंतु, उद्योगांच्या भरभराटीसाठी एक ठोस कायदेशीर ओळख म्हणून उद्योजकतेची संस्कृती रूजलेली नाही. व्यावसायिकता, स्वयंरोजगार व उद्योजकतेची मानसिकता ही उद्यमशीलता संस्कृतीतून रूजावी या उद्देशाने शासनाने स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया तसेच मुद्रा योजना यांसारखे उपक्रम सुरू केले. या योजनांचे वैशिष्ट असे की, व्यवसाय सुलभतेबरोबरच काही कारणास्तव व्यवसाय बंद करण्याच्या अर्थात व्यवसाय निर्गमनाचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. वैयक्तिक आर्थिक अडचणींशिवाय इतर कारणाने व्यवसाय बंद करण्याचा पर्याय पहिल्यांदाच सरकारी योजनेतून देण्यात आला आहे.

शासन सर्वांनाच नोकऱ्या देऊ शकत नाही. तसेच प्रत्येकाने नोकरदार होणे हे देखील विकासाच्या दृष्टीने अपेक्षित नाही. आजीवन वेतनाच्या नोकऱ्या उपलब्ध करून देऊन नियोक्ता-नोकरदार अशा दोन वर्गाची विषम आकडेवारी वाढवणे विकासाला पोषक ठरत नाही. त्याऐवजी, रोजगारावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, जे अल्पकालीन आणि करारात्मक असू शकते.

### अचूक माहितीची आवश्यकता

रोजगारसंधींची वाढ आणि विकासाची गती एकसमान किंवा समांतर असेलच असे नाही. विकासाची रचना ज्या स्वरूपाची आहे त्यावर त्याचे नवनवीन उद्यम व रोजगारसंधीचे सकारात्मक निकाल अवलंबून असतात. बरेचदा अनेक क्षेत्रात भरभराट दिसत असली तरी बेरोजगारीच्या प्रमाणात काहीही घट होत नाही. राष्ट्रीय सर्वेक्षण संघटनेच्या २००४-०५ आणि २००९-१० मधील दोन सार्वत्रिक सर्वेक्षणांतूनही रोजगारवृध्दीविना आर्थिक विकास झाल्याची आकडेवारी दिसून येते. तसेच दोन्ही वेळी राष्ट्रीय सकल उत्पादनात सातत्याने वाढही दिसून आली. उपलब्ध आकडेवारीवरून करण्यात आलेले हे विश्लेषण परस्परविरोधी परिस्थिती एकाच वेळी अस्तित्वात असल्याचे दर्शवतो. उदाहरणार्थ, देशाचा सर्वसाधारण विकासदर ७ टक्के एवढा असतांना कामगार उत्पादकता देखील ७ टक्के असू शकेल का असा प्रश्न उपस्थित होतो. जर असे नसेल तर ७ टक्के विकासदर गाठल्यावर रोजगारवृध्दीही झाली असे म्हणता येईल. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीनुसार विकासदरातील वाढ रोजगारसंधींत वृध्दी असल्याचे द्योतक आहे. जर असे नसेल तर प्राप्त आकडेवारीच्या सर्वेक्षणांत गल्लत असू शकण्याची शक्यता आहे. अचूक माहितीवरून योग्य विश्लेषण मांडता येते. शेतीसारख्या व्यवसायात सर्वच नव्या रोजगारार्थीला शिरकाव करणे शक्य नाही. शेतीचे व्यापारीकरण व शेतीपूरक उद्योगांतूनही फारशा प्रमाणात समाधानकारक रोजगार मिळेल असे नाही. याशिवाय, आधुनिक उत्पादकता व्यवसायाही पूर्वीएवढा कामगार पूरक राहिलेला नाही. त्यामुळे रोजगार संधींसाठी सेवाक्षेत्रामध्येच संधी शोधल्या जातात.

**राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीनुसार विकासदरातील वाढ रोजगारसंधींत वृध्दी असल्याचे द्योतक आहे. जर असे नसेल तर प्राप्त आकडेवारीच्या सर्वेक्षणांत गल्लत असू शकण्याची शक्यता आहे. अचूक माहितीवरून योग्य विश्लेषण मांडता येते. शेतीसारख्या व्यवसायात सर्वच नव्या रोजगारार्थीला शिरकाव करणे शक्य नाही. शेतीचे व्यापारीकरण व शेतीपूरक उद्योगांतूनही फारशा प्रमाणात समाधानकारक रोजगार मिळेल असे नाही.**

### कामगार पूरक विकास

भारतीय अर्थव्यवस्था ही आर्थिकदृष्ट्या भांडवल पोषक नसून मनुष्यबळाने व्यापलेली आहे. या मानव संसाधनाचे योग्य नियोजन केल्यास अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांची उत्पादकता वाढून त्यानुषांने रोजगारसंधीही निर्माण होत राहतील.

भांडवलपूरक व्यवसाय असावा की मनुष्यबळावर निर्भर व्यवसाय करावा हा निर्णय केवळ मनुष्यबळाच्या कुशलतेच्या मूल्यावर निर्धारित होते. संघटित क्षेत्रामध्ये मानव संसाधनाचे मूल्य अधिक असते. यामध्ये केवळ वेतनमूल्य नसते तर कामगार कायद्याप्रमाणे ठरवण्यात आलेला अनुपालन खर्चही समाविष्ट असतो. १९९१ नंतरच्या काळात कामगार अनुपालन मूल्यात कोणतीही वाढ झालेली नाही किंबहुना काही प्रमाणात घटच झाली आहे. राष्ट्रीय श्रमसुविधा संकेतस्थळावर याबाबतची आकडेवारी देण्यात आली आहे. असे असतांना भांडवली उद्योग की कामगारपूरक उद्योग ही गुंतागुंत आजही सुटलेली नाही. याचे उत्तर व्यवसायाच्या संबंधित भांडवलाच्या आवश्यकतेत घट, त्याबरोबरच व्यवसाय व उद्योगांच्या स्थापनेसाठी शासकिय अनुदानाची उपलब्धता, कर सवलती इ. आर्थिक सवलतींमुळे भांडवली व्यवसायात

सुलभता हे असू शकते. तसेच दुसऱ्या बाजूचा विचार करता, सद्यकालीन शासनाच्या धोरणाप्रमाणे भांडवली लाभांऐवजी व्यवसाय व उद्योगांना कुशल मनुष्यबळ सहज उपलब्ध करून देऊन त्यातून नवीन रोजगारसंधी तयार व्हाव्यात, यावर भर दिला जात आहे.

आपल्या देशात काही भागांत तुलनेने खूप कमी मनुष्यबळ असून काही भागांत मनुष्यबळाची उपलब्धता अधिक प्रमाणात आहे. याचे कारण नियोक्ता व नोकरदार यांच्यात योग्य वेळी आवश्यकतेनुसार समन्वय साधणारा दुवा उपलब्ध नाही. नोंदणी न केलेले लेबर कॉन्ट्रॅक्टर जादा असल्यामुळेही या समस्येत भर पडते आहे. वर्तमान शासनाने या समस्येवर काही समाधान मिळवण्यासाठी राष्ट्रीय करियर सेवा संकेतस्थळ तयार केले आहे. तरिही काही प्रश्न जसे

**शासकिय धोरणाप्रमाणे स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन बांधील आहे. तरिदेखील स्त्रियांच्या बेरोजगारीच्या आकडेवारीतील वाढ हा एक गंभीर प्रश्न आहे. याचे प्रमुख कारण अत्यंत कमी वेतन हे आहे. तसेच आपल्या देशात स्वयंनिवडीनुसार रोजगारसंधी मिळत नाहीत. मिळणाऱ्या रोजगारसंधी या वैयक्तिक शिक्षण व पसंतीनुसारच मिळतील याची शाश्वती नाही. तसेच कुशल कामगारांचा अभावामुळे रोजगारसंधी असूनही त्या रिक्त राहतात.**

उपलब्ध माहितीच्या तुलनेत कामगार व कार्य नियुक्त मनुष्यबळ यांच्या आकडेवारीतील तफावत वाढत जात आहे. तसेच कामात सहभागी होण्याच्या दराबाबत स्त्रियांसह पुरूषांच्या संख्येतही घट होत आहे. शासकिय धोरणाप्रमाणे स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन बांधील आहे. तरिदेखील स्त्रियांच्या बेरोजगारीच्या आकडेवारीतील वाढ हा एक गंभीर प्रश्न आहे. याचे प्रमुख कारण अत्यंत कमी वेतन हे आहे. तसेच आपल्या देशात स्वयंनिवडीनुसार रोजगारसंधी मिळत नाहीत. मिळणाऱ्या रोजगारसंधी या वैयक्तिक शिक्षण व पसंतीनुसारच मिळतील याची शाश्वती नाही. तसेच कुशल कामगारांचा अभावामुळे रोजगारसंधी असूनही त्या रिक्त राहतात.

यासाठी वर्तमान सरकारने सुरू केलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था National Skill Development Agency (NSDA), राष्ट्रीय कौशल विकास महामंडळ- National Skill Development Corporation


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

(NSDC), व प्रशिक्षण महासंचालक- Directorate General of Training (DGT) यांच्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाच्या विविध उपक्रमांतून स्वयंरोजगाराला प्रोत्साहन लाभून रोजगारात भरभराट दिसून येईल, अशी अपेक्षा आहे.

**ठळक मुद्दे**

- शासन सर्वांनाच नोकऱ्या देऊ शकत नाही. तसेच प्रत्येकाने नोकरदार होणे हे देखील विकासाच्या दृष्टीने अपेक्षित नाही. आजीवन वेतनाच्या नोकऱ्या उपलब्ध करून देउन नियोक्ता- नोकरदार अशा दोन वर्गाची विषम आकडेवारी वाढवणे विकासाला पोषक ठरत नाही. त्याऐवजी, रोजगारावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, जे अल्पकालीन आणि करारात्मक असू शकते.
- सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे घडत आहेत. जसे, ग्रामीण भागांचा शहरी भागांत कायापालट, शेतीच्या क्षेत्रांत बिगरशेतींचे उद्योग, निर्वाहासाठी तात्पुरत्या रोजगारांपासून मासिक अथवा दैनिक वेतनाच्या रोजगारांच्या संधी, आजीवन नोकरीऐवजी अल्प कालीन करार तत्वावरील नोक-या, नियोक्ता- नोकरीदार पध्दतींच्या नोकरीऐवजी युवा पिढीचा स्वयंउद्योजकतेकडे कल इ.
- व्यावसायिकता, स्वयंरोजगार व उद्योजकतेची मानसिकता उद्यमशीलता संस्कृतीतून रूजावी याच उद्देशाने शासनाने स्टर्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया तसेच मुद्रा योजना यांसारखे उपक्रम सुरू केले.
- रोजगारसंधींची वाढ आणि विकासाची गती एकसमान किंवा समांतर असेलच असे नाही. विकासाची रचना ज्या स्वरूपाची आहे त्यावर त्याचे नवनवीन उद्यम व रोजगारसंधीचे सकारात्मक निकाल अवलंबून असतात.

■■■

*लेखक हे पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष व भारत सरकारच्या नीती आयोगाचे सदस्य आहेत.*

*ईमेल : bibek.debroy@gov.in*

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

उपाय

# शहरांमध्ये उपजिवीकेच्या संधी निर्माण करताना

-दुर्गा शंकर मिश्रा



**उत्पादन क्षेत्र आणि सेवा उद्योगांमधले बदलते तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रातले अधिकाधिक यांत्रिकीकरण यामुळे शहरी विभागात मजबूत रोजगार वाढ होणे अपेक्षित आहे... या क्षेत्रातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारत सरकार बहुविध मार्गांचा अवलंब करत आहे. शहरी विभागात रोजगार निर्मितीसाठी सरकारने घेतलेल्या पुढाकारावर या लेखात प्रकाश टाकला आहे. तसेच भविष्यकाळातल्या आव्हानांना सामोरे जाऊ शकेल असे मनुष्यबळ शहरात निर्माण करण्यासाठी नवनवीन धोरणे आखण्यात येत आहेत, त्यांचाही मागोवा या लेखात घेतला आहे.**

भारताच्या वेगाने वाढणाऱ्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कुशल मनुष्यबळ सातत्याने पुरविण्याची आवश्यकता आहे. २०११ साली झालेल्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी ३१ टक्यांहून जास्त जनता शहरात रहात होती आणि यानंतरचे अनुमान असे सुचविते की वर्ष २०५० पर्यंत ही टक्केवारी ५० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. सध्या अस्तित्वात असलेली शहरे विस्तारत आहेत आणि त्यातील लोकवस्ती दाट होत आहे, तसेच नवीन शहरे उदयाला येत आहेत, यामुळे उदरनिर्वाहाची साधने निर्माण करण्याची गरज वाढतच जाणार आहे. दर महिन्याला १० हजार नवीन कामगार निर्माण होतात (ओ. सी. इ. डी. इकॉनॉमिक सर्व्हे – भारत २०१७). उत्पादन क्षेत्र आणि सेवा उद्योगांमधले बदलते तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रातले अधिकाधिक यांत्रिकीकरण यामुळे शहरी विभागात मजबूत रोजगार वाढ होणे अपेक्षित आहे. नवीन रोजगार निर्मितीपैकी जवळपास ७० टक्के रोजगार शहरी विभागात निर्माण होतील असा अंदाज आहे (संखे इ. , २०१०).

**१. कुशल पर्यावरणाचा विकास**

वर्ष २००९ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण आखण्यात आले आणि नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन(एन्. एस्. डी. सी.) स्थापन करण्यात आले. वर्ष २०२२ पर्यंत १५० दशलक्ष लोकांना कुशल कामगार म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने ही स्थापना करण्यात आली. सार्वजनिक – खाजगी भागीदारीची रचना असलेल्या या उपक्रमात सरकारची मालकी ४९ टक्क्यांपर्यंत मर्यादीत ठेवली आहे. यामुळे एन्. एस्. डी. सी.ची बहुतांश मालकी खाजगी क्षेत्राकडे जाते. यामध्ये १० उद्योग महासंघ आणि विशिष्ट क्षेत्रातल्य औद्योगिक संघटनांमध्ये समभागांची समान वाटणी केलेली आहे (शेणॉय, २०१२).

भारतात, २२ मंत्रालये विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करतात, त्यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमाची लक्षणीय प्रगती होत आहे. कौशल्याबाबत सातत्याने मार्गदर्शनाची गरज असते हे लक्षात घेऊन पंतप्रधानांनी वर्ष २०१५ मध्ये स्कील इंडीया मिशन ची सुरवात केली. विविध मंत्रालयांकडून होणाऱ्या प्रयत्नांचे एकत्रीकरण करून भारताच्या भविष्यकाळातल्या कुशल मनुष्यबळासाठी आराखडा निर्माण करण्याचे काम स्कील इंडीया मिशन करते.

स्वयं रोजगार निर्मितीच्या संधींमध्ये वाढ होण्यासाठी आर्थिक सेवांमधे सुलभ प्रवेश होणे गरजेचे आहे. कौशल्यपूर्ण व्यवस्थेला पूरक म्हणून या देखिल आघाडीवर समांतर प्रयत्न करण्यात येत आहेत. जेएएम् +या सेवांमुळे आर्थिक सर्वसमावेशाचे ध्येय गाठणे सुलभ होत आहे. जेएएम् + म्हणजे जन धन योजना, आधार आणि मोबाईलवर



***स्वयं सहायता गट महासंघाची बैठक, ओडीशा.***

*बहु-आयामी रोजगार धोरणे-*

*सर्वसमावेशक दृष्टीकोनाद्वारेशहरी गरिबी कमी करणे आणि रोजगाराला बढती देण्यावर लक्ष केंद्रीत करणे हे या मिशनचे ध्येय आहे.*

*सामाजिक जागृती आणि संस्थात्मक विकास या मिशन मधील घटकांमुळे तीन स्तरांमध्ये समाजाची बांधणी केली जाते. ते तीन स्तर असे – स्वयं सहाय्यता गट (एस्. एच्. जी.) निर्माण करणे, विभाग पातळीवर किंवा झोपडपट्टी पातळीवर महासंघ निर्माण करणे आणि शहर पातळीवर महासंघ निर्माण करणे.*

*हे महासंघ समाजाचे एकत्रित प्रतिनिधीत्व करतात आणि त्याच्या उदरनिर्वाहाला आधार देतात.*

आधारीत आर्थिक सेवा होय. या वर्षाच्या सुरवातीला जागतिक बँकेने जाहीर केलेल्या जागतिक फिनडेक्स अहवालानुसार, वर्ष २०११ मध्ये प्रौढ बँक खातेधारकांची संख्या ३५ टक्के होती, वर्ष २०१४ मध्ये ही संख्या ५३ टक्के झाली तर वर्ष २०१७ मध्ये प्रौढ बँक खातेधारकांची संख्या ८० टक्के इतकी झाली आहे. बँक खातेधारकांमध्ये पुरूष आणि स्त्री खातेधारकांच्या संख्येतली तफावतही कमी झाली आहे. आता ८३ टक्के पुरूषांची आणि ७७ टक्के स्त्रियांची बँकेत खाती आहेत. इतकेच नाही तर, मुद्रा कर्ज मिळवणाऱ्या लाभार्थींमध्ये ७५ टक्के महिलांचा समावेश आहे (जागतिक बँक, २०१८).

रोजगार आणि स्वयंरोजगार या दोन्ही गोष्टींना आधार देण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन असलेली योजना म्हणजे दीनदयाळ अंत्योदय योजना – नॅशनल अर्बन लाईव्हलीहूड मिशन (डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.) होय. ही योजना गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाअंतर्गत (एम्.ओ.एच्.यू.ए.) चालविण्यात येते. सर्व वैधानिक शहरांमधल्या गरीब आणि कमकुवत लोकांसाठी उदरनिर्वाहाच्या संधी निर्माण करण्यासाठी या योजनेद्वारा प्रयत्न करण्यात येतात.

गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयातर्फे (एम्.ओ.एच्.यू.ए.) पथदर्शी योजनांपैकी एक योजना म्हणून दीनदयाळ अंत्योदय योजना – नॅशनल अर्बन लाईव्हलीहूड मिशन (डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.) सादर करण्यात आली. या मंत्रालयाच्या इतर पथदर्शी योजना याप्रमाणे आहेत - स्वच्छ भारत मिशन – शहरी (एस्.बी.एम्.-यू.), प्रधानमंत्री आवास योजना – शहरी (पी.एम्.ए.वाय्.-यू.), स्मार्ट शहर मिशन (एस्.सी.एम्.), शहरांचे पुनरुज्जीवन आणि रुपांतरण करण्यासाठी अटल मिशन (ए.एम्.आर्.यू.टी.), आणि पारंपारीक वारसा असलेल्या शहरांचा विकासआणि वृद्धी योजना(एच्.आर.आय्.डी.ए.वाय्). या सर्व योजना दीनदयाळ अंत्योदय योजनेला पूरक ठरतात.

**अ. बहु-आयामी रोजगार धोरणे-**

सर्वसमावेशक दृष्टीकोनाद्वारे शहरी गरिबी कमी करणे आणि रोजगाराला बढती देण्यावर लक्ष केंद्रीत करणे हे या मिशनचे ध्येय आहे.

सामाजिक जागृती आणि संस्थात्मक विकास या मिशन मधील घटकांमुळे तीन स्तरांमध्ये समाजाची बांधणी केली जाते. ते तीन स्तर असे – स्वयं सहाय्यता गट (एस्.एच्.जी.) निर्माण करणे, विभाग पातळीवर किंवा झोपडपट्टी पातळीवर महासंघ निर्माण करणे आणि शहर पातळीवर महासंघ निर्माण करणे.

हे महासंघ समाजाचे एकत्रित प्रतिनिधीत्व करतात आणि त्याच्या उदरनिर्वाहाला आधार देतात.

या मिशन अंतर्गत शहरी उदरनिर्वाह केंद्रे (सिटी लाईव्हलीहूड सेंटर्स-सी.एल्.सी.) स्थापन केली आहेत. शहरातल्या स्थानिक मंडळ पातळीवर (अर्बन लोकल बॉडी यू.एल्.बी.) अनौपचारीक जन सेवा क्षेत्राला संघटीत करण्यासाठी शहरी उदरनिर्वाह केंद्रांची मदत होते. इलेक्ट्रीशियन, सुतार, प्लंबर, रंगारी, शिंपी, शिकवणी शिक्षक इत्यादी सेवा देणाऱ्यांची नोंदणी सी.एल्.सी. मध्ये

२.९९ लाख स्वयंसहायता गट (प्रत्येकी १० सदस्य) स्थापन
२.०९ लाख स्वयंसहायता गटांना निधी प्राप्त

११.७६ लाख उमेदवारांना प्रशिक्षण
३.८६ लाख उमेदवारांना रोजगार

३.०१ लाख व्यक्तिंना सुक्ष्म उद्योग कर्ज वितरित
४.०९ लाख स्वयंसहायता गटांना बँकेकडून कर्ज
२३,५५४.६ कोटींचे कर्ज वितरित

१६२५ निवारे मंजूर, त्यातील ९९१ ची उभारणी


२,२१२ शहरांत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण पूर्ण
८,०३,४५७ फेरीवाल्यांना ओळखपत्रांचे वाटप

**उपजीविकेसाठी आधार ठरलेला स्वयं सहाय्यता गट – अंबिकापूर, छत्तिसगड**

कचऱ्याचे व्यवस्थापन पालिकेमार्फत करण्याऐवजी समाजाकडून व्हावे या उद्देशाने कचऱ्यापासून सोने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. स्वयं सहाय्यता गटातल्या ५०० हून जास्त महिला एकत्र आल्या आणि त्यांनी घरोघरी जाऊन कचरा गोळा करायला सुरवात केली आहे. त्या घन आणि द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन करतात. या कार्यावर शहरी स्थानिक मंडळे लक्ष ठेवतात. त्यासाठी केंद्रीय नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. या कक्षातून ऑनलाईन पोर्टल द्वारे रोजच्या कचरा गोळा करण्याच्या कामाची माहिती दिली जाते.

केली जाते. यामुळे सी.एल्.सी.शी संपर्क साधून ग्राहकांना या सेवा मिळवता येतात. सी.एल्.सी. द्वारा सूक्ष्म उद्योजकांना विपणनासाठी आधारही दिला जातो.

कौशल्य प्रशिक्षण देणे आणि नोकरी मिळवून देणे (इ.एस्.टी.पी.) या मिशनच्या घटकामुळे स्कील इंडीया मिशनद्वारे बाजारात उपयोगी ठरेल असे कौशल्याचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळवून देण्यात यश मिळते. प्रशिक्षण दिल्यानंतर एकतर प्रशिक्षणार्थींना नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात किंवा स्वयंरोजगारासाठी मदत केली जाते. स्वयंरोजगार कार्यक्रम (सेल्फ एम्प्लॉयमेंट प्रोग्रॅम- एस्.इ.पी.) हा मिशनचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. यामुळे शहरी गरीबांचा आर्थिक



**शहर उपजिवीका केंद्र, जयपूर, राजस्थान**

स्वयं सहाय्यता गटातल्या स्त्रियांनी चालवलेल्या सूक्ष्म उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी नवनवीन विपणन कल्पना लढवल्यामुळे या शहर उपजिवीका केंद्राने एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे. या केंद्राने अमेझॉन, स्नॅपडील, फ्लीपकार्ट, शॉप क्लूज अशा प्रमुख इ-कॉमर्स व्यासपीठांशी संधान बांधले आहे.

या केंद्राने एक कॉल सेंटरही स्थापन केले असून आजतागायत १०,००० हून जास्त ग्राहकांना सेवा दिली आहे. कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना नोकरी शोधण्यासाठी मदत करणे, फेरीवाल्यांसाठी कार्यशाळा आयोजित करणे यासारखे उपक्रमही या शहर उपजिवीका केंद्राकडून राबवले जातात.

हे केंद्र प्रथम दीनदयाळ अंत्योदय योजनेच्या सहाय्याने सुरू झाले आणि आता ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले आहे.



*देशभरात एकूण १,१८७ कौशल्य प्रशिक्षण पुरवठादार आणि ६,१३६ प्रशिक्षण केंद्रांचे जाळे उभारण्यात आले असून डी.ए.वाय.-एन्.यू.एल.एम्.द्वारे प्रशिक्षण आणि नोकरीसाठी सहाय्य देण्यात येते. यामध्ये सर्वाधिक लोकप्रिय क्षेत्र अशी आहेत – आय टी, आय टी इ एस, पोशाख, सौंदर्य आणि स्वास्थ्य, बांधकाम, आरोग्यसेवा आणि पोषण.*

समावेश होतो आणि त्यांना सूक्ष्म रकमेचे कर्ज सवलतीत दिल्यामुळे त्यांच्या सूक्ष्म उद्योगाला आधार दिला जातो.

फेरीवाल्यांना आधार देणे हा या मिशनचा एक घटक आहे. यामुळे 'फेरीवाले कायदा, २०१४' नुसार फेरीवाल्यांचा रोजगार संरक्षण मिळवून देता येते. या घटकाअंतर्गत, ८ लाखांहून जास्त फेरीवाल्यांना ओळखपत्र देण्यात आली आहेत. यामुळे त्यांच्या व्यवसायाला कायदेशीर मान्यता मिळते आणि त्यांच्या फिरतीचे क्षेत्र देखील निश्चित होते. अनेक शहरांनी फेरीवाला क्षेत्र योजना तयार केली असून त्यानुसार विक्रीसाठी योग्य त्या सुविधा तयार केल्या आहेत आणि फेरीवाला क्षेत्र विकसित करण्यात येत आहेत.

या मिशनच्या मध्यावधी परिणाम मूल्यांकन अहवालानुसार एस्.एच्.जी. बॅंक कर्जापैकी जवळपास ४५ टक्के कर्जाचा उपयोग सूक्ष्म उद्योग स्थापनेसाठी करण्यात आला आहे. हे लक्षात घेतले तर असे दिसते की, या मिशनने उपजिवीका निर्मितीत लक्षणीय प्रगती केली असून आतापर्यंत २५ लाखांहून जास्त थेट उपजिवीकेची साधने निर्माण केली आहेत.

**ब. कौशल्य प्रशिक्षण आणि नोकऱ्यांमधून रोजगार निर्मिती.**

इ.एस्.टी.पी.घटकामुळे शहरातल्या गरीब उमेदवाराची रोजगारक्षमता वाढते. रोजगार केंद्रीत, परिणामदायक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारा नोकऱ्या आणि स्वयंरोजगार निर्मितीवर भर देण्यात येतो. हे उपक्रम मागणीला अनुसरूनच तयार होतील याची खातरजमा करण्यासाठी सध्याच्या कौशल्यांमध्ये किती तफावत आहे त्याचा अभ्यास करण्यात आला आहे. विविध चाळण्या लावून त्यानंतर उमेदवार निवडण्यात येतात आणि त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. यामुळे उद्योगांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षेनुसार उमेदवारांना प्रशिक्षणाचा विषय निवडता येतो.

प्रशिक्षणाचे स्वरूप अल्प मुदतीचे असते, त्याचा कालावधी ३ ते ६ महिन्याचा असतो. विविध क्षेत्रात सध्या २०० हून अधिक विषयांवर प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये सर्वाधिक लोकप्रिय विषय असे आहेत – आय टी, आय टी इ एस, पोशाख, सौंदर्य आणि स्वास्थ्य, बांधकाम, आरोग्यसेवा आणि पोषण.

प्रशिक्षण महासंचालक (DGT) यांच्या अधिपत्याखाली उद्योगांच्या गरजांना अनुसरून रोजगारक्षम प्रशिक्षणाचे (मॉड्युलर एम्प्लॉयेबल स्कील्स) अभ्यासक्रमही इ.एस्.टी.पी. तर्फे चालविण्यात येतात. हे प्रशिक्षण अभ्यासक्रम राष्ट्रीय व्यवसायाभिमुख प्रशिक्षण परिषदेतर्फे (नॅशनल काउन्सिल ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग एन्.सी.व्ही.टी.) संमत केले जातात. आता हे अभ्यासक्रम राष्ट्रीय कौशल्य अर्हता रचनेशी (नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क एन.एस.क्यू.एफ.) मिळते जुळते करण्यात आले आहेत. या रचनेअंतर्गत ३८ उद्योग मंडळांचे जाळे विणण्यात आले असून त्यांना क्षेत्रिय कौशल्य परिषद असे म्हणतात (सेक्टर स्कील कौन्सिल्स एस्.एस्.सी.). विविध अभ्यासक्रमांसाठी अर्हता संच तयार करणे आणि त्यांच्या

चाचण्या आणि प्रमाणपत्रांसाठी मानक तयार करण्याची जबाबदारी या परिषदेची आहे.

**क. स्वयं सहाय्यता कार्यक्रम**

वैयक्तिक आणि गटांना सूक्ष्म उद्योग उभारण्यासाठी 'स्वयं सहाय्यता' या मिशनमधल्या घटकाचा उपयोग होतो. यासाठी ७ टक्के व्याजदराने बँकेची कर्जसुविधा उपलब्ध करून दिली जाते. यामध्ये तीन प्रकारची कर्ज सवलतीमध्ये उपलब्ध आहेत – २ लाख रूपयांपर्यंत वैयक्तीक कर्ज मिळते तर, स्वयं सहाय्यता गटासाठी १० लाख रूपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होते. यामध्ये गटाकडे ज्या प्रमाणात निधी उपलब्ध असेल त्यानुसार १ : ४ या प्रमाणात (रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार) कर्ज उपलब्ध होते. एस. इ. पी घटकाच्या अंतर्गत कर्ज मिळण्यासाठी जे अर्ज येतात त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी बँकेचे आणि शहर स्थानिक मंडळांचे प्रतिनिधी मिळून काम करतात.

बँकांनी किंवा वित्तीय संस्थांनी जर ७ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजदर आकारला तर जास्त आकारलेली व्याजाची रक्कम व्याज सवलत या स्वरूपात लाभार्थींना दिली जाते. महिला स्वयं सहाय्यता गटांना अतिरिक्त ३ टक्के व्याज सवलत दिली जाते. यामुळे वेळेवर कर्ज परतफेडीसाठी प्रोत्साहन मिळते. लाभार्थींना शिक्षण देऊन आणि कौशल्य पुरविण्यासाठी तसेच त्यांना सक्षम करण्यासाठी, सूक्ष्म उद्योगांनी टिकून रहावे आणि त्यांची वाढ व्हावी म्हणून उद्योजक विकास कार्यक्रमाअंतर्गत सहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

**ड. मिशन मूल्यांकन आणि नवीन उपक्रम –**

मध्यावधी मूल्यांकन केल्यावर जी तफावत आढळून आली त्यावर उपाय



**रायपूर, छत्तीसगड इथे कॉम्प्युटर ॲप्लिकेशनचे ट्रेनिंग**

*प्रशिक्षण महासंचालक (डीजीटी) यांच्या अधिपत्याखाली उद्योगांच्या गरजांना अनुसरून रोजगारक्षम प्रशिक्षणाचे (मॉड्युलर एम्प्लॉयेबल स्कील्स) अभ्यासक्रमही इ.एस्.टी.पी.तर्फे चालविण्यात येतात. हे प्रशिक्षण अभ्यासक्रम राष्ट्रीय व्यवसायाभिमुख प्रशिक्षण परिषदेतर्फे (नॅशनल काउन्सिल ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग एन्.सी. व्ही.टी.) संमत केले जातात. आता हे अभ्यासक्रम राष्ट्रीय कौशल्य अर्हता रचनेशी (नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क-एन्.एस्.क्यू. एफ्.) मिळते जुळते करण्यात आले आहेत.*

म्हणून डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्. अंतर्गत मोठा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये व्याज सवलतीसाठी वेब पोर्टल उभारले जाईल, जेणेकरून व्याज सवलत थेट लाभार्थींच्या कर्ज खात्यात जमा होईल. यापूर्वीच सवलतीच्या कर्ज दरात उपलब्ध असलेले मुद्रा कर्जसुद्धा डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.या योजनेत सामील होण्यासाठी पात्र ठरले आहे. यामुळे कर्ज योजनांचे एकीकरण होऊ शकेल.

प्रशिक्षित उमेदवारांना नोकऱ्या मिळवून देण्याची क्षमता वाढवण्यासाठी मिशनतर्फे नोकऱ्या मिळवून देण्याऱ्या एजन्सीबरोबर काम करण्यात येत आहे. तसेच वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांमधल्या खाजगी कंपन्यांसोबत भागीदारी करण्यात येत आहे. प्रशिक्षित उमेदवारांकडून थेट अभिप्राय मिळवण्यासाठी एक यंत्रणा उभारण्यात येत आहे. या योजनेचे नाव 'पारस' (पी.ए.आर.ए.एस. -व्यक्तिगत वेगवान चाचणी यंत्रणा) असून यामुळे प्रशिक्षण कार्यक्रमात सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारांना मदत होत आहे.

मिशनच्या मापदंडावर आधारीत राज्यांचे मूल्यांकन करण्यात येते. यामुळे राज्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण होते. राज्यांसाठी तयार केलेल्या या मानांकन यंत्रणेचे नाव 'स्पार्क' असे आहे.

**२. मुख्य जोखीम ओळखून त्यावर उपाय योजणे.**

भविष्याचा वेध घेत एम्.ओ.एच्. यू.ए.च्या प्राथमिकता विकसित होत आहेत. या प्राथमिकता जोखीम आणि संधींवर आधारीत आहेत. तीन राष्ट्रीय आव्हानांना मिशनद्वारे पर्याय शोधण्यात येत आहेत. ती आव्हाने अशी आहेत –

(अ) नोकऱ्यांचे अनौपचारीक स्वरूप, (ब) कामगारांच्या संख्येत महिलांचे कमी प्रमाण (क) कार्यक्रम राबविणाऱ्या एजन्सींच्या मर्यादीत क्षमता.

(अ) शहरी अनौपचारीक कार्यबळाला औपचारीक करणे – देशाच्या एकूण कार्यबळापैकी ८१ टक्के कार्यबळ अनौपचारीक किंवा असंघटीत स्वरूपात आहे. वर्ष २०१९ पर्यंत आणखी ७७ टक्के कामगार 'कमकुवत नोकऱ्यांमध्ये' सहभागी असणार आहेत. (आय्.एल्.ओ., २०१८). ज्या वेगाने देशात शहरीकरण होत आहे त्या प्रमाणात औपचारीक क्षेत्रात वाढ होताना दिसत नाही. याउलट शहरी भागात जास्त अनौपचारीक उद्योगांची भर पडत आहे. औपचारीक क्षेत्राइतकाच अनौपचारीक क्षेत्राचा आर्थिक आघाडीवर परिणाम दिसून येणार आहे. (घनी इ. २०१३). बांधकाम आणि स्वच्छता यासारख्या क्षेत्रात मोठ्या संख्येने शहरी कामगार अनौपचारीक पद्धतीने नोकरी करतात आणि त्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची दुरवस्था दिसून येते.

डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.द्वारा ही आव्हाने दोन प्रकारे हाताळण्यात येतात. ज्यांनी अनौपचारीक पद्धतीने कौशल्य आत्मसात केली आहेत त्यांना शोधून, प्रमाणित करून औपचारीकता पूर्ण करणे हा पहिला प्रकार आहे. यासाठी पूर्वी शिक्षण घेतलेल्यांना मान्यता देणे (रेकग्निशन ऑफ प्रायर लर्निंग-) हा उपक्रम प्रधानमंत्री कौशल विकास योजनेशी (पी.एम्.के.व्ही.वाय.) जोडला आहे. या आर्.पी.एल. प्रक्रीयेमुळे विशेषकरून बांधकाम आणि स्वच्छता क्षेत्रासारख्या कमकुवत क्षेत्रातही आरोग्य आणि सुरक्षेचे प्रमाण उंचावण्याची अपेक्षा आहे. यामुळे अनौपचारीक कामगारांमध्ये त्यांच्या कौशल्याबाबत सन्मानाची भावना निर्माण होईल आणि अर्हता पातळीत वाढ होईल. स्वच्छता कामगारांच्या क्षमतेत वाढ व्हावी यासाठी देखिल मिशन प्रयत्नशील आहे. सेक्टर काऊन्सिल फॉर ग्रीन जॉब्ज आणि स्वच्छ भारत मिशन या दोघांबरोबर संयुक्तरीत्या आघाडी उघडण्यात आली आहे.



दुसरा प्रकार म्हणजे डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.अंतर्गत सर्व शहरांमध्ये शहर उपजिवीका केंद्र (सिटी लाईव्हलीहूड सेंटर्स-सी.एल्.सी.) स्थापन करणे अपेक्षित आहे. ही केंद्रे पुनरुज्जीवित करण्यात येत आहेत, त्यासाठी सेवा देणाऱ्या स्वतंत्र व्यावसायिकांचा भक्कम माहितीसाठा (डेटाबेस) नव्याने तयार करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे. यामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या सेवा मोबाईल ॲप वगैरे माध्यमातून उपलब्ध करता येतील. अनौपचारीक कामगारांना एकत्र आणून त्यांना प्रशिक्षण देऊन पालिकेचे कंत्राट मिळवून देण्यासाठी अनेक सी. एल. सी. प्रयत्न करत आहेत. उदाहरणार्थ हिमाचल प्रदेशातल्या नाहन शहरातल्या सी. एल. सी. केंद्राने वाल्मिकी वस्तीतल्या अनौपचारीक स्वच्छता कामगारांना प्रशिक्षण दिले. त्या कामगारांना आता नाहन नगर पालिकेकडून औपचारीक कंत्राट देण्यात आले असून त्यात विस्तृत अटी, नियम आणि सुरक्षा साधनांचा समावेश आहे.

**(ब) शहरी कर्मचाऱ्यांमधे महिलांचा सहभाग वाढविणे –**

भारताच्या अर्थव्यवस्थेला कमकुवत करणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे महिला कर्मचाऱ्यांचा कमी सहभाग. वर्ष १९९० आणि २०१५ दरम्यान देशाचे दरडोई प्रत्यक्ष सकल देशांतर्गत उत्पन्न ३७५ अमेरीकन डॉलर्स वरून १,५७२ अमेरीकन डॉलर्स इतके वाढले, परंतु देशाच्या महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३७ टक्क्यांवरून २८ टक्क्यांपर्यंत खाली आली. जर देशाला हे संतुलन परत आणता आले तर सकल देशांतर्गत उत्पन्नात २७ टक्क्यांनी वाढ होऊ शकेल (आय.एम्.एफ्.- २०१३).

नॅशनल सॅम्पल सर्व्हे (एन्.एस्.एस.) च्या माहितीनुसार ज्या महिला प्रामुख्याने घर सांभाळतात त्यांच्यापैकी ३१ टक्के महिलांना काहीतरी अर्थार्जन करण्याची इच्छा आहे. अशी इच्छा असणाऱ्या सर्व महिलांनी जर कामाला सुरवात केली तर महिला सहभागाचे प्रमाण (फिमेल लेबर फोर्स पार्टीसिपेशन रेट-एफ.एल. एफ.पी.आर.) २१ टक्क्यांनी वाढू शकेल (पांडे, २०१७).

या तफावतीवर डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.थेट कार्य करते. या योजनेत महिलांना स्वयं सहाय्यता गटात सामील करून घेऊन कार्यप्रवण

करण्यात येते. जवळपास ३० लाख महिलांना अशाप्रकारे स्वयं सहाय्यता गटात आणि महासंघात समाविष्ट करून कार्यप्रवण करण्यात आले आहे. या सामाजिक संघटनांमुळे महिलांना त्यांच्या घर सांभाळण्याच्या पारंपारीक भूमिकेच्या पलीकडे बघता येते. त्या सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या सुरक्षित होतात. ज्या राज्यांमध्ये अशा सामाजिक संघटना प्रगल्भ झाल्या आहेत तिथे आता महिला यापुढच्या पातळीवर जात आहेत, ती पातळी म्हणजे उत्पन्नाचे स्रोत निर्माण करणे आणि कर्ज मिळवून त्या आधारे सूक्ष्म उद्योग उभारणे.

महिलांना कौशल्य प्रशिक्षणात आणि नोकऱ्यांमधे प्राधान्य देण्याच्या कामी मिशनने फार मोठा टप्पा गाठला आहे. कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमात ७० टक्क्यांहून जास्त महिला प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश आहे. महिलांसाठी प्रशिक्षणात फक्त ३० टक्के आरक्षण बंधनकारक आहे, तरीही त्यांचा एवढा मोठा सहभाग दिसून येत आहे.

**(क) शहरी स्थानिक मंडळांची (यू एल बी) क्षमता उभारणी –**

डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्. मध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये यू. एल. बी. हा महत्त्वाचा घटक आहे. या मंत्रालयाने एकात्मिक क्षमता उभारणी कार्यक्रम (आय सी बी पी) हाती घेऊन यू एल बी ची क्षमता वाढवण्याला सुरवात केली आहे. रोजगार आणि स्वयंरोजगार कार्यक्रम आणि शहरी गरीबांच्या कमकुवत परिस्थितीबाबत संवेदनशीलता निर्माण करणे या शहरी मिशनच्या कामाल बळ दिले जात आहे.

आय सी बी पी च्या माध्यमातून एम्.ओ.एच्.यू.ए. द्वारा यू. एल. बी. अधिकाऱ्यांचे आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींचे प्रशिक्षण वर्ग चालवण्यात येतात. हा कार्यक्रम तीन टप्प्यात चालतो. एकात्मिक कार्यक्रमाद्वारे शहरी मिशनना एकत्र करण्यावर लक्ष केंद्रीत करणे हा पहिला टप्पा आहे. प्रत्येक मिशनसाठी विशिष्ट तांत्रिक अभ्यासक्रम तयार करणे आणि दुसऱ्या शहरात नेऊन तिथल्या सर्वोत्तम पद्धती दाखवणे हे दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यात केले जाते.




**प्रवासी कौशल विकास योजना (पी के व्ही वाय)**

*अल्प मुदतीचा कार्यक्रम (२ आठवडे ते एक महिना), या अभ्यासक्रमामुळे विविध देशातले आव्हानात्मक प्रकल्प स्विकारण्यासाठी उमेदवारांची सर्वंकष तयारी होईल, आणि आत्मविश्वासाने प्रकल्प पार पाडता येईल, प्रकल्पासाठी आवश्यक ती आंतरराष्ट्रीय कौशल्ये प्राप्त होतील.*

*कामगारांना या कार्यक्रमाचा विशेष लाभ होऊ शकतो, त्यांना व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्याची संधी या कार्यक्रमामुळे मिळेल आणि ते त्यांच्या विशिष्ट व्यापारातील कौशल्ये आत्मसात करण्यासोबतच परदेशी भाषांमध्ये संवादही साधू शकतील.*

### ३. प्रगतीचा मार्ग

पी.एम्.ए.वाय्.-यू., एस्.बी.एम्.-यू., ए.एम्.आर्.यू.टी., एच्.आर.आय्.डी.ए.वाय् णि एस्.सी.एम्. या मंत्रालयांच्या विविध योजना शहरी भागात गुंतवणूक करत आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या दळणवळणाच्या सुविधांमुळे शहरातील चलनवलन सुधारत आहे. या विकसित होणाऱ्या पायाभूत सुविधांचे बांधकाम आणि त्यांची देखभाल करण्यासाठी प्रचंड प्रमाणात मनुष्यबळ लागणार

असल्याने नोकऱ्यांच्या संधीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहेत. डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्. द्वारा होत असलेल्या प्रयत्नांसाठी ही बाब पूरक ठरत आहे.

डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्. आणि एस्.बी.एम्.-यू.यांना जोडण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे नुकतीच जाहीर झाली. स्वच्छतेच्या कामासाठी उपजीविकेच्या प्रतिष्ठीत संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी या योजनांना एकत्र करण्यात येत आहे. इतर शहरी मिशन मधूनही मानाची उपजीविकेची साधने निर्माण व्हावीत म्हणून अशाच प्रकारे धोरण आखण्यासंबंधी प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय आरोग्य मिशन (नॅशनल हेल्थ मिशन- एन. एच. एम.) या योजनेलाही जोडण्याची प्रक्रीया सुरू झाली आहे. आरोग्यावर झालेला वारेमाप खर्च हा घटक एखाद्या कुटुंबाला परत गरीबीत झोकून देऊ शकणाऱ्या मोठ्या खर्चांपैकी महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी एन. एच. एम. ची प्रक्रीया सुरू आहे.

बांधकाम क्षेत्रात एम्.ओ.एच्.यू.ए.द्वारा कामगारांचे प्रमाणिकरण करण्याला प्रोत्साहन देण्यात येत आहे. याची दोन उद्दीष्टे आहेत – उपजिवीकेत सुधारणा करणे आणि सार्वजनिक कामांचा दर्जा सुधारणे. या दिशेने केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाने (सेन्ट्रल पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट – पी. डब्लू. डी.) सुरवात केली असून त्यांच्या प्रकल्पासाठी कमीतकमी २० टक्के प्रमाणित कामगार घेण्यात येत आहेत.

भारताची अर्थव्यवस्था सातत्याने विकसित होत आहे, त्यामुळे शहरी नागरीकांची क्रयशक्ती वाढून राहणीमान सुधारत आहे. म्हणून नवीन क्षेत्रे उदयाला येत आहेत, ज्यामध्ये नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. यामध्ये – इ-कॉमर्समधील वस्तू पोहचवणे, मागणीनुसार टॅक्सी सेवा पुरवणे, तंदुरुस्ती आणि आरोग्यविषयक सेवा देणे, वृद्धांची काळजी घेणे, लहान मुलांना सांभाळणे, घरून दिल्या जाणाऱ्या सेवा इत्यादींचा समावेश होतो. या नव्या क्षेत्रांसाठी आवश्यक ते अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी डी.ए.वाय्.-एन्.यू.एल्.एम्.प्रोत्साहन देत आहे. या मिशन अंतर्गत कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांचे उत्पन्न वाढावे यासाठी खाजगी क्षेत्रातल्या कंपनी मालकांबरोबर भागीदारी करण्यात येत आहे.

■■■

*लेखक हे भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहर विकास मंत्रालयात सचिव आहेत.*

*ई मेल:* secyurban@nic.in



कटिबध्दता

# गुणवत्तापूर्ण रोजगारवृध्दीचा प्रयत्न

**-एच. एल. समरीया**



**रोजगार निर्माण करण्याच्या कामाची गती वाढवण्यासाठी भारत सरकार वचनबद्ध आहे आणि त्यासाठी बहुविध दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आहे. यामुळे अशा रोजगारामध्ये समाजातल्या सर्वांना विशेष करून गरीब आणि कमकुवत घटकांना प्रवेश मिळण्याची निश्चिती होईल.**

आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्यासाठी गुणवत्तापूर्ण नोकरी उपलब्ध होणे गरजेचे आहे. अशा नोकरीमुळे रोजगार, काम आणि सामाजिक सुरक्षा मिळून वैयक्तिक जीवनात सुधारणा तर होतेच पण त्याहीपेक्षा गरीबी घटवणे आणि सामाजिक एकीकरण यासारख्या विविध सामाजिक उद्दीष्टांची पूर्ती करण्यासाठी देखिल गुणवत्तापूर्ण नोकरी असणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. रोजगार निर्माण करण्याच्या कामाची गती वाढवण्यासाठी भारत सरकार वचनबद्ध आहे आणि त्यासाठी बहुविध दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आहे. यामुळे अशा रोजगारामध्ये समाजातल्या सर्वांना विशेष करून गरीब आणि कमकुवत घटकांना प्रवेश मिळण्याची निश्चिती होईल.

रोजगारविषयक सेवा आणि कामगारांचे कल्याण याबाबत कामगार आणि रोजगार मंत्रालयाची (मिनिस्ट्री ऑफ लेबर ॲन्ड एम्प्लॉयमेंट – एम्. ओ. एल्. इ.) महत्त्वाची भूमिका आहे. कामगारांच्या सामाजिक सुरक्षेबाबतच्या गरजांचे व्यवस्थापन करणे, त्यांच्या नोकरीविषयीच्या सद्यस्थितीची माहिती गोळा करणे आणि साठवणे, नोकरीसंदर्भातल्या सेवा पुरविणे, दिव्यांग आणि समाजातल्या कमकुवत घटकांना नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करणे, इत्यादी बंधनकारक मूलतत्त्वांचे पालन करून हे मंत्रालय आपली भूमिका पार पाडते.

भारतातल्या सार्वजनिक रोजगार सेवेला राष्ट्रीय व्यवसाय सेवेमध्ये (नॅशनल करीअर सर्व्हीस – एन्. सी. एस्.) रुपांतरीत केले आहे. तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध व्हावी आणि या संधीपर्यंत पोहोचण्याच्या शक्यतेत वाढ व्हावी म्हणून हे रुपांतर केले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे नोकरी शोधणारे उमेदवार, मालक आणि प्रशिक्षण देणारे घटक हे एकाच व्यासपीठावर एकत्रित होतात. एन्. सी. एस्. ची ठळक वैशिष्ट्ये अशी आहेत – नोकरी शोधणाऱ्यांसाठी नोकरी विषयक सेवा उपलब्ध करून देणे, मार्गदर्शन सेवा, कॉल सेंटर्स, आदर्श व्यवसाय केंद्र, व्यावसायिक माहितीचा साठा, क्षमता उभारणी आणि इतर सुविधा उपलब्ध करणे. एन्. सी. एस्. द्वारा विविध प्रकारच्या नोकरी विषयक सेवादेखिल पुरवण्यात येतात. जसे – अर्हतेनुसार अनुरूप नोकरी, सर्व रोजगार केंद्रांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जोडणे आणि नियमीतपणे रोजगार मेळाव्यांचे आयोजन करणे.

१०७ आदर्श व्यवसाय केंद्रे (मॉडेल करीअर सेंटर्स – एम्. सी. सी.)उभारण्यात आली आहेत आणि नजीकच्या भविष्यात अतिरिक्त १०० केंद्रे उभारण्याचे नियोजले आहे. या एम्. सी. सी. मध्ये तंत्रज्ञान आणि तरूण तज्ञांचे मार्गदर्शन यांना एकत्रित केले आहे. यामुळे नोकरी शोधणाऱ्यांना त्यांच्या अर्हतेनुसार, आवडीनुसार तसेच समाधान देणारी जास्तीत जास्त अनुरूप अशी नोकरी निवडणे सुलभ होते. नोकरी शोधणाऱ्यांची माहिती

आणि नोकरी देणाऱ्यांची माहिती या गोष्टी सतत बदलणाऱ्या असल्यामुळे त्याचे सतत अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. एन्. सी. एस्. च्या मदतीने आणि कामगार आणि रोजगार मंत्रालयाने राज्य सरकारांच्या बरोबर आणि इतर सामाजिक भागीदारांच्या सहयोगाने जवळपास २,२०० रोजगार मेळावे आयोजित केले आहेत. त्यामुळे जून, २०१८ पर्यंत जवळपास ३०.२ लाख नोकऱ्यांना गतिमान करणे शक्य झाले.



*सुरत इथल्या आदर्श व्यवसाय केंद्रात सुरू असलेले मार्गदर्शन सत्र*

सरकारचे प्रमुख रोजगार उपलब्ध करून देणारे पोर्टल म्हणून काम करण्यासाठी एन्. सी. एस्. ला वाढवावे लागले. यासाठी एन्. सी. एस्. ला इतर संबंधित सरकारी पोर्टलसोबत एकत्र करून जोडण्यात आले. या पोर्टलने खाजगी नोकऱ्या देणाऱ्या मुख्य पोर्टलसोबत सामंजस्य करार केले आहेत. यामुळे नोकरी हवी असलेल्या उमेदवारांचा आणि नोकरी देणाऱ्यांचा माहिती साठा विस्तृत झाला.

कामगार आणि रोजगार मंत्रालयाने दिव्यांगांना आर्थिकदृष्ट्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देशाच्या विविध भागात २१ राष्ट्रीय व्यवसाय सेवा केंद्र (नॅशनल करीअर सर्व्हीस सेंटर्स – एन. सी.एस. सी.) स्थापन केली आहेत. दिव्यांगांच्या क्षमतांचे मूल्यांकन करणे, त्यांना व्यवसाय मार्गदर्शन उपलब्ध करणे आणि रोजगार / स्वयं रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सहाय्य करणे यासाठी ही केंद्रे काम करतात. ही केंद्रे फिरती शिबीरे उभारून ग्रामीण आणि झोपटपट्टीत रहाणाऱ्या दिव्यांगांपर्यंतही पोहोचतात आणि तिथे व्यवसाय मार्गदर्शन देतात.

रोजगार महासंचालक (डायरेक्टर जनरल ऑफ एंप्लॉयमेंट – डी.जी.इ.) यांच्याद्वारा अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी देखिल कल्याणकारी योजना राबवल्या जातात. प्रशिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन याद्वारे या योजना काम करतात. अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी एन.सी.एस.सी मधील नवीन अभ्यासक्रमांची ओळख करून देणे आणि आतापर्यंत पोहोचू न शकलेल्या ठिकाणी अनुसूचित जाती /


**यशोगाथा:**

### श्री. राकेश कुमार साहू – दिव्यांग –यांना काम शोधण्यात आलेले यश



श्री राकेश कुमार साहू, हे २८ वर्षाचे आहेत. ते ओदिशातल्या घाटीकीया, खुर्दा इथे रहातात. त्यांना बोलणे आणि ऐकणे याबाबत कमकुवतपणा आहे. त्यांनी भुवनेश्वरच्या दिव्यांगांसाठी असलेल्या 'राष्ट्रीय व्यवसाय सेवा केंद्रात' (एन्. सी. एस. सी. डी. ए.) नाव नोंदणी केली होती. उपचारात्मक मार्गदर्शन सत्राचा लाभ घेतल्यानंतर त्यांनी 'टॅली विथ कॉम्प्युटर फंडामेंटल्स' हा साडेतीन महिन्यांचा अभ्यासक्रम २३ फेब्रुवारी २०१३ रोजी पूर्ण केला.ओदिशा सरकारच्या सामाजिक सुरक्षा विभाग आणि दिव्यांग सक्षमीकरण (डिपार्टमेंट ऑफ सोशल सिक्युरीटी ॲन्ड एंपॉवरमेंट ऑफ पर्सन विथ डिसॅबिलिटी - एस्. एस्. इ. पी. डी.) आणि भुवनेश्वरच्या एन्. सी. एस. सी. डी. ए. द्वारा हा अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आला होता. या कार्याला ओदिशा कौशल्य विकास प्राधिकरणाने पुरस्कृत केले होते.

मुलाखतीला २८ जणांना निमंत्रित केले होते त्यात श्री. राकेश कुमार साहू हे एक होते. अंतिमत: त्यांची निवड झाली. त्यांना बोलण्यात आणि ऐकण्यात ७५ टक्के कमकुवतपणा आहे तरिही ते आत्मविश्वासाने काम करतात आणि त्यांचे काम सर्वांच्या पसंतीला उतरले आहे, असे त्यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.





## श्रम सुविधा पोर्टल

- माननीय पंतप्रधानांनी १६ ऑक्टोबर २०१४ रोजी श्रम सुविधा पोर्टल सुरू केले. कामगार कायद्याला अनुरूप असे सर्व काही एकाच ठिकाणी मिळू शकणारे हे पोर्टल आहे.
- हे पोर्टल या ठिकाणी उपलब्ध आहे - https://shramsuvidha.gov.in या पोर्टलवर एकीकृत नोंदणीकरण, लायसन्सिंग आणि इ पी एफ ओ, इ एस आय सी तसेच सी एल सी (सी) या आस्थापनांच्या सेवा उपलब्ध आहेत.
- खाण आणि कारखाने कायद्याअंतर्गत असलेल्या३ नियमांनुसार या ठिकाणी आस्थापनांना वार्षिक आयकर परतावा दाखल करता येईल.
- कामगार अंमलबजावणी एजन्सीकडून पारदर्शक पद्धतीने जोखीम आधारीत तपासणी करण्यासाठीची सुविधा या पोर्टलवरून देण्यात येते.
- पोर्टल सुरू झाल्यापासून जून २०१८ पर्यंत कामगार अंमलबजावणी एजन्सींनी एकूण ३.७५ लाख तपासण्या या पोर्टलच्या माध्यमातून केल्या.

अनुसूचित जमातींसाठी नवीन एन.सी. एस. सी. स्थापना करण्याचे काम डी.जी.इ. ने केले आहे. विशेष प्रशिक्षण योजना आणि कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्याची सोय बाह्य कंत्राट देऊन करणे अशा कार्यक्रमांना अभ्यासक्रमात अंतर्भूत करून या केंद्रांच्या कार्याची पुनर्रचना करण्यात आली आहे.

कामगार आणि रोजगार मंत्रालयाने कामगार कायद्यात सुधारणा करण्यावरही लक्ष केंद्रीत केले आहे. औद्योगिक क्षेत्रातल्या आणि अर्थव्यवस्थेतल्या बदलत्या परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या गरजांसाठी कायद्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. श्रम सुविधा पोर्टल मुळे आस्थापनांची तपासणी प्रक्रीया पारदर्शी आणि शास्त्रीय पद्धतीने होते. या पोर्टलवर, लायसन्सिंग आणि इ पी एफ ओ, इ एस आय सी तसेच सी एल सी (सी) या आस्थापनांसाठी एकीकृत नोंदणीकरणसेवा उपलब्ध आहेत. यामुळे मासिक इलेक्ट्रॉनिक-कम-चलन (इ.सी.आर.) भरणे सोयीचे होते. ९ केंद्रीय कामगार कायद्यांतर्गत आणि नियमाअंतर्गत ५६ रजिस्टर्स / अर्ज भरणे पूर्वी गरजेचे होते. या मंत्रालयाने त्यात सुधारणा करून आता ही प्रक्रीया ५ सामायिक रजिस्टर / अर्जांमध्ये रूपांतरीत केली आहे. यामुळे वेळ आणि पैसे यांची बचत होणार आहे. श्रम सुविधा पोर्टलमुळे पारदर्शी आणि जबाबदार पद्धतीने अंमलबजावणी करण्याची यंत्रणा विकसित झाली आहे. यामुळे कामगार तपासणीसाठी पारदर्शी योजना तयार झाल्या असून ८ कामगार कायद्यांसाठी फक्त एकच एकात्मिक वार्षिक परतावा अर्ज भरण्याची सोय झाली आहे. यामुळे देशामध्ये व्यवसाय करण्यात सुलभता आली आहे. '२०१८ मध्ये व्यवसाय करणे – रोजगार निर्मितीसाठी पुनर्रचना' या जागतिक बँकेच्या अहवालात असे नमूद केले आहे की व्यवसायासंदर्भात, जागतिक मानांकनात भारताने १३० व्या स्थानावरून १०० व्या स्थानावर झेप घेतली आहे. २०१७-१८ या वर्षात, व्यवसाय धोरणात सुधारणा करणाऱ्या सर्वोत्तम १० देशांमध्ये देखिल भारताचे नाव आले आहे.

सध्याच्या अनेक कामगार कायद्यांचे सुलभीकरण करून त्यांचे एकत्रिकरण करणे आणि या कायद्यांमध्ये तर्कनिष्ठपणा आणणे यासाठी हे मंत्रालय काम करत आहे. या अनेक कायद्यांना





### *पी.एम्.आर.पी.वाय अर्थात प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना लाभार्थी (नवीन आणि संकलीत)*

*पी.एम्.आर.पी.वाय च्या सुरवातीपासून ते जून २०१८ पर्यंतची प्रगती वरच्या तक्त्यात दाखवली आहे. यामध्ये इ.पी.एफ.ओ. मध्ये सामील झालेले नवीन सदस्य / कामगार लाभार्थी यांची संख्या आणि इ.पी.एफ.ओ. सदस्य / कामगार लाभार्थी यांची संकलित संख्या दर्शवली आहे. लाभार्थींच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. ऑगस्ट २०१६ ते मार्च २०१७ पर्यंत लाभार्थींची संख्या ०.३३ लाखांवरून ५३.७२ लाख.*

### श्री. मून कचरी: प्रतिष्ठीत रोजगाराचा शोध

अनुसूचित जातीतले श्री. मून कचरी, हे आसाममधील कामरूप इथल्या अत्यंत गरीब परिवारातले आहेत. कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी ते प्रतिष्ठीत रोजगाराच्या शोधात होते. अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी असलेल्या एन्.सी.एस्.सी. च्या प्रशिक्षण केंद्रात त्यांनी २०१५-१६ मध्ये भाग घेतला. हे प्रशिक्षण त्यांनी मे २०१६ मध्ये यशस्वीरीत्या पूर्ण केले. या प्रशिक्षणात सहभागी झाल्यामुळे त्यांना विविध स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेता आला. अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी एन्.सी.एस्.सी. द्वारा आयोजित रोजगार मेळाव्यातही त्यांनी सहभाग घेतला. मे २०१६ मध्ये अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी एन्.सी.एस्.सी. द्वारा गुवाहाटीइथे रोजगार मेळावा आयोजित केला होता, त्यातून श्री. मून यांना प्रथम ॲक्सीस बँकेत विपणन अधिकारी या पदावर निवडण्यात आले. स्पर्धा परीक्षेतही ते यशस्वी झाले आणि त्यांना दियाम हसाओ जिल्ह्यात, जिल्हा आणि सत्र न्यायाधिशांकडे निम्न विभाग सहाय्यक (लोअर डिव्हीजन असिस्टंट) या पदासाठी निवडण्यात आले. या पदावर ते २७ जुलै २०१७ रोजी रुजू झाले.



४ कामगार संहितेमध्ये विभागण्यात येणार आहे – त्या संहिता अशा आहेत –१. रोजगार, २. सामाजिक सुरक्षा, ३. औद्योगिक संबंध आणि ४. कामाच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य आणि काम करण्याची परिस्थिती. १० ऑगस्ट २०१७ रोजी रोजगारासंबंधीची संहिता लोकसभेत सादर करण्यात आली. कामगारांना कंत्राटी पद्धतीवर काम देताना हंगामानुसार त्यामध्ये लवचिकता आणता यावी आणि निर्यातीसाठी आवश्यक ती बंधने पाळून उत्पादनाचे ध्येय गाठता यावे यासाठी ठराविक कार्यकाळासाठी कंत्राटी पद्धतीवर कामगारांना कामावर घेण्याची नवी पद्धत सादर करण्यात आली आहे. सर्व प्रकारची सामाजिक सुरक्षा, रोजगार आणि कामाच्या परिस्थितीबाबत कंत्राटी कामगारांना कायम कामगारांप्रमाणेच लाभ मिळतील याची या पद्धतीमुळे खात्री होते .

प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना (पी.एम्.आर.पी.वाय्.) सुद्धा २०१६-१७ या वर्षापासून राबवायला सुरवात झाली आहे. रोजगार निर्मीती करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत कामगारांच्या निवृत्ती वेतन योजनेत (इ.पी.एस.) मालकांकडून देण्यात येणाऱ्या हिश्श्यापैकी ८.३३ टक्के रकमेचा वाटा सरकार देत आहे. युनिवर्सल अकाउंट नंबर (यु.ए.एन.) असलेल्या आणि १५,००० रुपये प्रती महिना पगार असलेल्या नवीन कामगारांबाबत हे धोरण आखले आहे. अनौपचारीक कामगारांना रीतसर काम देण्यासाठी किंवा नवीन रोजगार निर्मितीसाठी हे पाऊल उचलले आहे. २०१७-१८ या वर्षी घेतलेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, देशातल्या अकृषी कार्यबळापैकी ३१ टक्के लोक औपचारीक नोकरी करतात. यामुळे हे स्पष्ट होते की औपचारीक नोकरी करणाऱ्यांची संख्या ही वाटते त्यापेक्षा खूप मोठी आहे.

वस्त्रोद्योगाला (कापड आणि तयार

## रोजगारांचे व्यवसायात रूपांतर करण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण



कामगार आणि रोजगार मंत्रालयाने कार्यबळात महिलांच्या सक्रीय सहभागावर जोर दिला आहे. सर्व क्षेत्रातल्या कल्याणकारी योजनांवर भर दिला जात आहे, परंतु स्वयंपूर्ण आणि व्यवसायाभिमुख वृत्ती असलेली संस्कृती निर्माण करण्यावर विशेष जोर देण्यात येत आहे.

रोजगार आणि प्रशिक्षण महासंचालकांच्या अंतर्गत (डायरेक्टरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग -डी.ई.जी.टी.), महिला प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात, ज्यामध्ये महिलांना कामगार, पर्यवेक्षक आणि व्यावसायिक अशा अनेक भूमिका पार पाडायला शिकवले जाते. महिलांना कौशल्य प्रशिक्षण दिल्यामुळे विविध सामाजिक – आर्थिक स्तरांमधल्या आणि विविध वयोगटातल्या महिलांना जास्त संधी उपलब्ध होतात. यामुळे घरांची आणि कुटुंबांची स्थिती अधिक चांगली होते.

- अनेक क्षेत्रांमध्ये महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम आहेत.

अ) रोजगारावर आधारीत उद्योग

ब) प्रशिक्षक म्हणून

क) स्वयं रोजगाराला प्रोत्साहन देणे

- या सर्वांना कार्यक्षम पद्धतीने चालवण्यासाठी आणि भक्कम सुरवात करून देण्यासाठी

अ) कारागिर प्रशिक्षण योजनेअंतर्गत (क्राफ्ट्समन ट्रेनिंग स्कीम – सी.टी.एस.) औद्योगिक कौशल्य प्रशिक्षण

ब) कारागिर प्रशिक्षक प्रशिक्षण योजनेअंतर्गत (क्राफ्ट इन्स्ट्रक्टर ट्रेनिंग स्कीम – सी.आय.टी.एस.) प्रशिक्षक कौशल्य प्रशिक्षण

क) मागणीनुसार अल्प मुदतीचे अभ्यासक्रम

ड) आयटीआय प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी विशेष कार्यक्रम

ई)औद्योगिक मागणीला अनुसरून तयार केलेले अभ्यासक्रम

## प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना



- ०१.०४.२०१८ पासून सर्व नवीन पात्र कर्मचाऱ्यांच्या इ.पी.एस. आणि इ.पी.एफ. साठी सरकार मालकांच्या योगदानातला संपूर्ण १२ टक्के वाटा उचलत आहे.
- ही योजना तीन वर्षासाठी लागू असून, यासाठी सर्व नवीन कामगारांना त्यांचा युनिवर्सल अकाउंट नंबर (यू ए एन) आधार क्रमांकाशी जोडावा लागेल.
- जून २०१८ पर्यंत ५३.७२ लाख नवीन कामगारांची इपीएफओ द्वारा नोंदणी करण्यात आली आहे.
- आतापर्यंत ११४५.३४ कोटी रूपये या योजनेवर खर्च केले आहेत आणि अतिरिक्त ४,५०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे.
- ऑनलाईन नोंदणी आणि आधार क्रमांकाच्या मदतीने सुलभपणे काम चालते. अधिक माहिती –www.pmrpy.gov.in

कपडे क्षेत्राला ) आणखी प्रोत्साहन देण्यासाठी, कामगार निवृत्ती वेतन योजने अंतर्गत (एन्.पी.एस्.) आणि प्रधानमंत्री परीधान रोजगार प्रोत्साहन योजनेअंतर्गत देण्यात येणारे कर्मचारी निवृत्ती वेतन, या दोन्हीकरता, कंपनी मालकांकडून देण्यात येणारा संपूर्ण वाटा (१२ टक्के किंवा जे मान्य केले असेल ते) सरकार उचलत आहे. यापुढे जाऊन या योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन, २०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सरकारने जाहीर केले आहे की, सर्व क्षेत्रातल्या सर्व नवीन कामगारांच्या निवृत्ती वेतनातला मालकाकडून देण्यात येणारा संपूर्ण हिस्सा (१२ टक्के किंवा जे मान्य केले असेल ते) सरकार भरणार आहे. ही योजना ०१.०४.२०१८ पासून तीन वर्षासाठी लागू झाली असून नवीन कर्मचाऱ्यांना नोंदणीच्या तारखेपासून तीन वर्षे आणि आधीच्या कर्मचाऱ्यांना तीन वर्षातला जो उर्वरीत काळ असेल तोपर्यंत या योजनेचा लाभ मिळणार आहे.

रोजगारामधली गुणवत्ता आणि रोजगाराची संख्या यांच्यात समतोल साधण्याचा दृष्टीकोन सरकारने ठेवला आहे. यामुळे वर्ष २०३० पर्यंत टिकावू विकासासाठी ठरवलेली ध्येय गाठण्यासाठी रोजगार हा महत्त्वाचा घटक उदयाला येईल.

■■■

*लेखक केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: secy-labour@nic.in*




विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

प्रगती

# शिक्षण, रोजगार आणि रोजगारक्षमता

-मनिष सबरवाल



**शिक्षण, रोजगार आणि रोजगार क्षमते बाबतची आपली पूर्वीची धोरणे ही एखाद्या गोष्टीच्या जवळ जाण्यापेक्षा लांब जाणारी तसेच बऱ्याचदा बाहेरील बदलत्या घटकांवर टीका करणारी आणि जबाबदारी टाळणारी होती. भारतातील कमी उत्पादकतेला आणि गरीबीला अनेक कारणे आहेत. परंतू आता आपण ,औपचारिकीकरण, नागरीकरण, औद्योगिकिकरण, आर्थिकीकरण आणि मानवी भांडवल यांचे धोरण अवलंबिले आहे**

सध्या सुरु असलेल्या २०१८ या वर्षामध्ये लवकरच काही दिवसात, भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न अर्थात जी डी पी इंग्लंडच्या २ पूर्णांक ६ दशांश ट्रिलीयन डॉलर जी डी पी ला पार करेल असा अंदाज आहे. आता ही साजरी करण्याची गोष्ट आहे का? विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की भारताच्या सुमारे १ अब्ज २० कोटी लोकांना, ६६ दशलक्ष लोकांचे उत्पन्नाचे लक्ष्य पार करायला ७१ वर्ष का लागली? हे जग अणूंनी भरले नसून विविध कथांनी भरले आहे असे कवि माया ॲन्जेलो यांनी म्हटले आहे. १९४७ नंतर आपण स्वत:ला सांगितलेल्या काल्पनिक अर्थशास्त्रीय कथांचा परीणाम म्हणजेच आपली दयनीय उत्पादकता, असे माझे मत आहे. आपल्या राजकीय गोष्टी प्रेक्षकांकडून प्रसृत होतात. परंतू आपल्या अर्थशास्त्रीय गोष्टींमध्ये विकेंद्रीकरणावर अविश्वास दाखवून (बलवान राज्य ही राष्ट्राला दुर्बल बनवितात), संस्थांचा अनादर करून (भ्रष्टाचार आणि अनौपचारीकता हीच संस्कृती), आणि स्पर्धेवर तोडगा काढून (सरकारी उपक्रम आणि मक्तेदारी हेच ग्राहकांसाठी अधिक चांगले आहे), उत्पादकतेच्या आजाराऐवजी गरीबीच्याच लक्षणांना लक्ष्य करतात. १९५५ च्या आवडीमधील ठरावाने, खराब टेलीफोन सेवा, शाळांपेक्षा महाविद्यालयांची निवड, सरकारी उपक्रमांची घोषणा, आणि भांडवली बाजाराची सुरुवात या गोष्टी दिल्या. या सर्वांमुळे आपली उत्पादकता कलुषित झाली. आपल्याकडे १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली फक्त ५२ शहरे आहेत, आणि ५० टक्के मनुष्यबळ हे शेतीबाह्य काम करणारे आहेत, २५ टक्के मनुष्यबळ हे मजुरीवर काम करणारे आहेत. म्हणजे १४ ते १८ वयोगटातील ४३ टक्के मुले विभाजनाची समस्या सोडवू शकतात. ३० कोटी विद्यार्थ्यांपैकी फक्त ५ लाख विद्यार्थ्यांनाच खरा उमेदवारीचा अनुभव मिळतो, ६ कोटी ३० लाख उद्योगांपैकी फक्त ७० लाख उद्योग जी एस टी पूर्वी अप्रत्यक्ष करांसाठी नोंदले गेले आहेत, आणि १ कोटी २० लाख लोकांपैकी फक्त दीड टक्के लोकांनी नोटाबंदी अगोदर आयकर भरले. भारतातील दारीद्र्य हे कमी उत्पादकतेमुळेच निर्माण होते. उत्पादकता ही, संस्था, पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेवर आधारीत असते.

शिक्षण, रोजगार क्षमता आणि रोजगार या गोष्टी, उत्पादकता वाढविण्यासाठी आणि दारीद्र्य निर्मूलनासाठी अतिशय महत्वाच्या आहेत. भारतात रोजगाराची समस्या आहे आणि बेरोजगारीचा अधिकृत दर ५ टक्के आहे. ही अतिशयोक्ती नाही. ज्याला पाहिजे त्या प्रत्येकाला रोजगार आहे, फक्त त्यांना अपेक्षित असे वेतन मिळत नाही. प्रश्न रोजगाराचा का वेतनाचा हे ठरविणे महत्वाचे आहे, कारण तुम्हाला वाटत असेल की भारतापुढची समस्या रोजगाराची आहे तर तुम्ही हेलिकॉप्टर मधून पैसे फेकू



शकता किंवा तीन दिवस कामाचा आठवडा करू शकता किंवा मजुरांच्या हातातील फावडी काढून घेवून त्या जागी चमचे देवु शकता. पण तुम्हाला जर वाटत असेल की समस्या वेतनाची म्हणजेच उत्पादनाची आहे तर मात्र तुम्हाला औपचारीकीकरण, नागरीकरण, औद्योगिकिकरण,वित्तियिकरण तसेच मनुष्यबळाचे भांडवल अशा प्रकारचे वेगवेगळे मार्ग चोखाळावे लागतील.

भारताची उत्पादकता वाढविणे म्हणजेच अधिकृत रोजगार, जो आता मनुष्यबळाच्या २५ टक्के आहे, तो ५० टक्क्यांपर्यंत वाढविणे, १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे, जी आत्ता ५० आहेत ती २०० पर्यंत वाढविणे, कृषि क्षेत्रातील मनुष्यबळ, सध्याच्या ५० टक्क्यांवरून कमी करून १० टक्क्यांवर आणणे, सोने आणि स्थावर मालमत्तेमधील गुंतवणुक, सध्याच्या ९० टक्क्यावरून ५० टक्क्यांपर्यंत कमी करणे, शाळा, महाविद्यालये आणि कौशल्य विकास या माध्यमातून, उत्पादकतेची किंमत, दर्जा आणि संख्या यांचा समतोल साधणे हे आहे. आता आपण यातील प्रत्येक घटक पाहूया.

**औपचारिकीकरण**

वरवर पाहता भारताच्या उद्योजकतेचे पर्यावरण निरोगी दिसून येते; आपल्या

**शिक्षण, रोजगार आणि रोजगार क्षमते बाबतची आपली पूर्वीची धोरणे ही एखाद्या गोष्टीच्या जवळ जाण्यापेक्षा लांब जाणारी तसेच बऱ्याचदा बाहेरील बदलत्या घटकांवर टीका करणारी आणि जबाबदारी टाळणारी होती. भारतातील कमी उत्पादकतेला आणि गरीबीला अनेक कारणे आहेत. परंतू आता आपण ,औपचारिकीकरण, नागरीकरण, औद्योगिकिकरण, आर्थिकीकरण आणि मानवी भांडवल यांचे धोरण अवलंबिले आहे**

एकूण मनुष्यबळाच्या ५० टक्के लोक व्यावसायिक आहेत. आणि आपल्याकडे प्रत्येकी ४ शेतीबाह्य कामगारांसाठी एक उद्योग आहे. मात्र बहुसंख्य उद्योग हे छोट्या प्रमाणात आहेत, (भारतात फक्त ११ टक्के निर्मिती उद्योगात २०० पेक्षा जास्त लोकांना रोजगार मिळतो. चीनमध्ये हेच प्रमाण ५२ टक्के आहे.), उत्पादकतेमध्ये प्रचंड तफावत आहे (९० व्या आणि १० व्या उत्पादनक्षमता असलेल्या उद्योगात २२पट फरक आहे.) आणि आपल्या कामगार वर्गात ४० टक्के लोक गरीब आहेत (असे लोक जे जगण्या इतपत पैसे मिळवितात पण दारिद्र्यातून बाहेर यायला ते पुरत नाहीत.) जास्त वेतन देवू शकेल एवढी उत्पादकता असलेले व्यवसाय भारत निर्माण करू शकत नाही. भारताच्या ६ कोटी ३० लाख उद्योगांपैकी १ कोटी २० लाख उद्योग कार्यालय नसणारे आहेत तर १ कोटी २० लाख लोक घरून काम करतात; फक्त ७० लाख उद्योग हे जी एस टी अगोदर कर नोंदणीकृत आहेत. फक्त १४ लाख उद्योग व्यावसायिकांना बंधनकारक असलेले सामाजिक सुरक्षा देणी देतात, व फक्त १० लाख नोंदणीकृत कंपन्या आहेत.सर्वात धक्कादायक म्हणजे भारतातील फक्त १७,५०० कंपन्यांचे भांडवल १० कोटी रूपयांपेक्षा जास्त आहे.

भारतातल्या परंपरागत उद्योगांनी सामान्यपणे उत्कर्ष आणि बाध्यता प्राप्त केली होती, परंतु जी एस टी हा समीकरण बदलणारा घटक ठरला. जी एस टी लागू झाल्यापासून अप्रत्यक्ष कराची नोंदणी केलेल्या संस्थांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ झाली. लवकरच हा आकडा दीड कोटीपर्यंत जावून पोहोचण्याची अपेक्षा आहे.व्यवसाय करण्याच्या कृतीमध्ये सहजता आणि सुधारणा झाल्यामुळे नवीन उपक्रम निर्मिती होईल तसेच चालू असलेल्या व्यवसायांमध्ये उत्पादकता वाढेल. यासाठी मध्यम आणि लघु उद्योग मंत्रालयाला नव्याने धोरण आखण्याची गरज आहे, तसेच विना हमी तारणात वाढ, कामगार आणि कर निरिक्षकांपासुन सुटका, वस्तु व सेवा कर कायद्याचे सुलभीकरण, उद्यम भांडवल उद्योगात वाढ, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, उद्योजक कामगार आणि उद्योजक सरकार यातील दुवा असलेले सर्व कायदे कागद विरहीत, उपस्थिती विरहीत आणि रोख विरहीत करण्याचा स्विकार करण्याची गरज आहे.

**नागरीकरण**

भारताला कामांना लोकांपर्यंत



न्यायचे आहे किंवा लोकांना कामापर्यंत आणायचे आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. राजकीय कल्पनेत तुम्ही नेहमी कामांना लोकांपर्यंत नेता, पण विकासामध्ये लोकांना कामापर्यंत न्यावयाचे असते. कारण उद्योगाकरीता लागणारे अधिवास बनविणे कठीण आहे. चीनने लोकांना कामापर्यंत न्यावयाचा नमुना बनविला आहे, तिथे चीनच्या वर्षारंभाला ४ दिवसाच्या सुट्टीला २ कोटी लोक रेल्वे तिकीट खरेदी करून आपापल्या घरी जातात. भारतात दिवाळी, छटपूजा, ईद, किंवा नाताळला असे होऊ शकत नाही. आपल्याकडे दहा लाखाच्या वर लोकसंख्या असलेली ५० शहरे आहेत तर चीनकडे ३७५ शहरे आहेत. आपल्याकडे ६ लाख खेडेगावे आहेत, त्यापैकी २०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली २ लाख खेडी आहेत. तेथे व्यवसाय निर्मिती शक्य नाही. नागरीकरणाच्या नियमाचा अनपेक्षित परिणाम म्हणजे प्रत्यक्ष वेतन आणि मोठ्या शहरात मिळणारे कमी वेतन या मधील प्रचंड तफावत. एका मुलाला कामावर जाण्यासाठी प्रवासखर्च, ग्वाल्हेरला रू. ४०० प्रती महिना, गुरगावला रू. ६०००प्रती महिना , दिल्ली इथे रू. ९०००प्रती महिना , तर मुंबई इथे रू. १८०००प्रती महिना इतके लागले. ही फक्त प्रवासखर्चाची भरपाई आहे, वेतन नाही.

येत्या दोन दशकात आपण दिल्ली, मुंबई किंवा बंगळुरू इथे अधिक लोकांना ढकलू शकत नाही, त्याऐवजी दिल्ली जवळ गुरगाव, हैद्राबाद जवळ गचिबावली, पुण्याजवळ मगरपट्टा,बंगळुरूजवळ व्हाईटफिल्ड, आणि चंदिगढ जवळ मोहाली यांसारखी नवीन व्यवसायकेंद्रे निर्माण केली पाहिजेत.

**औद्योगिकिकरण**

भारतामध्ये पुष्कळ लोक शेती करतात (आपल्या मनुष्यबळाच्या ५० टक्के),स्वयंरोजगार असलेले पुष्कळ लोक आहेत (आपल्या मनुष्यबळाच्या ५० टक्के), आणि उत्पादनक्षेत्रामध्ये खूप कमी लोक आहेत (आपल्या मनुष्यबळाच्या ११ टक्के). या तीनही घटकांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. शेतीविरहीत कामांच्या अभावामुळे शेतीकडून होणाऱ्या गरीब लोक जास्त काळ बेरोजगार राहू शकत नाहीत. त्यामुळे ते स्वयंरोजगाराकडे वळतात. तसेच प्रत्येकजण काही उद्योजक होऊ शकत नाही; स्वयंरोजगार असलेले ५० टक्के लोक हे चांगले वेतन असलेले काम मिळवू न शकल्यामुळे गरीब असतात. अशाप्रकारे, भारतातील शेती करणारे तसेच स्वयंरोजगार असलेले लोक, रशियन अर्थतज्ञ चयानोव्ह म्हणतो तसे स्वत: ची पिळवणूक करीत असतात. (लहान शेते जास्त व्यवहार्य आहेत कारण तुम्ही स्वत:ला, तुमच्या जोडीदाराला किंवा मुलांना वेतन द्यायची गरज नसते.) परंतु भारतीय आता स्वत:च्या पिळवणूकीला कंटाळला आहे, त्यामुळे औपचारीक वेतनाच्या नोकऱ्यांच्या प्रमाणात प्रचंड वाढ होत आहे, आणि उत्पादनाच्या नोकऱ्या फार महत्वाच्या आहेत.

**वित्तियकरण**

भारतीय लोक वर्षानुवर्ष आपले पैसे बहुतेक करून जमीन किंवा स्थावर मिळकत अशा भौतिक मालमत्तेमध्ये गुंतवतात आणि राष्ट्रीयीकृत बँकेतून, व्यवसायासाठी भांडवल उभे करतात. यामुळे स्थावर मालमत्तांच्या किंमतीमध्ये असमतोल निर्माण झाला आहे. (आपण अशा थोड्या देशांमध्ये आहोत जेथे जागेच्या भाड्यातील उत्पन्न हे बँकेच्या कर्जदराच्या समान नाहीत.) आणि रोखे बाजाराचा अभाव, तसेच लहान खाजगी वित्तीय क्षेत्र यामुळे गुंतवणूक असमतोल निर्माण होतो.नोटबंदी ही वित्तियीकरणामध्ये मोठ्या प्रमाणात व्यत्यय आहे. कारण त्यामुळे रू. १८ लाख कोटी कर्ज देण्याची क्षमता, १५ कोटी नवीन मासिक डिजिटल व्यवहार, ३ लाख कोटी नविन वित्तीय बचत, आणि कमी व्याजदर झाले.

**मानवी भांडवल**

भारताला शिक्षण आणि रोजगार क्षेत्राची पुनर्रचना आवश्यक आहे, मात्र दर्जा, संख्या आणि समावेशा बाबत आपली उद्दीष्टे परस्परविरोधी आहेत.शिक्षण आणि रोजगार क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होण्याची गरज आहे.सध्या जाणून घेण्यापेक्षा शिकणे जास्त महत्वाचे झाले आहे. (गूगलला सगळे माहिती आहे) तसेच कार्याच्या क्षेत्रात बदल (स्वयंचलन, यांत्रिक शिक्षण, कृत्रिम बुध्दिमत्ता इ.)म्हणजे, नवीन नोकऱ्यांसाठी वाचन, लेखन

आणि अंकगणित या महत्वाच्या गोष्टी आहेत.त्याचप्रमाणे रोजगार क्षेत्रामध्येही नातेसंबंध आणि कौशल्य यांचा समावेश गरजेचा आहे.जाणून घेण्यापेक्षा शिकणे जास्त महत्वाचे आहे कारण गूगलला सगळे माहिती आहे,परिणामांसाठी नियोजना बरोबरच निकालांची आवश्यकता असते कारण फक्त पैसाच काम करत नाही.

शिक्षण, रोजगार आणि रोजगारक्षमते बाबतची आपली पूर्वीची धोरणे ही एखाद्या गोष्टीच्या जवळ जाण्यापेक्षा लांब जाणारी तसेच बऱ्याचदा बाहेरील बदलत्या घटकांवर टीका करणारी आणि जबाबदारी टाळणारी होती. पण उर्दू शायर गालीबने म्हटले आहे,'उमरभर गालीब यही भूल करता रहा, धूल चेहेरे पर थी और आईना साफ करता रहा' त्या प्रमाणे धूळ चेहेऱ्यावर असताना आपण आरसा साफ करत रहातो. भारतातील कमी उत्पादकतेला आणि गरीबीला अनेक कारणे आहेत. परंतू आता आपण, औपचारिकीकरण, नागरीकरण, औद्योगिकिकरण,वित्तियकरण आणि मानवी भांडवल यांचे धोरण अवलंबिले आहे. कार्ल मार्क्स यांनी म्हटलेच आहे की तत्ववेत्यांनी जगातल्या अनेक गोष्टींचे वर्णन केलेले आहे, मूळ मुद्दा आहे तो बदल करण्याचा.

■■■

*लेखक 'टीमलीज सर्व्हिसेस' चे सहसंस्थापक आणि चेअरमन आहेत.*

*ई मेल: manish@teamlease.com*




## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

आढावा

# लोकसंख्याशास्त्रीय फायद्याचा वापर

-के. पी. कृष्णन



**‘भारत कौशल्य अहवाल २०१८’ नुसार,उच्च शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेतलेला फक्त ४६ टक्के युवा वर्ग हा रोजगारक्षम आहे. यामुळे, कौशल्यातील तफावत तसेच आवश्यक कौशल्य नसणे, किंवा कौशल्याची कमतरता हे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे एका बाजुला उद्योगात कौशल्यतेचा अभाव आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेतलेल्या युवा वर्गाला त्यांच्या योग्य रोजगार न मिळणे अशी विरोधाभासात्मक स्थिती तयार होते.**

भारत सध्या लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण काळातून जात असून सरासरी २९ वर्षे वय असलेला भारत हा जगातील सर्वात लहान देश ठरला आहे. यामुळे फक्त वेगाने वाढणाऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेलाच नाही तर जुन्या अर्थव्यवस्था असणाऱ्या पाश्चिमात्य देशांनाही कुशल मनुष्यबळ पुरविण्याची विशेष संधी भारताला मिळाली आहे. २०१६-१७ ला केलेल्या अर्थशास्त्रीय सर्वेक्षणानुसार,सन १९५० पासून पहिल्यांदाच चीन आणि रशिया यासारख्या पुढारलेल्या देशांच्या लोकसंख्येच्या (१५-५९) संयुक्त कार्यरत वयामध्ये (डब्ल्यू ए) २० टक्क्यांनी घट झाली आहे.उलटपक्षी भारताच्या एकूण लोकसंख्येच्या २८ टक्के इतके तरूण असल्यामुळे, संयुक्त कार्यरत वयामध्ये वाढ होत आहे. ही परीस्थिती २०४० पर्यंत टिकू शकेल.

विविध राज्यांच्या लोकसंख्याशास्त्रीय माहिती आणि उत्क्रांती मध्ये आपापसांत मोठी विविधता आहे. भारतातील द्विपकल्प प्रदेश (पश्चिम बंगाल,केरळ कर्नाटक,तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश) आणि मध्य प्रदेश, राजस्थान,उत्तर प्रदेश

आणि बिहार यामध्ये मोठा फरक दिसून येतो. द्वीपकल्पीय राज्ये विकसित अर्थशास्त्रांसारख्या नमुन्याचे प्रदर्शन करत आहेत, तर इतर प्रदेश तुलनेने तरूण आणि गतिमान असून संयुक्त कार्यरत वयामध्ये वाढ दिसून येते. तथापि हा लोकसंख्याशास्त्रीय फायदा घेण्यासाठी आपला युवा कर्मचारी वर्ग हा अर्थव्यवस्थेची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी रोजगारक्षम कौशल्ये आणि माहितीने युक्त असणे आवश्यक आहे.

व्हीबॉक्स ने दर्शविलेल्या 'भारत कौशल्य अहवाल २०१८' नुसार,उच्च शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेतलेला फक्त ४६ टक्के युवा वर्ग हा रोजगारक्षम आहे. यामुळे, कौशल्यातील तफावत तसेच आवश्यक कौशल्य नसणे, किंवा कौशल्याची कमतरता हे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे एका बाजुला उद्योगात कौशल्यतेचा अभाव आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेतलेल्या युवा वर्गाला त्यांच्या योग्य रोजगार न मिळणे अशी विरोधाभासात्मक स्थिती तयार होते.

सन २०२२ पर्यंत अर्थव्यवस्थेच्या २४ महत्वाच्या क्षेत्रात १० कोटी, ९७ लाख, ३० हजार कुशल मनुष्यबळाची गरज लागेल असा अंदाज एन एस डी सी ने केलेल्या एका पहाणीमध्ये वर्तविण्यात आला आहे. यावरून कौशल्य विकास हा रोजगाराचा अविभाज्य घटक ठरतो, तसेच रोजगारक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी अर्थशास्त्रीय विकासाच्या धोरणाचाही आवश्यक घटक ठरतो. आर्थिक विकासाबरोबरच उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी,सर्व क्षेत्रांमध्ये,उद्योजक होण्याच्या संधीसह नवीन आकर्षक रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे यशस्वी कौशल्य धोरणाला आवश्यक आहे.युवकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी उद्योजकता पर्यावरणास बळकट करण्यासाठी एक तातडीची गरज आहे. गेल्या दशकामध्ये अर्थव्यवस्थेच्या तसेच तरूणांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, लोकसंख्याशास्त्रीय संभाव्यतेचा वापर करून,कौशल्य क्षेत्राला बळकटी आणण्यासाठी काही उपाययोजना करण्यात आल्या होत्या.मानव संसाधनांचा सर्वोत्तम वापर करताना असलेली आव्हाने आता थोडक्यात पाहू.

---

**सन २०२२ पर्यंत अर्थव्यवस्थेच्या २४ महत्वाच्या क्षेत्रात १० कोटी, ९७ लाख, ३० हजार कुशल मनुष्यबळाची गरज लागेल असा अंदाज एन एस डी सी ने केलेल्या एका पहाणीमध्ये वर्तविण्यात आला आहे. यावरून कौशल्य विकास हा रोजगाराचा अविभाज्य घटक ठरतो, तसेच रोजगारक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी अर्थशास्त्रीय विकासाच्या धोरणाचाही आवश्यक घटक ठरतो**

---

कौशल्य क्षेत्रातील आव्हानेही श्रमिक बाजारातील परिस्थिती, वेगाने वाढणाऱ्या आर्थिक विकासाची गरज आणि गुणवत्ता, प्रवेश, प्रसार आणि प्रासंगिकता यावर होणारा परिणाम यावर अवलंबून असतात. यापैकी काही आव्हाने अशी आहेत:

१ अल्पशिक्षित तरूणांचे प्रमाण जास्त असणे.

२ कुशल मनुष्यबळाची, रोजगारक्षमता कमी असून तुलनेने मागणी जास्त.

३ शाळा सोडलेल्या मुलांना दुसरी संधी देऊन, औपचारीक क्षेत्रात नोकरी मिळविण्यासाठी प्राथमिक ज्ञान आणि कार्यानुभव देणे.

४ युवा लोकसंख्येच्या तुलनेत मर्यादित आणि असमान शिक्षणाच्या संधी.

५ शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रम आणि करीअर बनविण्याच्या मार्गांवर लक्ष केंद्रीत करण्याचा अभाव, व त्यामुळे दर्जेदार शिक्षकांची अनुपलब्धता.

६ तपासणी आणि प्रमाणपत्रीकरण कार्यक्रम यामध्ये वाढ, ज्या योगे सातत्य नसलेले निकाल आणि उद्योजकांचा गोंधळ होणे.

७ अनौपचारीक किंवा असंघटीत क्षेत्राला प्राधान्य आणि असलेली क्षमता आणि आवश्यक क्षमता यांची नोंद.

८ वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये एकत्रीकरण आणि समन्वय साधणे.

भारतीय अर्थव्यवस्थेला युवा वर्गाच्या कौशल्यावर आधारीत जागतिक आणि स्थानिक रोजगार मिळविण्यासाठी या आव्हानांना सामोरे जावे लागते.

### सरकारी कार्यप्रणालीमध्ये बदल

आधीच्या सरकारी प्रणालीद्वारे वेगवेगळे निकष, दर्जा आणि प्राथमिक माहिती असलेल्या वेगवेगळ्या ४० योजना, २१ मंत्रालयात विभाजित झाल्या होत्या, कौशल्य आणि उद्योजकतेला वाहीलेले मंत्रालय (एम एस डी इ) ,नोव्हेंबर २०१४ मध्ये भारतातील सर्व कौशल्यविकास कार्यक्रमांसाठी सुकाणू मंत्रालय म्हणून स्थापन झाले. शिक्षण संचालनालय, एन एस डी सी आणि एन एस डी ए, अशा अस्तित्वात असलेल्या संस्था आणि नंतर तंत्रनिकेतने, जन शिक्षण संस्था तसेच एन आय इ एस बी यू डी आणि भारतीय उद्योजकता संस्था एम एस डी इ मध्ये, पायाभूत सुविधांच्या एकत्रीककरणासाठी, आणि पुरेपुर

उपयोग करण्यासाठी अनेक कार्यक्रम एम एस डी इ कडे सोपविण्यात आले. त्यानंतर अनेक नविन उपक्रमांना सुरूवात करण्यात आली. नवीन सरकारी प्रणालीची रूपरेखा खाली दर्शविण्यात आली आहे.

**व्यापक स्तरावरील सरकारी धोरण**

सन २००९ चे कौशल्य विकास धोरण अभ्यासल्या नंतर उद्योजकतेवर लक्ष्य केंद्रीत करणारे नवीन धोरण सन २०१५ मध्ये आखण्यात आले. कौशल्य विकास आणि उद्योजकता धोरण २०१५ हे धोरण, मोठ्या प्रमाणावर कौशल्यावर आधारीत तसेच संशोधनावर आधारीत उद्योजकतेचे वातावरण देणारे, ज्याद्वारे संपत्ती आणि रोजगार निर्मिती होऊन देशातील सर्व नागरीकांच्या शाश्वत उपजिविकेसाठी नवी दृष्टी देणारे असे आखण्यात आले. या धोरणात मुख्य बदल करुन अप्रेंटीसशिप कायदा १९६१ यामध्ये उद्योगांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि शिकाऊ उमेदवारांच्या कक्षा वाढविण्यासाठी उद्योगांकडून प्राथमिक माहिती घेण्यात येऊन यामध्ये सन २०१४ ला सुधारणा करण्यात आली. सन २०१५ च्या राष्ट्रीय कौशल्य धोरणामध्ये शिकावू उमेदवारांना कामाच्या ठिकाणी कार्यानुभव देण्याचे धोरण कौशल्य विकास प्रयत्नांचे घटक बनविण्याचे ठरले.

**पध्दतशीर हस्तक्षेप**

माहितीची उपलब्धता, प्रशिक्षण देण्यातील ताळमेळ तसेच क्षमतांचे प्रमाणीकरण याबाबत सुधारणांसाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले.

चांगल्या रोजगारासाठी व्यावसायिक प्रशिक्षण आवश्यक आहे. संधींबाबत माहितीच्या उपलब्धतेवर हे अवलंबून आहे. कामगार माहिती व्यवस्थापन यंत्रणा (एल एम आय एस) या एकत्रित डेटाबेस प्रणालीद्वारे मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाजुची माहिती, वेतनामधील कल, कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असणारी क्षेत्रे, व्यावसायिक तुटवडा इत्यादी माहिती उपलब्ध करून दिली जाते. प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक, उद्योग/वरीष्ठ अधिकारी, सरकारी संस्था/धोरणकर्ते,

**सन २००९ चे कौशल्य विकास धोरण अभ्यासल्या नंतर उद्योजकतेवर लक्ष्य केंद्रीत करणारे नवीन धोरण सन २०१५ मध्ये आखण्यात आले. कौशल्य विकास आणि उद्योजकता धोरण २०१५ हे धोरण, मोठ्या प्रमाणावर कौशल्यावर आधारीत तसेच संशोधनावर आधारीत उद्योजकतेचे वातावरण देणारे, ज्याद्वारे संपत्ती आणि रोजगार निर्मिती होउन देशातील सर्व नागरीकांच्या शाश्वत उपजिविकेसाठी नवी दृष्टी देणारे असे आखण्यात आले**

मूल्यांकन संस्था, प्रमाणित संस्था, निधीपुरवठादार संस्था, आंतरराष्ट्रीय संस्था,क्षेत्र कौशल्य परिषद, मनुष्यबळ पुरवठा संस्था, तसेच प्लेसमेंट संस्था या सर्वांसाठी हे एक खिडकी माहिती केंद्र म्हणून काम करते. राज्यातील मंत्रालये आणि विविध विभाग याठिकाणी कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी काही सामान्य निकष सूचित केले आहेत. कौशल्ये, कौशल्यवाढ, पुनर्विक्री, वित्तपुरवठा, व बाह्य संस्थांकडून प्रमाणिकरण असे काही निकष बंधनकारक केले आहेत. भागिदार संस्थांसाठी समान चौकट बनविण्यासाठी, त्यांच्या दर्जात वाढ होण्यासाठी आणि त्यांच्यात सातत्य राखण्यासाठी ते आवश्यक आहे.

भारतातील लाखो लोक औपचारीक प्रमाणपत्राशिवाय अनौपचारीकरीत्या कौशल्ये शिकतात. अशी माणसे मर्यादित स्वरूपात आणि कमी भौगोलिक मर्यादेत, आपल्या ओळखीच्या माणसांमध्ये व्यवसाय करतात.एन एस क्यू एफ या संस्थेने एक योग्यतेवर आधारित चौकटीनुसार अशा सर्व कौशल्यांचे परीक्षण केले आहे आणि आधी शिकलेल्या शिक्षणाला मान्यता दिली आहे तसेच त्यांच्या कौशल्यांचे योग्य आर्थिक आणि सामाजिक फायदे प्राप्त करण्यासाठी लाखो लोकांना अनुभवी कुशलतेने सक्षम केले आहे. सर्व प्रशिक्षण कार्यक्रम उद्योगमान्य होण्यासाठी एन एस क्यू एफ च्या चौकटीत बसविले आहेत. २६११ पेक्षा जास्त सक्षम माणसे तयार केली गेली आणि २००० पेक्षा जास्त कंपन्यांमध्ये त्यांना प्रमाणित करण्यात आले. प्रत्येक ३ वर्षानंतर सक्षम माणसे उद्योगांच्या गरजेनुसार अधिक सक्षम करण्याची पहाणी एन एस क्यू एफ साठी आवश्यक असते.

बांधकाम, कृषि, घरकाम, आरोग्यविषयक कामे, रत्ने व दागिने यांसारख्या जास्त कामगार लागणाऱ्या क्षेत्रातील कामगार यासाठी सर्वात मोठे लाभधारक असतील.

**वाढती प्रशिक्षण क्षमता**

कौशल्याधारीत अर्थव्यवस्थेची वाढ होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्था- आय टी आय ची भविष्यातील प्रशिक्षण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली आहे. मे २०१४ मध्ये १०,७५० आय टी आय होती, तर मे २०१८ मध्ये ते वाढून १४,२७६ इतकी झाली; प्रवेशक्षमतेमध्ये ५६ टक्के वाढ होउन ती ३० लाख ७३ हजार इतकी झाली. लघु मुदतीचे प्रशिक्षणही सन २०१३-१४ मध्ये ३ लाख ३४ हजारावरून वाढून सन

२०१७-१८ मध्ये १६ लाख इतके झाले. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना पी एम के व्ही वाय अंतर्गत विविध केंद्रे वेगवेगळ्या राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात पसरलेली असून प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

भारतीय कामगारांची गतीशीलता वाढविण्यासाठी ४६० जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री कौशल्य केंद्रांच्या(पी एम के के) स्वरूपात विविध कौशल्ये शिकविली जातात, व ही केंद्रे आणखी स्थापन केली जात आहेत. त्यामुळे कौशल्याधारीत रोजगार क्षमतेमध्ये वाढ होत आहे आणि रोजगार संधी वाढत आहेत. त्याशिवाय डी डी यू- जी के वाय, एन यू एल एम, आय एस डी एस या संस्थाही ग्रामीण तसेच शहरी भागात सर्वसामान्य तसेच विशिष्ट क्षेत्रामध्ये कौशल्य क्षमता वाढवित आहेत. गेल्या ४ वर्षात ही प्रशिक्षण क्षमता वार्षिक एक कोटीपर्यंत वाढली आहे.

याशिवाय कौशल्यांच्या माहिती आणि अभ्यासासाठी इंटरनेट आणि मोबाईल ॲपवर आधारित लायब्ररी सुरू करण्यात आली आहे.

**उपयुक्तता आणि दर्जामध्ये सुधारणा**

प्रशिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी खूप प्रयत्न करण्यात येत आहेत.

पायाभूत सुविधा, साधन सामुग्री, प्रशिक्षक आणि मागील कामगिरी या निकषांवर आधारीत ५ हजार पेक्षा जास्त आय टी आय आणि १५ हजार प्रशिक्षण केंद्रांना श्रेणी देण्यात आल्या आहेत, त्यामुळे प्रशिक्षण संस्थांचा दर्जा समजतो. त्यामुळे प्रशिक्षणार्थिला संस्थेची निवड करणे सोपे जाते. संलग्नतेच्या आणि मान्यतांच्या निकषांच्या बळकटीकरणामुळे आय टी आय मध्ये शिकविण्याच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे.

**चांगल्या रोजगारासाठी व्यावसायिक प्रशिक्षण आवश्यक आहे. संधींबाबत माहितीच्या उपलब्धतेवर हे अवलंबून आहे. कामगार माहिती व्यवस्थापन यंत्रणा (एल एम आय एस) या एकत्रित डेटाबेस प्रणालीद्वारे मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाजुची माहिती, वेतनामधील कल, कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असणारी क्षेत्रे, व्यावसायिक तुटवडाइत्यादी माहितीउपलब्ध करून दिली जाते.**

याही पुढे जाऊन स्मार्ट पोर्टलच्या माध्यमातून प्रशिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी समांतर व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तंत्रज्ञानाचा वापर खूप मोठ्या प्रमाणावर करून केंद्रांची देखभाल, निरीक्षण आणि पहाणी व योजनांची प्रगती यांचा आढावा घेतला जातो.जरी योजनांचे प्रमाण वाढले असले तरी दर्जात्मक सुधारणेच्या प्रयत्नांमुळे, रोजगाराचे प्रमाण, फी घेणाऱ्या संस्थांमध्ये २६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर आणि अनुदान घेणाऱ्या (पी एम के व्ही वाय) संस्थांमध्ये १७ टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. आय टी आय च्या कामकाजामध्ये स्थानिक उद्योगांच्या विशिष्ट गरजानुरूप प्रशिक्षणासाठी खाजगी क्षेत्र सहभाग घेत आहे.

दर्जात वाढ होण्यासाठी प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. याबाबत प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाची प्रक्रीया दर्जात्मक करण्यासाठी मार्गदर्शक नियम आणि निकष लागू केले आहेत. कौशल्याधारीत

**स्वयंरोजगार करणाऱ्याला उद्योजक बनण्यासाठी सुविधा देणाऱ्या योजना**

| योजनेचे नाव | पात्रता | मदतीचे स्वरूप |
|---|---|---|
| दीनदयाळ अंत्योदय योजना – लघू उद्योगांसाठी उद्योजकांना आणि स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्यांसाठी ग्रामीण स्वयंरोजगार शिक्षण संस्था (आर एस इ टी आय) स्थापन करणे.<br>आजिविका ग्रामिण एक्स्प्रेस योजना<br>ग्रामिण उद्योजकता स्टार्ट अप योजना | ग्रामिण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे (बीपीएल) -५० टक्के लाभार्थी अनुसूचित जाती/जमाती, १५ टक्के अल्पसंख्य, ३ टक्के पी डब्लयू डी. स्त्रिया कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे, अत्याचारग्रस्त स्त्रिया, निराधार स्त्रिया इत्यादी. | ग्रामिण बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार असलेले उद्योजक बनविण्यासाठी उद्योगाधारीत कार्यक्रमांसाठी प्रशिक्षण देणाऱ्या व मदत करणाऱ्या आर एस इ टी आय वेगवेगळ्या जिल्ह्यात स्थापन करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांना प्रोत्साहन देण्याचे काम एन आर एल एम करते.<br>गरीब ग्रामिण कुटुंबातील कमीत कमी एक सदस्य, शक्यतो स्त्री, यांना एस एच जी नेटवर्क अंतर्गत आणले जाते. |

| | | |
|---|---|---|
| प्रधानमंत्री मुद्रा योजना | लघुवित्तसंस्था, पतसंस्था, आर आर बी आणि एन बी एफ सी संस्थांना पुनर्वित्तपुरवठा | रू.५०,००० ते रू.१०,००,००० पर्यंत बँक कर्जे. |
| स्टँड अप इंडिया | स्त्रिया, एस टी, एस सी उद्योजक यांचे हरीत उद्योग. | रू.१० लाखापासून रू. १ कोटींपर्यत बँक कर्ज. |
| पी एएम इ जी पी | १८ वर्षावरील व्यक्ती, सहकारी संस्था, स्वयंसहायता गट आणि ट्रस्ट. फक्त नवीन प्रकल्पांसाठी व सरकारी अनुदान नसल्यास. | निर्मिती उद्योगांसाठी रू. २५ लाख आणि सेवा उद्योगांसाठी रू.१० लाख. रू.५ लाखांवरील प्रकल्पांस १० दिवसांसाठी इ डी पी प्रशिक्षण आणि रू. ५ लाखांच्या प्रकल्पापर्यंत ६ दिवसांचे प्रशिक्षण लाभार्थिंसाठी बंधनकारक. रू. १० लाखांपर्यंतचे प्रकल्प सहतारणमुक्त. |
| अस्पायर | योग्य उमेदवारांना स्वत:चा उद्योग सुरू करण्यासाठी संधी देऊन मदत करणे. | उपजीविका व्यवसाय केंद्राच्या जागा आणि पायाभूत सुविधा सोडून यंत्र सामुग्रीच्या किंमतीच्या १०० टक्के एकरकमी अनुदान, किंवा रू. १ कोटी यातील कमी रकमे एवढे, आणि जर सार्वजनिक खाजगी सहभागातून प्रकल्प असेल तर जागा आणि पायाभूत सुविधा सोडून यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान किंवा रू.५० लाख यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम दिली जाते. तंत्रज्ञानविषयक व्यवसाय केंद्रांसाठी यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान किंवा रू.३० लाख यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम दिली जाते. |
| एस एफ आर यू टी आय | पारंपरिक उद्योग व त्यातील कारागीर यांना सामुदायिकरीत्या स्पर्धात्मक बनविणे आणि त्यांच्या दूरगामी शाश्वत विकासासाठी त्यांना मदत करणे. | वारसा समूहासाठी(१००० ते २५०० कारागीर) रू ८ कोटी पर्यंत.<br>मोठा समूह(५०० ते १००० कारागीर) रू.३ कोटी पर्यंत<br>छोटा समूह (५०० कारागीरांपर्यंत) रू.दीड कोटी पर्यंत |
| कोयर उद्यमी योजना (कोयर उद्योगासाठी एस एफ आर यू टी आय) | | प्रकल्पाची जास्तीत जास्त किंमत रू. १० लाखापर्यंत अधिक खेळते भांडवल, परंतु ती किंमत प्रकल्पाच्या किंमतीच्या २५ टक्क्यापेक्षा जास्त नसावी. |

**कोष्टक १ - सरासरी मासिक मिळकत**

| | स्वयंरोजगारीत | नियमित वेतन | कंत्राटी कामगार | प्रासंगिक मजूर |
|---|---|---|---|---|
| कामावर असलेले लोक | ४६.६ | १७.० | ३.७ | ३२.८ |
| रू.५००० पर्यंत | ४१.३ | १८.७ | ३८.५ | ५९.३ |
| रू.५००१ ते रू.७५०० | २६.२ | १९.५ | २७.९ | २५.० |
| रू.७५०१ ते रू.१०००० | १७.४ | १९.० | २०.३ | १२.० |
| रू.१०००१ ते रू.२०००० | ११.१ | २३.६ | ११.० | ३.५ |
| रू.२०००१ ते रू.५०००० | ३.५ | १७.७ | २.१ | ०.३ |
| रू.५०००१ ते रू.१००००० | ०.४ | १.४ | ०.१ | ०.० |
| रू १००००० च्या पुढे | ०.१ | ०.२ | ०.० | ०.० |

*स्रोत- वार्षिक रोजगार – बेरोजगार अहवाल सर्वेक्षण २०१५-१६, लेबर ब्यूरो*

अर्थव्यवस्थेमध्ये प्रशिक्षकांचे आणि प्रशिक्षणार्थिंचे एकत्रीकरण, त्यांच्या माहितीचे नोंदणीकरण, यासाठी तक्षशीला पोर्टल सुरू केले आहे.

**अनौपचारिक कौशल्यांना औपचारिक करणे: पूर्व शिक्षण आणि प्रशिक्षणाची मान्यता आणि उमेदवारी**

भारतातील ९३ टक्के लोक हे अनौपचारीकरित्या रोजगारीत आहेत. यापैकी अनेकांनी औपचारीक व्यावसायिक शिक्षण घेतलेले नसल्याने त्यांच्या प्रगतीमध्ये अडसर निर्माण होत आहे. अशा कामगारांना सुविधा पुरविण्यासाठी आणि अनौपचारीक क्षेत्रातील आवश्यक कौशल्यांची नोंद करण्यासाठी कामगारांच्या कौशल्याची परीक्षा, तपासणी आणि मानांकन करणारा 'पूर्व शिक्षण आणि प्रशिक्षणाची मान्यता' ( आर पी एल) हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. आतापर्यंत पी एम के व्ही वाय योजने अंतर्गत ९ लाख प्रशिक्षणार्थिंचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. कौशल्य प्रशिक्षणाच्या परीक्षण आणि प्रमाणिकरणामुळे औपचारीक रोजगाराकडे प्रशिक्षणार्थिंची गतीशीलता वाढली आहे. कामगारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील करीयरमध्ये अधिक प्रगती आणि वेतन मिळण्यासाठीआर पी एल प्रमाणिकरणाची मदत झाल्याचे निदर्शनास आले आहे. जवळजवळसर्व प्रकरणात प्रशिक्षणार्थिंचा आत्मविश्वास आणि कौशल्य प्रमाणिकरणातून गौरव प्राप्त झाल्याचे दिसून आले.

गुरू-शिष्य परंपरा ही कौशल्य हस्तांतरणाची खूप जुनी पध्दत आहे. कौशल्य विकासाच्या या पारंपरिक पध्दतीमध्ये कार्यानुभव मिळत असल्यामुळे ही पध्दत काळाच्या कसोटीवर टिकून आहे. त्यामुळेच या पध्दतीला अनेक देशांनी त्यांच्या कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये जागा दिली आहे. उमेदवारी पध्दतीमुळे उद्योगाला लागणारे मनुष्यबळ

मिळण्यास चालना मिळते. अनेक देशांनी उमेदवारीची ही पध्दत स्विकारली आहे. – जपान मध्ये १ कोटीपेक्षा जास्त लोक उमेदवारी करत आहेत, जर्मनी मध्ये ३० लाख उमेदवार आहेत, आणि अमेरीकेत ५० हजार उमेदवार आहेत. भारतामध्ये फक्त ३० हजार लोक उमेदवार आहेत. हा आकडा भारताच्या, जिथे१८ ते ३५ वयोगटातील ३० कोटी लोक आहेत, त्यामानाने खूपच कमी आहे.

विना अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये तसेच औद्योगिक वैकल्पिक क्षेत्रामध्ये प्रशिक्षणार्थिंची कक्षा वाढविण्यासाठी अगोदर नमूद केल्याप्रमाणे, उमेदवारी कायदा,१९६१ मध्ये सन २०१४ ला सुधारणा करण्यात आली. याही पुढे जाऊन राष्ट्रीय उमेदवारी बढती कार्यक्रमाच्या योजनेनुसार मानधनाच्या स्वरूपात (रू. १५००/ महिना) आणि बेसिक (रू.७५००) अशी प्रशिक्षणाची किंमत मालकाला पुरविली जाते.

उमेदवारी पध्दतीची प्रक्रीया आणि योजनेची देखभाल व प्रभावी प्रशासनाकरिता वापरायला सोपे ऑनलाईन पोर्टल ( www.aprenticeship.gov.in)सुरू करण्यात आले आहे. पोर्टल मार्फत उद्योजकाला नोंदणी पासून ते रोजगारांची उपलब्धता व दावे दाखल करण्यासाठी; तसेच प्रशिक्षणार्थीला नोंदणी पासून ते नियुक्तीपत्र मिळेपर्यंत सेवा दिल्या जातात.

एम एस डी इ ही संस्था कौशल्ययुक्त अर्थव्यवस्थेसाठी पुढाकार घ्यायला उद्योजकांना प्रोत्साहन देत असून, त्यासाठी नियमांची नियंत्रक चौकट बनवित आहे. उद्योगनुकूल मनुष्यबळ घडविण्यासाठी आणि भारताला जगाची कौशल्य राजधानी बनविण्यासाठी एन ए पी एस ही संस्था पुढाकार घेत आहे

### कौशल्य मिळविणे प्रेरणादायक करणे

रोजगाराची आणि चांगल्या वेतनाची कमतरता तसेच माहितीच्या प्रमाणबध्दतेचा अभाव हे व्यावसायिक शिक्षणाकडे प्रवृत्त करणारे घटक आहेत. एन एस क्यू एफ ने कौशल्ये आणि नेहमीचे शिक्षण यांच्यात गतीशीलता आणून प्रगतीचे मार्ग खुले केले आहेत. प्रादेशिक स्तरावरील कौशल्य स्पर्धा आणि जागतिक स्तरावरील कौशल्य स्पर्धांनी ओळख निर्माण करणारा आणि प्रदर्शन करणारा मंच पुरविला आहे. नुकत्याच झालेल्या जागतिक कौशल्य स्पर्धेत ९ तरूण भारतीयांनी अबूधाबी येथे गुणवत्तेची रजत आणि कांस्य पदके जिंकली.

**पायाभूत सुविधा, साधन सामुग्री, प्रशिक्षक आणि मागील कामगिरी या निकषांवर आधारीत ५ हजार पेक्षा जास्त आय टी आय आणि १५ हजार प्रशिक्षण केंद्रांना श्रेणी देण्यात आल्या आहेत, त्यामुळे प्रशिक्षण संस्थांचा दर्जा समजतो. त्यामुळे प्रशिक्षणार्थिला संस्थेची निवड करणे सोपे जाते. संलग्नतेच्या आणि मान्यतांच्या निकषांच्या बळकटीकरणामुळे आय टी आय मध्ये शिकविण्याच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे.**

पहिल्यांदाच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये आणि कौशल्य केंद्रांमध्ये प्रमाणपत्रांचे वितरण आणि पदवीदान सोहोळे आयोजित करण्यात आले. युवावर्ग आणि त्यांचे समाज यांना कौशल्य हा करीयरला समांतर पर्याय म्हणून प्रोत्साहीत करण्यासाठी कौशल्य मेळ्यांचे आयोजन करण्यात येते. साखळी पूर्ण करण्यासाठी आणि रोजगाराच्या संधींपर्यंत पोहोचण्यासाठी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. अशाचप्रकारे उद्योग व संस्था यांचा मेळ घालून सेंचुरीयन विद्यापीठ चांगल्या रोजगारांची संधी देते,

### भारताला जागतिक कौशल्य राजधानी बनविणे

युरोपातील देशात तांत्रिक कौशल्यांसाठी आणि मध्य पूर्वेतील देशात बांधकाम आणि किरकोळ क्षेत्रात रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर भारतीय लोक जातात. देशाबाहेर जाण्याच्या दरामध्ये असा थोडा बदल होत आहे की तुलनेने संपन्न अशा कर्नाटक आणि केरळ पेक्षा उत्तर प्रदेश आणि बिहार मधून जास्त स्थलांतर होत आहे. देशातून स्थलांतर करणाऱ्या कामगारांपैकी कौशल्य असलेली आणि नसलेले २५ टक्के लोक उत्तर प्रदेशातील आहेत.

भारतीय कामगारांच्या गतीशीलतेसाठी जागतिक स्तरावर एम एस डी इ या संस्थेने एम इ ए इंडिया इंटरनॅशनल स्किल सेंटर या संस्थेद्वारे कौशल्य शिक्षण आणि प्राथमिक भाषेचे शिक्षण देणारी केंद्रे सुरू केली आहेत. प्रशिक्षणार्थिंना आय आय एस सी संस्थेद्वारे जागतिक गतिशीलतेची प्रमाणपत्रे सुविधा देण्यात येतात. याशिवाय तात्पुरत्या स्वरूपातील रोजगाराच्या संधी देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख आणि शिक्षणाच्या संधी दिल्या जातात. उदाहरणार्थ,जपान बरोबर तांत्रिक इंटर्नशिप आणि प्रशिक्षण कार्यक्रम (टी आय टी पी). या अंतर्गत तांत्रिक प्रशिक्षणार्थिंना भारतातून ३ वर्षांकरीता जपानी कंपन्यांमध्ये पाठविण्यात येते.

### भविष्यातील उपक्रम

लोकसंख्याशास्त्रीय आर्थिक

**उमेदवारी पध्दतीची प्रक्रीया आणि योजनेची देखभाल व प्रभावी प्रशासनाकरिता वापरायला सोपे ऑनलाईन पोर्टल ( www. aprenticeship.gov.in) सुरू करण्यात आले आहे. पोर्टल मार्फत उद्योजकाला नोंदणी पासून ते रोजगारांची उपलब्धता व दावे दाखल करण्यासाठी; तसेच प्रशिक्षणार्थीला नोंदणी पासून ते नियुक्तीपत्र मिळेपर्यंत सेवा दिल्या जातात.**

वाढीच्या फायद्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवशयकता, रोजगार उपलब्थता आणि उत्पादकतेतील वाढ यांची क्षमता अधोरेखित झाली आहे.भारतातील कामगारांची शैक्षणिक पातळी कमी दर्जाची आहे. लोकसंख्येच्या होणाऱ्या प्रचंड वाढीच्या तुलनेने प्रशिक्षित कामगारांची संख्या कमी आहे. जरी सरकारने धोरणात्मक आणि संस्थात्मक कामे केली तरी हा कार्यक्रम साध्य होण्यासाठी सरकार, प्रशिक्षण देणारे, राज्य सरकारे आणि जिल्हास्तरावरील अधिकारी, उद्योग, आणि नागरी समाज यांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे.

गेल्या ३ वर्षात कौशल्याधारीत अर्थव्यवस्थेमध्ये संस्थात्मक आणि धोरणात्मक बदल झाले, त्यामुळे दर्जात्मक परीणाम आणि प्रमाण मिळाले. तरीही काही आव्हानांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

### छोट्या उद्योगांचे बाजारपेठेमध्ये एकत्रीकरण

सलग उपजिविकेच्या संधींमधील अडथळे हे स्थलांतरासमान आव्हान आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ग्रामीण भागातील लघुउद्योग मोठ्या बाजारपेठेत सामावण्यामुळे स्थलांतरावर मर्यादा येतील आणि सलग उपजिविकेच्या संधी वाढतील. स्थानिक स्तरावर आवश्यक असलेल्या कौशल्यांचे प्रशिक्षण राज्य सरकारच्या पी एम के व्ही वाय या योजनेद्वारे दिले जाते. याबरोबरच राज्यांना पी एम के व्ही वाय या योजनेचे फायदे घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

### कौशल्य वेतनात वाढ

भारतीय उद्योगात प्रशिक्षित मजुरांना वाढीव वेतन न मिळणे ही वास्तविकता आहे, कारण हे उद्योग वस्तुंच्या किंमतींकडे लक्ष देताना मजुरांच्या कौशल्याचे फायदे लक्षात घेत नाहीत. वाढीव वेतनाच्या अभावामुळे विद्यार्थी अकुशल मजुरीकडे वळतात आणि प्रशिक्षण घेण्यापेक्षा कामाच्या ठिकाणीच शिकतात. दुसऱ्या बाजुने यामुळे प्रशिक्षित उमेदवार रोजगाराविना रहातात, किंवा रोजगाराच्या योग्य संधी न मिळाल्यामुळे कमी प्रतीची कामे स्विकारतात.

### अनौपचारीक आणि असंघटीत अर्थव्यवस्था

अनौपचारीक क्षेत्रातील कौशल्य गरजांकडे लक्ष देण्यासाठी जिल्हा पातळीवरील अभ्यासातून रोजगार संधी आणि आवश्यक कौशल्ये यांची अचूक माहिती गोळा करण्याची आवश्यकता आहे.

खाजगी क्षेत्राला निधी पुरवठ्यासाठी प्रोत्साहन

उद्योगांकडून कौशल्य विकासासाठी निधी मिळण्यासाठी १० वर्षांपेक्षा जास्त प्रयत्न करूनही उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला नाही. उद्योग हे प्रशिक्षित मनुष्यबळाचे थेट लाभार्थी असुनही कौशल्य शिक्षणाच्या पुढाकारासाठी लागणारा निधी हा सरकारकडून दिला जातो. उद्योगांकडून कौशल्य विकास कार्यक्रम राबवून घेण्यासाठी परताव्यायोग्य सहभाग, लेव्ही किंवा बंधनकारक उपकर या पर्यायांचा वापर करून उद्योगांना कौशल्य विकास कार्यक्रमासाठी प्रोत्साहित करावे लागेल.

यातून हा निष्कर्ष निघतो की फक्त कौशल्य विकास हा पुरेसा नाही, तर दर्जेदार रोजगारांची उपलब्धता व त्यासाठी कामगार धोरण आणि वेतनाची नोंद, स्वयंरोजगार आणि कौशल्यातील वाढीचे प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच ते उद्योगपूरक असणे या सर्व गोष्टींचा मिलाप आवश्यक आहे.

■■■

*लेखक केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: secy-msde@nic.in*

आगामी अंक
ऑक्टोबर २०१८
'महिला सक्षमीकरण'

सुविधा

# रोजगारविषयक विश्वसनीय माहिती- काळाची गरज

-राजीव कुमार



**भारताच्या लोकसंख्या वाढीच्या अलीकडच्या दरांनुसार, दर वर्षी १ ते १.२ कोटी व्यक्ती नोकऱ्यांच्या बाजारात उतरतात. दरवर्षी नोकऱ्या किंवा रोजगाराच्या शोधात असलेल्या एकूण व्यक्तींमध्ये कामकरी स्त्रियांचा सहभाग फक्त २७ ते ३० टक्के आहे. नवीन नोकऱ्या निर्माण करणाऱ्यांसाठी ही खरंतर खूप चिंताजनक संख्या आहे. आमचे म्हणणे असे आहे की, आत्ता उपलब्ध असलेली सध्याची माहिती या सत्याकडे बिनचूकपणे निर्देश करते की अर्थव्यवस्थेने एकूण कामगारांमध्ये नव्याने जोडल्या गेलेल्या कामगारांना सामावून घेण्यासाठी आवश्यक तितक्या रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र,या संधी,गेल्या काही वर्षांत बेरोजगार राहिलेल्या तरुणांची रोजगार संधींमधील तूट भरून काढू शकत नाहीत.**

भारताच्या तरुण आणि वाढत्या लोकसंख्येसाठी मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या किंवा रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. तरुणांना चांगल्या दर्जाच्या नोकऱ्या हव्या आहेत ज्या त्यांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करू शकतील. म्हणूनच, भारतात,रोजगाराच्या किंवा बेरोजगाराच्या स्थितीबाबतची चर्चा हा वादाचा मुद्दा होणे अगदी साहजिक आहे. तरीही, अत्यंत आवश्यक अशा या विषयावरच्या चर्चेला तीन मुख्य कारणांमुळे काही मर्यादा पडतात.

पहिले कारण म्हणजे, देशातील सुमारे ८० टक्के नोकऱ्या किंवा रोजगार असंघटीत क्षेत्रातील आहेत आणि त्यामुळेच त्यांची नेमकी मोजदाद होणे अत्यंत कठीण आहे.दुसरे कारण म्हणजे, नव्या अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी सध्याच्या सरकारने सुरु केलेल्या प्रयत्नांमुळे असंघटीत क्षेत्रात रोजगाराच्या अनेक अतिरिक्त संधी निर्माण झाल्या आहेत. या नव्या संधी देखील कोणत्याही अधिकृत माहिती संग्रहामध्ये संकलित होत नाहीत.तिसरे कारण म्हणजे, नोकऱ्यांच्या शोधात असलेल्या आपल्या तरुण वर्गाला त्यांना अपेक्षित दर्जाच्या नोकऱ्या आणि योग्य मोबदला देऊ केला जात नाही हे उघड आहे.सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात येणाऱ्या अर्जांवरून हे दिसून येतेच. पण त्या अर्जांच्या संख्येवरून देशात एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेरोजगार व्यक्ती आहेत असे मानणे योग्य नाही. भारताची अर्थव्यवस्था सध्या संतुलित वाढीच्या मार्गाने पुढे निघाली आहे आणि सध्याचा हा वेग येत्या काही वर्षांमध्ये कायम राहावा म्हणून देशाच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर असलेल्या तरुण वर्गाला नोकऱ्या किंवा रोजगार पुरविणे आवश्यक आहे. भारताच्या लोकसंख्या वाढीच्या



अलीकडच्या दरांनुसार, दर वर्षी १ ते १.२ कोटी व्यक्ती नोकऱ्यांच्या बाजारात उतरतात. दरवर्षी नोकऱ्या किंवा रोजगाराच्या शोधात असलेल्या एकूण व्यक्तींमध्ये कामकरी स्त्रियांचा सहभाग फक्त २७ ते ३० टक्के आहे (हा देखील चिंतेचाच विषय आहे.) नवीन नोकऱ्या निर्माण करणाऱ्यांसाठी ही खरंतर खूप चिंताजनक संख्या आहे. आमचे म्हणणे असे आहे की, आत्ता उपलब्ध असलेली सध्याची माहिती या सत्याकडे बिनचूकपणे निर्देश करते की अर्थव्यवस्थेने एकूण कामगारांमध्ये नव्याने जोडल्या गेलेल्या कामगारांना सामावून घेण्यासाठी आवश्यक तितक्या रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र,या संधी,गेल्या काही वर्षांत बेरोजगार राहिलेल्या तरुणांची रोजगार संधींमधील तूट भरून काढू शकत नाहीत.

### रोजगारविषयक सद्यस्थितीची विश्वसनीय माहिती

रोजगाराबाबतच्या विश्वसनीय माहितीच्या अभावी भारतातील रोजगारातील वाढ किंवा घट यावर सध्या होत असलेली चर्चा संभ्रम निर्माण करणारी आहे. सरकारच्या विविध मंत्रालयांकडून वेळोवेळी केले जाणारे

**विश्वसनीय माहितीचा अभाव लक्षात घेता,नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष, प्रा. अरविंद पंगरीया यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१७ मध्ये एका कार्यदलाची स्थापना करण्यात आली. भारतातील रोजगारविषयक माहितीची काय परिस्थिती आहे याचा आढावा घेण्याचे काम या कार्यदलाकडे सोपविण्यात आले होते.रोजगारविषयक माहितीवर आधारित वार्षिक सर्वेक्षण करण्यात यावे अशी शिफारस या कार्यदलाने जुलै २०१७ मध्ये केली. हे कुटुंबाधारित सर्वेक्षण असून सध्या त्याचे काम सुरु आहे.**

सर्वेक्षण आणि त्यातून उपलब्ध होणारी आकडेवारी हाच सध्या रोजगारविषयक सद्यस्थितीच्या माहितीचा अधिकृत आणि विश्वसनीय स्रोत आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या राष्ट्रीय नमुने सर्वेक्षण कार्यालयाने केलेल्या रोजगारी-बेरोजगारीविषयक सर्वेक्षणातून मिळालेली माहिती हा भारतातील शहरी तसेच ग्रामीण भागातील कृषी,उद्योग,सेवाक्षेत्र इत्यादी घटकांमधील कामगारांच्या संख्येविषयीचे चित्र स्पष्ट करणारा सर्वसमावेशक स्रोत आहे. यापूर्वी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात हे सर्वेक्षण झाले होते. म्हणजेच सध्या या सर्वेक्षणातून उपलब्ध असलेली माहिती सहा वर्षांपूर्वीची आहे. कामगार कार्यालयाने केलेले कामगारविषयक वार्षिक सर्वेक्षण२०१५-१६ मध्ये करण्यात आले होते. म्हणजेच त्यातून मिळालेली माहिती देखील काहीशी कालबाह्यच झालेली आहे. याचाच अर्थ, देशातील रोजगाराची गेल्या तीन-चार वर्षांमध्ये काय स्थिती आहे याचे चित्र स्पष्ट करणारी कोणतीही विश्वसनीय माहिती आजघडीला उपलब्ध नाही. कामगार कार्यालयाचा सर्वात अलीकडचा रोजगारविषयक तिमाही सर्वेक्षण अहवाल, ज्यात २०१७ या वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीतील सर्वात ताजे निष्कर्ष नोंदलेले आहेत, तो अहवाल देखील फक्त ८ क्षेत्रांमधील म्हणजे एकूण अर्थव्यवस्थेच्या १५ टक्क्यांपेक्षाही कमी क्षेत्रांमधील रोजगारविषयक परिस्थितीची माहिती देतो. त्यामुळे, संपूर्ण देशभरातील रोजगार किंवा नोकऱ्या याबद्दलची नीटशी कल्पना त्यातून मिळत नाही.

### रोजगारविषयक माहिती

गेली दोन वर्षे, सरकारच्या रोजगारविषयक माहिती संकलनामधील पोकळीभारतीय अर्थव्यवस्था पर्यवेक्षण केंद्र आणि मुंबई शेयर बाजाराच्या संयुक्त त्रिवार्षिक रोजगार अहवालाने भरून काढली आहे.सुरजित भल्ला आणि तीर्थ दास यांनी त्यांच्या भारतीय अर्थव्यवस्था पर्यवेक्षण केंद्राच्या कार्यपद्धती बाबतच्या तपशीलवार समालोचनात असे म्हटले आहे की, या केंद्राच्या अहवालात सर्व प्रकारच्या त्रुटी असल्यामुळे तो फारसा विश्वासार्ह ठरत नाही. उदाहरणार्थ, भल्ला आणि दास म्हणतात की केंद्राच्या अहवालात असे नमूद केले आहे की एकूण कामगारांमध्ये स्त्री कामगारांचा सहभाग

२०१४ मध्ये २६.४ टक्के होता. त्यात घसरण होऊन २०१७ मध्येतो ११.७ इतका कमी झाला. रोजगार किंवा नोकऱ्यांमधील स्त्रियांच्या सहभागाच्या दरात इतकी तीव्र घसरण अतार्किक वाटते.अशा अनेक विसंगतींमुळे भारतीय अर्थव्यवस्था पर्यवेक्षण केंद्राने तयार केलेल्या अहवालातील माहिती आणि रोजगारी-बेरोजगारी विषयक निष्कर्ष फारसे भरवशाचे नाहीत. विश्वसनीय माहितीचा हा अभाव लक्षात घेता,नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष, प्रा. अरविंद पंगरीया यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१७ मध्ये एका कार्यदलाची स्थापना करण्यात आली. भारतातील रोजगारविषयक माहितीची काय परिस्थिती आहे याचा आढावा घेण्याचे काम या कार्यदलाकडे सोपविण्यात आले होते.रोजगारविषयक माहितीवर आधारित वार्षिक सर्वेक्षण करण्यात यावे अशी शिफारस या कार्यदलाने जुलै २०१७ मध्ये केली. हे कुटुंबाधारित सर्वेक्षण असून सध्या त्याचे काम सुरु आहे. राष्ट्रीय नमुने सर्वेक्षण कार्यालयाने घराघरात जाऊन रोजगारविषयक माहिती घेण्याचे काम सुरु केले आहे आणि त्याचा पहिला अहवाल सन २०१९ च्या पूर्वार्धात प्रकाशितहोईल अशी अपेक्षा आहे. एकदा हा अहवाल हाती आला की, भारतातील नोकऱ्या, रोजगाराबाबतच्या सर्व अनावश्यक चर्चा,वाद-विवाद आणि निरनिराळे अंदाज यांना पूर्णविराम मिळेल.

**रोजगार निर्मिती : अंदाज**

वेतनपटाबाबतचा अहवाल : भारतात प्रथमच, सध्या अस्तित्वात असलेल्या औपचारिक नोकऱ्या आणि दर महिन्याला त्यात होणारी वाढ यांचे मोजमाप करण्यासाठी,वेतनपटावर किंवा हजेरीपटावर असलेल्या कामगारांचा माहिती अहवाल तयार करण्याचे प्रयत्न सुरुझाले.संपूर्ण भारतातील नोकऱ्या करणाऱ्या व्यक्तींच्या, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने तयार केलेल्या माहिती अहवालावरून असे दिसते की सप्टेंबर २०१७ ते एप्रिल २०१८ या कालावधीत ४१ लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. याआधी घोष आणि घोष यांनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने मिळवलेली माहिती तसेच कर्मचारी राज्य विमा महामंडळ आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली यांच्याकडून मिळालेली माहिती या सगळ्यांचे एकत्रीकरण करून असा निष्कर्ष काढला की २०१६-१७ या वर्षात देशाच्या अर्थव्यवस्थेत ७० लाख नवीन नोकऱ्यांची भर पडली. लेखक या प्रकल्पासाठी नीती आयोगाशी जोडले गेले आणि औपचारिक नोकऱ्यांची मोजदाद करताना त्यांनी सर्वात नव्याने नोकरीला लागलेल्यांचीच मोजणी केली तसेच कुठल्याही परिस्थितीत एक नोकरी दोन वेळा मोजली जाणार नाही याची काळजी घेतली. एकट्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने जाहीर केलेल्या माहितीनुसार, २०१७-१८ या वर्षात ५५ लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या,तर २०१६-१७ या वर्षात ४५ लाख नोकऱ्यांची निर्मिती झाली होती. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेची स्थापना झाल्यानंतर आता प्रथमच त्यांचा नोकरीविषयक माहिती अहवाल नियमितपणे जाहीर होऊ लागला आहे.त्यांनी सप्टेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत ४१ लाख नवीन रोजगार किंवा नोकऱ्या उपलब्ध झाल्या असा दिलेला अंदाज,घोष आणि घोष यांनी दिलेल्या अंदाजाला पुष्टी देणारा आहे. औपचारिक किंवा संघटीत क्षेत्रातील नोकऱ्यांच्या संख्येचा अंदाज हजेरीपटावरून घेता येतो त्या प्रमाणेच,असंघटीत क्षेत्रातदेखील रोजगार निर्माणाच्या भरपूर यशोगाथा आहेत, त्यांच्यावरून या क्षेत्रात सध्या नव्याने वाढीस लागलेले रोजगाराचे नवे नवे मार्ग दृष्टीस पडत आहेत. त्याबद्दलच्या मुद्द्यांवर आता चर्चा करू या.

**भारतातील २० शहरांमध्ये नोव्हेंबर २०१४ मध्ये वाहन सेवा देणाऱ्या ओला या कंपनीचे ३७ हजार नोंदणीकृत चालक सदस्य होते. त्यात मार्च २०१८ मध्ये वाढ होऊन देशभरातील ११० शहरांमध्ये या कंपनीचे १० लाख नोंदणीकृत चालक सदस्य झाले. याच वेळेस वाहन सेवा देणारी जागतिक कंपनी उबरचे भारतातील शहरांमध्ये १२ लाखांपेक्षा जास्त नोंदणीकृत चालक सदस्य झाले आहेत. फक्त या भाडोत्री वाहन व्यवसायातून गेल्या ४ वर्षात २२लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण झाले आहेत.**

**असंघटीत क्षेत्र**

भारतातील एकूण कामगारांपैकी ८० टक्के श्रमिक असंघटीत क्षेत्रात काम करतात. सध्याच्या सरकारने आणि नव्या अर्थव्यवस्थेने रोजगार निर्मितीला मदत करण्यासाठी अनेक नवनवीन मार्ग अवलंबिले आहेत. नव्या अर्थव्यवस्थेने सदस्यत्वावर आधारित रोजगार निर्मितीच्या संकल्पनेतून ओला आणि उबर यासारख्या कंपन्यांमध्ये चालकांना भागीदारी किंवा फ्लीपकार्ट, अमेझॉन किंवा स्नेपडील अशा वितरण सेवा देणाऱ्या व्यावसायिक कंपन्यांमध्ये तसेच अर्बनक्लैप आणि क्विकर इत्यादी सेवांसारख्या पातळीवर घरगुती सेवा पुरविणारे व्यावसायिकगट यांना रोजगार मिळाले आहेत. हे सर्व व्यावसायिक, याच कंपन्यांमध्ये औपचारिकरीत्या नोकऱ्या करणाऱ्या इतर कर्मचारी वर्गापेक्षा वेगळे आहेत



आणि म्हणूनच त्यांना रोजगाराचे कोणतेही अधिकृत किंवा अनौपचारिक नियम कायदे लागू होत नाहीत. याचे स्पष्टीकरण देण्यासाठी आपण अनेक उदाहरणे बघू शकतो. भारतातील २० शहरांमध्ये नोव्हेंबर २०१४ मध्ये वाहन सेवा देणाऱ्या ओला या कंपनीचे ३७ हजार नोंदणीकृत चालक सदस्य होते त्यात मार्च २०१८ मध्ये वाढ होऊन देशभरातील आता ११० शहरांमध्ये या कंपनीचे १० लाख नोंदणीकृत चालक सदस्य झाले. याच वेळेस वाहन सेवा देणारी जागतिक कंपनी उबरचे भारतातील शहरांमध्ये १२ लाखांपेक्षा जास्त नोंदणीकृत चालक सदस्य झाले आहेत. फक्त या भाडोत्री वाहन व्यवसायातून गेल्या ४ वर्षात २२लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण झाले आहेत. अर्बनक्लैप आणि क्विकर सेवांसारख्या सेवांकडे स्वतंत्रपणे २५ लाख व्यावसायिकांनी मोठ्या महानगरांमधील सेवांसाठी त्या कंपन्यांच्या पोर्टलवर नोंदणी केली आहे. दर वर्षी हजारोंच्या संख्येने

**जरी मुद्रा कर्ज योजनेतून कर्ज घेतलेल्या प्रत्येक उद्योगातून प्रत्येकी एकच रोजगार उपलब्ध झाला असे आपण मानले आणि असेही मानले की पुन्हा पुन्हा कर्ज घेणाऱ्या प्रकल्पांतून कोणतेही नवीन रोजगार निर्माण झाले नाहीत तरीही एकट्या मुद्रा योजनेतून ६ कोटी नवीन रोजगार निर्माण झाले हे आपण मान्य करायलाच हवे. ही संख्या, आधीच्या आकडेवारीत एकत्र केली किंवा अनौपचारिक सेवा क्षेत्रात नव्याने निर्माण झालेल्या नोकऱ्यांमध्ये मिळवली तर आपण शेवटी असे नक्कीच म्हणू शकतो की गेल्या चार वर्षांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली.**

सनदी लेखापाल (सी.ए.), कंपनी सचिव,वकील आणि इतर व्यावसायिक त्यांची कामे सुरु करतात आणि त्यांच्या कामात मदत करण्यासाठी म्हणून त्यांना अनेक मदतनीस आणि इतर संबंधित कामे करणाऱ्या लोकांची अतिरिक्त गरज भासते. यामुळे अनेक लोकांना नोकऱ्या उपलब्ध होतात. या लोकांच्या रोजगारांची देखील कुठेही नोंद आणि मोजणी होत नाही. अर्थव्यवस्थेने निर्माण केलेल्या अनेक रोजगारांमध्ये त्यांचीही संख्या जोडली जायला हवी. वस्तूंची रस्ते मार्गाने वाहतूक करण्याच्या क्षेत्रात २०१३मध्ये वस्तू वाहतूक करणारे८१ लाख नोंदणीकृत ट्रक होते. प्रत्येक वर्षी त्यात सुमारे७ लाख नव्या ट्रकची भर पडत गेली आणि आत्ता या घडीला भारतीय रस्त्यांवर त्यांची कामे करत आहेत.आमच्या माहितीप्रमाणे, या वाहतूक व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या कोणत्याही कामगाराची कुठल्याही अधिकृत रोजगारविषयक माहिती अहवालात नोंद झालेली नाही. त्याच प्रकारे, ऑटोरिक्षा चालवून तसेच शहराच्या सीमावर्ती भागात आणि ग्रामीण भागात विविध वाहने चालवून उदर निर्वाह करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींची देखील कुठेही अधिकृत नोंद नाही. अशा सर्व अनौपचारिक सेवा क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या सर्व कामगारांचा हिशोब केला तर फक्त

वाहतूक क्षेत्रासाठीचा हा आकडा सहजपणे १२-१५ लाखांपर्यंत पोहोचेल. याच प्रकारे रस्त्याच्या कडेची खाण्याची दुकाने चालवणारे, पर्यटन क्षेत्राशी संबंधित कामे करणारे, ग्रामीण भागात भाजी बाजारांमध्ये, छोट्या बाजारांमध्ये आणि त्यासारख्याच इतर ठिकाणी काम करणारे यांची देखील कुठेच नोंद नाही. थोडक्यात, अशा सर्व अनौपचारिक किंवा ज्यांची नोंद होत नाही अशा ठिकाणी किंवा व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांसाठी चांगल्या रोजगार नोंदीची यंत्रणा तयार केल्याशिवाय गेल्या चार वर्षातल्या रोजगाराच्या किंवा रोजगार निर्मितीच्या परिस्थिती बाबत कोणत्याही निष्कर्षावर पोहोचणे दिशाभूल करणारे ठरेल. वर दिलेल्या पुराव्यांवरून या परंपरागत व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या लोकांचा आम्ही अंदाज घेतला तर गेल्या दोन वर्षात ७० ते ८५ लाख नवीन रोजगार निर्माण झाले असतील असे दिसत आहे. वर चर्चिलेल्या व्यवसायांमध्ये निर्माण होत असलेल्या कामगारांना सामावून घेण्यासाठी ही पुरेशी आहे.

**स्वयंरोजगार**

याशिवाय, स्वयंरोजगार करीत असलेल्या व्यक्तींचाही स्वतंत्रपणे विचार व्हायला हवा कारण,गेल्या चार वर्षांत अशा लोकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. सध्याच्या सरकारने सुरु केलेली मुद्रा कर्ज योजना व्यावसायिकांना स्वयंरोजगार आणि रोजगार निर्मिती वाढवण्यासाठी अत्यंत सहाय्यकारी ठरली आहे. मुद्रायोजनेद्वारे तीन प्रकारची कर्जे दिली जातात. (१) शिशु: यात ५० हजारापर्यंत कर्ज दिले जाते.(२)किशोर : या अंतर्गत ५० हजार ते ५ लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते.(३)तरुण: ह्या प्रकारच्या योजनेत ५ ते १० लाखांपर्यंत कर्ज मिळण्याची सुविधा आहे. गेल्या तीन वर्षांत या योजनेतून,१२ कोटी २७ लाख लोकांना कर्ज वितरीत झाली. या सर्वांची एकूण कर्जाची रक्कम ६ लाख कोटी इतकी होते. एकूण कर्जदारांपैकी, ७४ टक्के म्हणजे ९ कोटी कर्जदार स्त्रिया आहेत.नवीन कर्जदारांची संख्या २६ टक्के म्हणजे ३ कोटी २५ लाख होईल असा अंदाज आहे.यापैकी प्रत्येक कर्जदाराने घेतलेल्या कर्जातून जे काम उभे राहिले असेल त्यातून, त्या परिसरातील अनेक लोकांसाठी नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत. अनेक उदाहरणांवरून असे दिसून येते की, मुद्रा कर्ज योजनेने रोजगाराचे अनेक नवे पर्याय निर्माण व्हायला मदत झाली आणि प्रत्येक व्यवसायातून निर्माण होणाऱ्या नव्या नोकऱ्यांची संख्या वेगवेगळी असू शकेल. किशोर आणि तरुण श्रेणीतील कर्जांतून उभ्या राहणाऱ्या प्रकल्पात नक्कीच एकापेक्षा जास्त प्रकारचा रोजगार निर्माण होईल. जरी मुद्रा कर्ज योजनेतून कर्ज घेतलेल्या प्रत्येक उद्योगातून प्रत्येकी एकच रोजगार उपलब्ध झाला असे आपण मानले आणि असेही मानले की पुन्हा पुन्हा कर्ज घेणाऱ्या प्रकल्पांतून कोणतेही नवीन रोजगार निर्माण झाले नाहीत तरीही एकट्या मुद्रा योजनेतून ६ कोटी नवीन रोजगार निर्माण झाले हे आपण मान्य करायलाच हवे. ही संख्या, आधीच्या आकडेवारीत एकत्र केली किंवा अनौपचारिक सेवा क्षेत्रात नव्याने निर्माण झालेल्या नोकऱ्यांमध्ये मिळवली तर आपण शेवटी असे नक्कीच म्हणू शकतो की गेल्या चार वर्षांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली. तसेच, नव्या कामगारांच्या कामगार जगताला होणाऱ्या पुरवठ्याच्या तुलनेत नवीन नोकऱ्यांची निर्मिती कमी पडली

**यशोगाथा**

- लुधियानाच्या एक महिला कामगार, निवेदिता, फक्त एका शिवण मशीनच्या सहाय्याने त्यांचा कपडे शिवण्याचा व्यवसाय करीत होत्या. मुद्रा योजनेतून कर्ज घेतल्यानंतर त्यांनी दहा शिवण मशीन खरेदी करून त्यांच्या व्यवसायाचा विस्तार केला आणि त्याबरोबरच त्यांच्या परिसरातील दहा लोकांना रोजगार पुरविला.
- कोलकात्याच्या काकोली घोष यांनी प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या काचा बनविण्याच्या कौटुंबिक उद्योगाच्या विस्तारासाठी मुद्रा योजनेतून कर्ज काढले आणि आता त्यांनी त्याच्या आसपासच्या ५ व्यक्तींनानोकऱ्या दिल्या आहेत.
- लखनौच्या रहिवासी असलेल्या अंजली बन्सल यांनी उपाहारगृह सुरु करण्यासाठीच्या गुंतवणुकीत भर टाकण्यासाठी मुद्रा योजनेतून कर्ज घेतले आणि आता त्यांच्या उपाहारगृहात १२ जण नोकरीला आहेत.
- अन्वरअली आधी काथ्याच्या वस्तू बनविण्याच्या कामात कारागीर म्हणून काम करीत होते. मुद्रा योजनेतून घेतलेल्या कर्जाच्या मदतीने त्यांनी काथ्यापासून विविध कलात्मक वस्तू बनविण्याचा स्वत:चा उद्योग सुरु केला. या उद्योगात त्यांनी स्वत:सह आणखी तीन जणांना रोजगार मिळवून दिला.

नाही. खरे म्हणजे,या गेल्या चार वर्षात, बेरोजगारीचा खिळून राहिलेला प्रश्न सुटायला लागून काही प्रमाणात बेरोजगारी कमी होऊ लागली असे चित्र दिसते आहे. कामगार विश्वातील मागणी आणि पुरवठ्याच्या या समतोलाचा परिणाम असेल म्हणून कदाचित, पण अर्थव्यवस्थेत कामगारांच्या योग्य मोबदल्याबद्दल जागरूकता निर्माण झाली. कामगार किंवा कौशल्यांच्या पुरवठ्याच्या तुलनेत, त्यामानाने त्या कामगारांना किंवा कौशल्यांना कमी मागणी असल्यामुळे गेल्या काही वर्षांत योग्य वेतन दरापेक्षा कमी दरातील मजुरी किंवा वेतन दिले जात होते. दुर्दैवाने, पुन्हा इथेही, शहरी भागातील मजुरीच्या किंवा वेतनाच्या दराबाबत कोणतीही अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसल्याने, योग्य माहितीच्या अभावाची समस्या होतीच.मात्र आता कामगार कार्यालयाने आम्हाला २०१४ ते २०१८ या काळातील, कृषक आणि अकृषक कामांमधील वार्षिक सरासरीने दैनंदिन मजुरीची माहिती दिली आहे. त्यातून हे उघडपणे दिसून येत आहे की ग्रामीण भागातील सुतार,कुंभार,विणकर यांसारख्या अकृषक क्षेत्रातील व्यवसाय करणाऱ्यांच्या बाबतीत, पुरुष कामगारांना दिल्या जाणाऱ्या मजुरीच्या दरात वाढ झाली आहे. फक्त आणि फक्त, नळांची कामे करणाऱ्या कारागिरांची मजुरी किंचित कमी झाली आहे.गवंडी, कुंभार,सुतार, सफाई कामगार आणि हस्तकला कारागीरांच्या मजुरीत ९ ते १० टक्के इतकी मोठीवाढ झाली आहे. स्पष्टपणे सांगायचे तर, ग्रामीण भारतात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी कधी नव्हतीच. मला खात्री आहे की मजुरीच्या वाढीव दराची ही नवी लाट शहरी भागातील व्यवसाय आणि नोकऱ्यांमध्ये देखील दिसून येईल. त्यामुळे,नोकऱ्यांशिवायचा विकास किंवा अपुऱ्या रोजगार निर्मितीच्या निराशाजनक कथा प्रसारित करणाऱ्या सर्वांनीच त्यांच्या स्वत:च्या विचारपद्धतींचे पुनरावलोकन करावे किंवा राष्ट्रीय नमुने सर्वेक्षण कार्यालयातर्फे सुरु असलेल्या रोजगारविषयक कौटुंबिक सर्वेक्षणाचा अहवाल जाहीर होईपर्यंत थोडी वाट पहावी.

■■■

*लेखक निती आयोगाचे उपाध्यक्ष आहेत.*

*ई मेल: vch-niti@gov.in*



मिंमासा

# सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांच्या खऱ्या क्षमतेची ओळख

-अरुण कुमार पांडा



**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग(एमएसएमई) क्षेत्राला अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते, त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.उद्योजकतेच्या विचारांना चालना देऊन आणि स्वयंरोजगार तसेच रोजगाराच्या संधींची मोठ्या प्रमाणात निर्मितीसाठी पूरक वातावरण तयार करून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने या क्षेत्राला भविष्यात अधिकाधिक प्रोत्साहन देण्याकरिता अनेक नवोन्मेषकारक पावले उचलली आहेत. अशाप्रकारे काम करून एमएसएमई मंत्रालयाने देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात यथायोग्य योगदान दिले आहे.**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्र भारताच्या समग्र, सकारात्मक, सामाजिक आणिआर्थिक विकासामध्ये लक्षणीय योगदान देत आले आहे. हे उद्योग फक्त स्वयंरोजगाराची निर्मिती करीत नसून रोजगारनिर्मितीच्या भरीव संधी उपलब्ध करून देत असल्यामुळे प्रत्येक उद्योगाचे या क्षेत्रात स्वत:चे असे महत्त्वपूर्ण स्थानआहे.लहानात लहान उद्योगामागे देखील भारतीयांची मान उंचावणारी एखादी मोठी कहाणी आहे. त्यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग(एमएसएमई) क्षेत्राला अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते, त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. उद्योजकतेच्या विचारांना चालना देऊन आणि स्वयंरोजगार तसेच रोजगाराच्या संधींची मोठ्या प्रमाणात निर्मितीसाठी पूरक वातावरण तयार करून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने या क्षेत्राला भविष्यात अधिकाधिक प्रोत्साहन देण्याकरिता अनेक नवोन्मेषकारक पावले उचलली आहेत. अशाप्रकारे काम करून एमएसएमई मंत्रालयाने देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात यथायोग्य योगदान दिले आहे.

### सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र: रोजगार निर्मिती

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आपल्या देशातील औद्योगिक क्षेत्रातल्या एकूण व्यवहारांमध्ये लक्षणीय योगदान देतात आणि अधिकाधिक रोजगारनिर्मिती करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात.सध्या देशभरात सातकोटीहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आहेत, ज्यांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये सुमारे बारा कोटी रोजगार निर्माणहोत आहेत. हे असे क्षेत्र आहे की जे कृषीक्षेत्राखालोखाल मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार आणि नोकऱ्यांच्या विस्तृत संधी निर्माण करते. त्याबरोबरच, या क्षेत्रात कामगार आणि भांडवल यांचे गुणोत्तरदेखील बरेच जास्त असलेले

दिसून येते. ऐतिहासिकदृष्ट्या, गेल्याकाही काळात घडून आलेल्या विकास प्रक्रियेमुळे लोकांची रुची कृषी आधारित उद्योगांकडून, उत्पादन आणि सेवा क्षेत्रासारख्या बिगर कृषी व्यवसाया कडेवळली आहे. त्यामुळे आता देशाच्या वाढीसाठी, विकाससाठीआणि रोजगार निर्मितीच्या ध्येयपूर्तीसाठीउत्पादन आणि सेवा क्षेत्र निर्णायकरित्या महत्त्वपूर्ण ठरत आहे.येत्या काही वर्षात, लोकसंख्येत लक्षणीय वाढ होईल आणि त्यातही काम करण्यायोग्य वर्गात अभूतपूर्व वाढ होण्याची अपेक्षा असताना,या मोठ्या प्रमाणातल्या कामगार वर्गाला सामावून घेण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल. या क्षेत्रात रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी, मनुष्यबळरुपी भांडवलाच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे आहे. खासकरून वाहतूकीशी संबंधित उपकरणे आणि विद्युत यंत्रे, लाकूड, चामडे आणि चामड्यापासून तयार होत असलेली इतर उत्पादने, कागद, कापड आणि हस्तकलेच्या वस्तू इत्यादी सारखेकाही विशिष्ट उद्योग, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कामगार वर्गाची आवश्यकता असते अशा उद्योगांसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हे महत्त्वाची गोष्ट आहे.



**सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय व्यवसाय आणि उद्योजकता वाढीसाठी अनेक कार्यक्रम राबविते, स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी आवश्यक बाबींची माहिती अशा कार्यक्रमाद्वारे नियमितपणे तरुणांना दिली जाते.**

### कृती कार्यक्रम

अर्थव्यवस्थेच्या विकाससाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र अत्यंत महत्वपूर्ण आहे. कारण या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील अन्य क्षेत्रांवर अनेक पटींनी प्रभाव पडत असतो. उत्पादन क्षेत्र अर्थव्यवस्थेमधील इतर क्षेत्रांतून उपलब्ध होणारा कच्चा माल आणि सेवा यांचा उपयोग करून घेते आणि त्या बदल्यात त्या क्षेत्रांना तयार उत्पादने पुरवते. अशा प्रकारे हे क्षेत्र कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंतच्या, उत्पादन साखळीमधील सर्व गोष्टींच्या मागणीला चालना देते. राष्ट्रीय उत्पादन धोरणात कल्पिल्याप्रमाणे, उत्पादन क्षेत्रामध्ये सन२०२२पर्यंत १०कोटी लोकांना रोजगार देण्याची क्षमता आहे. तथापि, तसे करण्यासाठी, काही तातडीचे बदल घडवून आणणे अत्यावश्यक आहे.

### रोजगार वाढीला चालना देण्यासाठी काही उपयुक्त सूचना:

(१) कामगार केंद्रित उद्योगांच्या वाढीला प्रोत्साहनदेणे.

(२) विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा उभारून प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे

(३) उत्कृष्ट गुणवत्तेच्या पद्धतींचा अवलंब करून कामगारांचीउत्पादकता वाढवणे.

(४) योग्यवेळी कर्ज पुरवठा होत राहील हे सुनिश्चित करणे आणि

(५) तयार झालेल्या उत्पादनांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

### सरकारचे काही नवीन उपक्रम

या क्षेत्रामध्ये मुळातच वाढीची अमर्याद क्षमता असूनही, काही विशिष्ट घटक या क्षेत्राच्या उत्पादकतेवर आणि वाढीवर परिणाम करणारेआहेत. आणि त्यांच्यामुळे नंतर स्वयंरोजगार आणि रोजगार यांच्यावरही परिणाम होऊ शकतो.नोकरी किंवा स्वयंरोजगारी क्षेत्रावरही त्याचा वाईट परिणाम होऊ शकेल.उदाहरणार्थ, उत्पादन खर्चातील वाढता भांडवली वाटा, तंत्रज्ञानातील परिवर्तन,कुशल कामगारांची मागणी हे सगळे घटक संपूर्ण औद्यागिक पर्यावरणावर परिणाम करणारे घटक आहेत.

### केंद्रीभूत दृष्टिकोन

भारत देशाने नोकऱ्या करणाऱ्या नागरिकांच्या देशापेक्षा नोकऱ्या निर्माण करणारा देश म्हणून भविष्यात स्वत:ची ओळख निर्माण करावी या



**महत्वाची बाब अशी की, रोजगार निर्मिती करताना सामाजिक समावेशकतेची विशेष काळजी घेतली जाते. प्रधानमंत्री रोजगार कृषी कार्यक्रमांतर्गत सुमारे ३०% म्हणजेच ४.४३ लाख लाभार्थी या महिला आहेत.**

हेतूने उद्योजकांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगमंत्रालयाने एक केंद्रिभूत दृष्टीकोन ठेवला आहे.यासाठी येणाऱ्या अडचणींची सरकारला पूर्ण कल्पना आहे आणि या क्षेत्राला तात्काळ नवसंजीवनी देण्यासाठी आर्थिक व्यवहारांचा वेग वाढवायला हवा, ज्यायोगे देशात रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण होतील, हे स्वीकारून सरकारने त्याप्रमाणे पुढील वाटचाल निश्चित केली आहे. म्हणूनच सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राचे आधुनिकीकरण आणि विकास यासाठी सरकार देशभरात अनेक योजना यशस्वीपणे राबवीत आहे.यामध्ये प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (पी.एम.ई.जी.पी.) आणि प्रधानमंत्री मुद्रा योजना आणि पारंपारिक उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी अर्थ पुरवठा योजना (एसएफयूआरटीआय), समूह विकास कार्यक्रम यासारख्या अनेक सरकारी योजनांचा समावेश आहे.या व्यतिरिक्त, खादी व ग्रामोद्योग (केवीआयएस) आणि काथ्याशी संबंधित उद्योग, जे खादी आणि ग्रामोद्योग आयोग (केवीआयसी) आणि काथ्या मंडळाद्वारे चालविले जातात, या दोघांचेही रोजगार निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान आहे.

### बाजारपेठांमध्ये वाढता विस्तार

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमधून तयार होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवून देऊन त्यांना योग्य तऱ्हेने प्रस्थापित करण्यासाठी आणि त्यासोबतच समाजातील दुर्लक्षित घटकांचा उद्धार करण्यासाठी, सरकारने सार्वजनिक खरेदीधोरणाद्वारे, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना बाजारपेठेत स्थिरावण्याकरिता प्राधान्य देऊन याव्यवसायांना प्रोत्साहन देण्याची मोहीम उघडली आहे. केंद्रीय सार्वजनिक उद्योग,केंद्रीय मंत्रालयतसेच इतर सरकारीकार्यालये यांच्यासाठी केल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या खरेदीपैकी २०%खरेदी, सूक्ष्म आणि लघु उद्योगांकडून केली जावी असे सरकारी आदेशात म्हटले आहे. तसेच यापैकी ४% खरेदी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या व्यक्तींच्या मालकीच्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांकडून केली जावी असेही त्यात म्हटले आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम मंत्रालयाचे पोर्टल अनुसूचित जाती आणि जमातींसह सर्व सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना, वस्तू आणि सेवांच्या सार्वजनिक खरेदी व्यवहारांमध्ये सहभागी व्हायला मदत करत आहे आणि त्यायोगे रोजगार निर्मितीला चालना मिळत आहे.

अनुसूचित जाती-जमातीच्या उद्योजकांसाठी सार्वजनिक खरेदी धोरणातील आदेशांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी ऑक्टोबर २०१६ मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी केंद्र (हब) सुरू केली. सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय मोठ्या प्रमाणात व्यावसायिक आणि औद्योगिक विकास कार्यक्रम राबवीत आहे.सूक्ष्म आणि लघु उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या औद्योगिक कौशल्यासंबंधीच्या विविध पैलुंवर प्रकाश टाकून तरुण उद्योजकांच्या प्रतिभेला खतपाणी घालण्यासाठी हे कार्यक्रम नियमितपणे आयोजित केले जातात. भावी उद्योजकांचे कौशल्यसुधारण्यासाठी सरकारने उद्योजकताविषयक कौशल्य विकास कार्यक्रम आखला आहे;संभाव्य उद्योजकांची निर्णय क्षमता सुधारण्यासाठी, त्यांना व्यवस्थापनाच्या विविध पद्धतींचे प्रशिक्षण देणे हा व्यवस्थापनविकास कार्यक्रमाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्देश आहे. सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत येणारे राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ (एक सार्वजनिक उपक्रम), उद्योजकांना सुलभ कर्ज पुरवठ्याचीव्यवस्था करणे,अतिशय स्पर्धात्मक दरात कच्चा माल पुरवणे,त्यांच्या उद्योगांच्या

**यशोगाथा:**

## व्हिडीओग्राफीमधील धाडसी प्रवास : कल्पनाबेन त्रिवेदी



कल्पनाबेन त्रिवेदी आणि तिचे पती अभिषेक त्रिवेदी या दोघांकडेही उत्तम व्यावसायिक कौशल्य आहे.संगणकावर फोटो संकलन करणे, त्यांचे आवश्यकतेनुसार एकत्रीकरण करणे याचे कल्पनाबेन यांना चांगले ज्ञान अवगत आहे आणि त्यात त्यांनी आता प्राविण्य मिळविले आहे.तर अभिषेक यांना फोटो काढण्याचा आणि व्हिडीओ तयार करण्याचा छंद आहे.त्या दोघांनी त्यांचे कौशल्य त्यांच्या फायद्यासाठी वापरले आणि कच्ची माहिती इतर फोटो प्रयोगशाळा चालविणाऱ्यालोकांकडे पाठवून त्यावर प्रक्रिया करून घेऊन, छपाई काम आणि फोटो संकलनासाठीचा छोटा उद्योग सुरु केला. पण त्यांच्याकडे फारशी यंत्रसामुग्री नसल्यामुळे, या छोट्या उद्योगातून त्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते.त्यांना त्यांचा स्वत:च्या मालकीचा असा स्टुडीओ हवा होता ज्यात फोटो संकलनासाठीची सगळी यंत्रसामुग्री, आवश्यक आज्ञाप्रणाली इत्यादी सर्व सोयी असतील.मात्र यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता होती. प्रधान मंत्री मुद्रा योजना जाहीर झाल्यानंतर कल्पनाबेन बँकेत गेल्या. बँक व्यवस्थापकांनी त्यांना मुद्रा योजनेतून मिळणाऱ्या कर्जाबाबतचे तपशील दिले आणि त्यांचा स्वत:चा, सर्व मुलभूत सोयीसुविधांनी सुसज्ज स्टुडीओ तसेच व्हिडिओ प्रयोगशाळा उभारण्यासाठी ९ लाखांचे मुदत कर्ज मिळवून द्यायला मदत केली. आज, त्यांचा हा उद्योग यशस्वीपणे सुरु आहे. आजूबाजूच्या परिसरातून त्यांना लग्न आणि इतर शुभकार्याच्या प्रसंगी,फोटो काढण्याच्या तसेच व्हिडीओ तयार करण्याच्या कामांची आमंत्रणे येतात. यातून त्यांना आता चांगले उत्पन्न मिळू लागले आहे.

**स्रोत: मुद्रा पोर्टल.** (www.mudra.org.in)

वाढीकरिता प्रशिक्षणाच्या सोयी पुरविणे आणि उद्योगवाढीसाठीच्या इतर आवश्यकसुविधा उपलब्ध करुन देणे आणि या सर्वांतून उत्पादन क्षेत्रातील रोजगार संधींच्या वाढीला पोषक वातावरण निर्माण करणे यात सगळ्यात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावित आहे.

### योग्य वेळी होणारा कर्ज पुरवठा

उद्योजकांसाठी वेळेवर कर्ज पुरवठा होणे हे नेहमीच एक आव्हान आहे.ही तातडीची गरज ओळखत, सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रालामदत करण्यासाठी सरकारने प्रवर्तक पावले उचलली आहेत.सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचा विचार केला तर प्रधानमंत्री रोजगार निर्माण कार्यक्रमासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीतआता जवळपास ८० टक्क्यांनी वाढ झाली आहे. वर्ष २०१७-१८मध्ये ४८ हजार ३९८सूक्ष्म उद्योगांना सहाय्य करण्यात आले असून त्यातून सुमारे तीन लाख लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.सन २०१८-१९ या काळात जवळजवळ ७०हजार लघु उद्योग उभे राहतील आणि त्यातून सुमारे ५लाख लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असा अंदाज व्यक्त होत आहे. गुरगावच्या व्यवस्थापन विकास संस्थेने प्रधानमंत्री रोजगार निर्माण कार्यक्रमाचे नुकतेच एक स्वतंत्र मूल्यांकन केले, त्यात असे दिसून आले कि या सरकारी कार्यक्रमांतर्गत प्रत्येक उद्योगात दरडोई ९६००० रुपयांची गुंतवणूककरावी लागते आणि त्यातून ७.६२ व्यक्तींना रोजगार प्राप्त होतो.

मुद्रा या सध्याच्या सरकारने सुरु केलेल्या योजनेतून सूक्ष्म उद्योग जगताला सुलभरीत्या आणि अखंडित कर्जपुरवठ्याची सोय झाली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे, या योजनेतून सुमारे ५ कोटी उद्योगांना ३लाख कोटी रुपयांच्या अर्थ पुरवठ्याचे लक्ष्य साध्य होईल असा अंदाज आहे. सरकारच्या या योजनेमुळे, सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला मिळणाऱ्या सुविधांमध्ये भरीव वाढ झाली असून, रोजगार निर्मिती आणि औद्यागिक विकासामध्ये या योजनेने भरीव योगदान दिले आहे. सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रासाठी सरकारने

उचललेले आणखी एक नवीन पाउल म्हणजे वित्त पुरवठा हमी निधीत वाढ करून, तो २५०० कोटींवरून ८००० कोटी रुपये करण्यात आला आहे. या योजनेद्वारे २०१८-१९ या वर्षात सूक्ष्म आणि लघु उद्योग क्षेत्राला अखंडित वित्तपुरवठा करता येईल असे वाटते. गेल्या काही वर्षांत दिल्या गेलेल्या १९००० कोटी, २०००० कोटी रुपयांच्या वित्त हमीच्या तुलनेत सरकारच्या नव्या हमी योजनेतून दिला जाणारी हमी ४०००० कोटींचा आकडा पार करेल. सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने आणखी एक नवी योजना सुरु केली आहे – सौर चरखा मोहीम. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ५० समूहांची उभारणी करता येईल आणि त्यातून ग्रामीण भागातील १ लाख लोकांना, विशेषत: स्त्रियांना, रोजगार संधी उपलब्ध होईल असे अनुमान आहे. वर दिलेले नवे उपक्रम आणि योजना महत्त्वाकांक्षी उद्योजकांना पर्यावरणपूरक उद्योग उभारायला प्रोत्साहित करत आहेत.या सर्व योजना आणि उपक्रम, स्त्रियांसाठी तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसारख्या, समाजातील दुर्लक्षित घटकांना केंद्रस्थानी ठेवून तयार केलेल्या असल्याने,त्यातून मोठी समाजहिताची कामे होत आहेत.

**जोरकस प्रयत्न**

भारत सरकारचे विविध विभाग, मंत्रालये, विशेषत:सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय यांनी एकत्रितपणे केलेल्या जोरकस प्रयत्नांमुळे या क्षेत्राने गेल्या ४ वर्षात मोठा पल्ला गाठला आहे.आर्थिक दृष्टीकोनातून विचार केला तर २०१०-१४ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा २०१४-१८ च्या अर्थसंकल्पातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रासाठीच्या तरतुदीमध्ये झालेली ४१टक्के वाढ हे सरकारच्या या क्षेत्रातील प्रोत्साहनकारक उपक्रमांचेच द्योतक आहे. या काळात खादी आणि ग्रामोद्योगाने १४१ लाख लोकांसाठी रोजगार उपलब्ध करून देत आघाडी घेतली होती. सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी वित्त हमी विश्वस्त निधी योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्माण कार्यक्रम आणि पारंपरिक उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी निधी पुरविणारी स्फूर्ती योजना, या तीन योजनांमधून अनुक्रमे५१लाख ११ हजार व्यक्तींना, १४ लाख ७८ हजार व्यक्तींना आणि ६० हजार व्यक्तींना रोजगार मिळाला. विविध योजना राबवून, नोकऱ्या किंवा रोजगार निर्माण करताना सामाजिक भान राखण्यावर भर दिला जातोय हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. प्रधानमंत्री रोजगार निर्माण योजनेच्या लाभार्थ्यांमधील ३० टक्के म्हणजे ४ लाख ४३ हजार लाभार्थी, स्त्रिया आहेत हे उल्लेखनीय आहे. त्याबरोबरच,या कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जातीमधील १लाख ७४ हजार व्यक्तींना आणि अनुसूचित जमातींमधील १ लाख ३१ हजार व्यक्तींना गेल्या चार वर्षांच्या कालावधीत रोजगार मिळाला.





प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

एका पुस्तकाची किरकोळ
विक्री
किंमत ३० रुपये प्रत्येकी

चार पुस्तकांचा संच
१०० रु.

सूक्ष्म,लघु आणि मध्यम मंत्रालयाने देशभरात १८साधनांनी सुसज्ज वर्ग तयार केले आहेत आणि आणखीन१५ सुसज्ज तंत्रज्ञान केंद्रांची उभारणी सुरु आहे.जास्तीत जास्त उद्योजकांना आणि नोकऱ्या शोधणाऱ्या व्यक्तींना त्यांची मोठी मदत होईल.सध्या, नोकरीच्या शोधात असलेल्या दीड लाख लोकांना या १८ साधनांनी सुसज्ज वर्गांमध्ये प्रशिक्षण दिले जात आहे.त्यांच्यापैकी काही लोकांनी त्यांचे स्वत:चे उद्योग सुरु केले आहेत.पण त्यांच्यापैकी खूप मोठ्या प्रमाणातल्या लोकांकडे नोकऱ्या आहेत.आदरणीय राष्ट्रपतींनी नुकतेच ‘एमएसएमई संपर्क’ पोर्टलची सुरुवात केली. या डिजिटल मंचामुळे, नोकऱ्या देणारे, त्यांच्या आवश्यकतेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळाच्या वाढत्या प्रतिभांपर्यंत सुलभतेने पोहोचू शकतील आणि त्यायोगे या प्रशिक्षित लोकांना नोकऱ्या देणे सोपे होईल.

**निष्कर्ष**

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने केलेल्या शेवटच्या सर्वेक्षणानुसार, देशात सध्या सुमारे ६ कोटी,३४ लाख सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग आहेत. ते उद्योग आता एका निश्चित वेगाने,औपचारिक आर्थिक प्रवाहात सामील होत आहेत – वस्तू आणि सेवा कर प्रणालीत त्यांच्या उद्योगांची नोंदणी करून घेत आहेत.वस्तू आणि सेवा कर प्रणालीत नोंदणी झालेल्या उद्योगांमध्ये सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांचे प्रमाण आश्चर्यकारकरीत्या जास्त आहे. या उद्योगांच्या वाढीसाठी आवश्यक ती सर्व मदत त्यांना मिळायलाच हवी. या सर्व उपक्रमांमुळे, देशाचा विकास आणि रोजगार निर्मिती यासाठीचा नवा स्त्रोत अशी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राची ओळख निर्माण झाल्यामुळे, भारतात नव्या आर्थिक संस्कृतीचा उदय होताना दिसत आहे. या क्षेत्राला नवनवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि बिगर कृषी क्षेत्रात चांगल्या रोजगार संधी निर्माण करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय करीत आहे. यामुळे भावी उद्योजकांसाठी नवीन, आशादायक वातावरण निर्मिती होते आहेच, पण त्याबरोबरच भारताची वेगवान अर्थव्यवस्था आणि तिची यथायोग्य वाढ यामध्ये देखील त्यांचा महत्त्वाचा सहभाग दिसून येत आहे.

■■■

*लेखक केंद्रीय सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: secretary-msme@nic.in*



पथदर्शी

# रस्ते विकास: अप्रत्यक्ष रोजगार संधी

-युधवीर सिंह मलिक



**भारतमाला परियोजनेच्या पहिल्या टप्प्यांत नमूद केलेल्या एकूण महामार्गांपैकी २४८०० किमी मार्ग २०२१-२२ पर्यंत पूर्ण होतील. त्याच जोडीला, १०००० किमीचे रस्ते बांधण्याचे समांतर काम NHDP अंतर्गत होत आहे, त्याचे नियोजन होत आहे. म्हणजेच एकूण ३४८०० किमी इतक्या लांबीच्या महामार्गांची या घडीला अस्तित्वात असलेल्या रस्त्यांमध्ये भर पडणार आहे.**

राष्ट्रीय महामार्ग भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये १२६००० किमी वा जास्त लांबीचे आहेत जे खरेच जीवनवाहिनीचे काम करतात. देशातील रस्त्यांच्या जाळयांचा आढावा घेतला तर त्यांचे प्रमाण २ टक्के जरी भरते तरी देशातील जवळपास ७० टक्के प्रवासी वाहतूक वाहण्याचे श्रेय त्यांचेच आहे किंवा तब्बल ६० टक्क्यांहून अधिक प्रवासी भाडे याच वाहतुकीतून प्राप्त होते.

राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम अर्थात NHDP, ज्याचा आरंभ १९९८ साली सुवर्ण चतुष्कोनाद्वारे झाला, त्यानंतर २००० मध्ये उत्तर दक्षिण आणि पूर्व - पश्चिम प्रवेशद्वारे उघडली गेली, गेल्या १५ वर्षांतल्या भारतीय महामार्गांच्या यशोगाथेतील हे मैलाचे दगड. १९९८ ते २०१७ या कालावधीत NHDP ८ टप्प्यांतून पार झाला. शासनाने एक नव्या महत्त्वाकांक्षी राजमार्ग विकास कार्यक्रमासह पुढे येण्याचा निर्णय घेतला. ज्यातून भारतमाला परियोजनेचा जन्म झाला. २४ ऑक्टोबर २०१७ रोजी आर्थिक घडामोडी संदर्भात घेण्यात आलेल्या बैठकीत कॅबिनेट मंत्रालयाने (CCEA) भारतमाला परियोजनेच्या पहिल्या टप्प्याला मंजुरी दिली. या बैठकीचे लक्ष्य प्रवासी आणि प्रवासी भाडे यांच्यात, संबंध देशाच्या दृष्टीने महत्वपूर्ण अशा पायाभूत सोयी सुविधांमधील

त्रुटी भरुन कार्यक्षम सुधारणा करणे हे होते. भारतमाला परियोजनेच्या पहिल्या टप्प्यांत नमूद केलेल्या एकूण महामार्गांपैकी २४८०० किमी मार्ग २०२१-२२ पर्यंत पूर्ण होतील. त्याच जोडीला, १०००० किमीचे रस्ते बांधण्याचे समांतर काम NHDP अंतर्गत होत आहे, त्याचे नियोजन होत आहे. म्हणजेच एकूण ३४८०० किमी इतक्या लांबीच्या महामार्गांची या घडीला अस्तित्वात असलेल्या रस्त्यांमध्ये भर पडणार आहे. ही ३४,८०० किमी रस्त्यांची एकूण गुंतवणूक रु. ५३५०० कोटींची आहे. याच जोडीला इतर योजनांतर्गत जसे की, NH(O), SARDP-NE, LWE



मध्ये ४८,८७७ किमीचे रस्ते बनत आहेत. ही रस्ता बांधणी पूर्ण होईस्तोवर लागणारा अंदाजित खर्च हा रु. १,५७,३२४ इतका असेल. यामुळेच भारतमाला परियोजना आणि इतर योजना यांचा परिपूर्ण आढावा घेता, या ५ वर्षांमध्ये रु. ६,९२,३२४ इतक्या अंदाजे खर्चाला मंजूरी मिळत आहे.

MoRTH चा रस्ते विकास कार्यक्रम, वर म्हटल्याप्रमाणे हा या क्षेत्रांतली गुंतवणूक व्यापक प्रमाणात वाढवेल तथा महामार्ग बांधणीच्या शृंखलेमध्ये संधींना मोठा वाव निर्माण करुन देईल, अशी अपेक्षा आहे. या क्षेत्रातल्या गुंतवणूकीला मिळालेली तेजी ही रोजगार संधींनाही प्रेरक ठरेल अशी अपेक्षा आहे. रचना आणि निरीक्षण, या क्षेत्रात कुशल कारागिरांना थेट रोजगार मिळूच शकतो. ज्यामध्ये स्थापत्य अभियंता, संरचना अभियांत्रिकी ते रचना सल्लागार, गुणवत्ता नियंत्रण, प्रयोगशाळा मदतनीस याशिवाय बांधकाम मनुष्यबळाचीही मोठी गरज असेल, ज्यामध्ये यंत्रज्ञ, यंत्रचालक, बांधकाम कारागिर,प्रयोगशाला तंत्रज्ञ, सर्वेक्षक आणि अर्धकुशल कामगारांचा अंतर्भाव असेल. तंत्रज्ञानाचा वापर वाढता आहे. जसे की LiDAR (Light Detection and Range) प्रकाश DPR च्या तयारीमध्ये LiDAR चा बराच वापर होतो. ज्यामुळे प्रकल्प संरचना अचूक होण्यास मदत होते. यांच्या वापरामुळे दूरस्थ संवेदना उपयोजनांमध्ये (Remote Sensing Applications) तंत्रकुशल असणाऱ्या व्यक्तींना मागणी निर्माण झाली आहे. ज्याचा परिणाम असा की, अंदाजे १४.२ कोटी दिवसांसाठी रोजगार उपलब्धी महामार्ग बांधकामामुळे तयार झाल्या आहेत.

रस्ते बांधकामामुळे मालवितरक आणि उपकरण वितरक उद्योगांमध्ये अप्रत्यक्ष रोजगार उपलब्धी वाढली आहे आणि रोजंदारांची फळी प्रभावित झाली आहे. असा रस्ते बांधकाम व्यवसायातील तेजीचे गुणक प्रभाव सर्वत्र दिसतात. त्याचबरोबरीने शहरी बाजापेठांशी जवळचा संबंध आल्याने, आणि वर्धित संयोजकतेचा (connectivityचा) थेट परिणाम म्हणून रोजगार संधी निर्माण झाल्याने, राष्ट्रीय महामार्ग स्थानिक अर्थव्यवस्थेला चांगले दिवस निर्माण करुन देतील अशी आशा आहे.

सध्या मंत्रालय रस्ते बांधकाम आणि वाहतूक क्षेत्रात गरजेच्या असलेल्या कौशल्यांचे उन्नतीकरण आणि प्रशिक्षण याकरिता योजनांची अंमलबजावणी करणार आहे. कौशल्य आणि व्यवसाय मंत्रालयाच्या राष्ट्रीय कौशल्य योग्यता आराखडयानुसार यातील एक पाऊल म्हणजे RPL (Recognition of Prior Learning).

RPL हा PMKVY चा एक भाग आहे. २०२० च्या अगोदर १०० लाख मुलांना प्रशिक्षित करण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने पुढारलेली ही एक प्रमुख योजना आहे. मंत्रालय कामगारांसाठी बांधकाम स्थळी Director General Training (DGT) च्या नोंदणी केलेल्या प्रशिक्षकांकडून परातकाम, पडदे बांधणी, गवंडीकाम, लोखंडीकाम, रंगकाम आणि नळकाम या सहा कामांसाठी प्रशिक्षण घेते. या योजनेमध्ये प्रशिक्षणासाठीचा खर्च, साधने, मुल्यांकन शुल्क आणि येण्याजाण्याचा वाहतूक खर्च अंतर्भूत



असतो. National Council of Vocational Training या मान्यताप्राप्त प्रमाणन मंडळाद्वारा यशस्वी उमेदवारांना प्रमाणपत्र दिले जाते. या योजनेदवारे मंत्रालय १ लाख कामगारांना सकुशल बनवण्याचा प्रयत्न करत आहे. सद्य स्थितीत ६३००० कामगारांनी याकरिता नावनोंदणी केली असून ३३०२३ कामगारांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले असून ११०११ अजून प्रशिक्षणांच्या प्रक्रियेत व्यस्त आहेत.

मंत्रालयाने, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये रस्ते सुरक्षा देशांतील स्थिती सुधारण्यासाठी संशोधन आणि प्रशिक्षणासाठी Institutes of Driving Training and Research (IDTR) अंतर्गत मॉडेल संस्थांची निर्मिती केली असून शास्त्रीय तंत्रांचा अवलंब करुन चालक वर्तनामध्ये सकारात्मकता, आणण्याचा प्रयत्न करत आहे. त्याच्या जोडीला, मंत्रालय, राज्य सरकारांना बेरोजगार युवकांना अवजड वाहने देऊन चालक प्रशिक्षण देण्याकरता कौशल्य केंद्रांच्या निर्मितीस मदत म्हणून रु. १५० कोटी मंजूरी केले आहेत. ट्रक ड्राईव्हरची देशात चणचण असताना, या प्रयत्नांमुळे रोजगार संधींना आशेचे किरण लाभले आहेत.

हे क्षेत्र किती रोजगार पुरवठा करते आणि या क्षेत्रात व्यग्र असलेल्या लोकांचा अंदाजित आकडा कळण्यासाठी याआधी कधीही प्रयत्न झालेले नाहीत. म्हणूनच, राष्ट्रीय महामार्ग निर्मिती क्षेत्रातून मिळणारे रोजगार समजून येण्यासाठी त्याच प्रमाणे रस्ते बांधणी क्षेत्रात आवश्यक असलेल्या कौशल्य विकासाची गरज समजून घेण्यासाठी मंत्रालयाने अभ्यास आरंभ केला आहे. अभ्यासातून निष्पन्न होणारे परिणाम आणि शिफारसींची मंत्रालयाला मदत होईल. भविष्यातील धोरणात्मक आराखडयाची रचना आणि कौशल्यविकासाच्या धोरणांची अंमलबजावणीसाठी कृतीआराखडा आणि रस्ते बांधणी तथा वाहतूक क्षेत्रातील मनुष्य बळाची उन्नती करिता सहायभूत ठरतील.

■■■

*लेखक भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: secy-road@nic.in*

विशेष

# बहु आयामी उपाययोजना धोरणाचा आराखडा

-प्रवीण श्रीवास्तव



**आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टीकोन (२०१५) मध्ये येत्या पाच वर्षांत जागतिक रोजगार स्थिती ढासळत जाणार असून रोजगार वाढ आर्थिक वाढीशी मिळतीजुळती नसेल, असा अंदाज करण्यात आला होता. जागतिक बेरोजगारीचा स्तर २०१ दशलक्ष असेल, असे अनुमानित करण्यात आले होते जो स्तर पेचप्रसंगाच्या अगोदरच्या स्तरापेक्षा ३१ दशलक्षाने अधिक आहे.**

रोजगार समृद्ध विकासात गुंतवणुकीला प्रोत्साहन, सामाजिक सुरक्षा उपायांची व्याप्ती वाढवणे, कामगार सुधारणा यासारख्या विविध बहु आयामी उपाययोजनेद्वारे भारत सरकार कामगार बाजारपेठीय परिस्थिती सुधारण्यावर व्यापक भर देत आहे.

### भारतीय कामगार बाजारपेठेचे परिमाण

२००८-०९च्या मंदीतून विशेषत: कामगार क्षेत्रावर या पेचप्रसंगाचा झालेला परिणाम आणि तो निस्तरून आर्थिक सुधारणेच्या मार्गावर जाण्यासाठी जी काही सामाजिक-राजकीय-आर्थिक धोरणे स्वीकारण्यात आली, ते सांगण्यासाठी प्रत्येक देशाकडे स्वतंत्र कथा आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टीकोन (२०१५) मध्ये येत्या पाच वर्षांत जागतिक रोजगार स्थिती ढासळत जाणार असून रोजगार वाढ आर्थिक वाढीशी मिळतीजुळती नसेल, असा अंदाज करण्यात आला होता. जागतिक बेरोजगारीचा स्तर २०१ दशलक्ष असेल, असे अनुमानित करण्यात आले होते जो स्तर पेचप्रसंगाच्या अगोदरच्या स्तरापेक्षा ३१ दशलक्षाने अधिक आहे. जागतिक बेरोजगारी २०१५ मध्ये ३० लाखाने वाढणार असून त्यापुढील चार वर्षांत ८० लाखाने वाढणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. २०१९ मध्ये जागतिक रोजगारातील तफावत भरून काढण्यासाठी २ कोटी ८० लाख

अतिरिक्त रोजगार निर्मिती करण्याची गरज असल्याचे अंदाजित करण्यात आले आहे.

जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठा खुल्या झाल्याने प्रतिरक्षा ढाली नष्ट झाल्या आहेत. देशांतर्गत कामगार बाजारपेठेवर झालेले परिणाम निस्तरण्यासाठीच्या प्रयत्नांमध्ये समन्वय करताना आंतरराष्ट्रीय सहकार्य ही अपरिहार्य अट आहे. जी २०, ब्रिक्स यासारख्या संघटनांच्या माध्यमातून मिळणाऱ्या आर्थिक सहकार्याचा फायदा कामगार आणि रोजगार प्रश्न सोडवण्यासाठी नियोजित प्रयत्नांना मिळण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, ब्रिक्स देश जागतिक लोकसंख्येपैकी जवळपास ४२ टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात आणि जागतिक जीडीपीमध्ये २० टक्के योगदान देतात. ज्यामुळे विशेषत: तांत्रिक साधनसंपत्तीबाबत जागतिक आवश्यकता भागवण्यासाठी आपल्या विविध क्षमतांचा लाभ मिळवून देणाऱ्या ब्रिक्स देशांना एक आगळे स्थान प्राप्त होते. भारतानेही आर्थिक विकासाचा पुस्तकी मार्ग अनुसरताना देशाच्या जीडीपीमध्ये प्राथमिक क्षेत्राचे (कृषी आणि तत्सम)योगदान झपाट्याने घसरताना पाहिले असून १९५०-५१ मध्ये ५२ टक्क्यावरून २०१७-१८ मध्ये १७ टक्क्यावर आले आहे. याचवेळी सेवा क्षेत्राचे जीडीपीतील योगदान हळूहळू वाढत जाऊन ३५ टक्क्यावरून (१९५०-५१) ५४ टक्क्यावर (२०१७-१८) गेले आहे.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणच्या (National Sample Survey) रोजगार आणि बेरोजगार पाहणीत (२०११-१२) केलेल्या अंदाजानुसार ४८४.७ दशलक्ष कामगारांचा समावेश असलेल्या कामगार शक्तीने वेगळा मार्ग अनुसरल्याचे दिसते, जिथे ४९ टक्के कामगार अजूनही प्राथमिक म्हणजे कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत तर त्याखालोखाल सेवा क्षेत्रात २७ टक्के आणि उद्योग क्षेत्रात २४ टक्के कामगार आहेत(एनएसएसओ इयुएस सर्व्हे २०११-१२). कामगार वर्ग प्राथमिकत: ग्रामीण (७४ टक्के) असून अनौपचारिक क्षेत्रात (९३ टक्के), स्वयं रोजगार (५२ टक्के) आणि महिला कामगार वर्गाचा सहभाग २२ टक्के आहे. कृषी क्षेत्रातील कामगार वर्गाची संख्या उतरत असताना त्याची भरपाई बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या वाढीने भरून काढली आहे. जीडीपीतील वाटा, कारखान्यांची संख्या आणि कामगार वर्ग या संदर्भात औद्योगिक क्षेत्रातील वाढ या काळात प्रभावी असून जवळपास दुप्पट झाली आहे. परंतु ९८ टक्के आस्थापना १० कामगारांपेक्षा कमी कामगारांना नोकरी देतात. मोजमाप करताना लहान आस्थापनांची अस्थिरता आणि कामगार विस्थापन रोजगार बाजारपेठेला अधिक गुंतागुंतीचे बनवते. हे मापदंड भारतीय कामगार बाजारपेठेची व्यापक रूपरेखा निश्चित करतात.

**२००४-०५ ते २०११-१२ या काळात, प्रत्येक वर्षी १० लाख ८० हजार लोकांनी कामगार वर्गात प्रवेश केला आणि तितक्याच लोकांना रोजगार मिळाला जेव्हा की बेरोजगारीचा दर सुमारे २.२ टक्के इतका स्थिर राहिला. रोजगार बाजारपेठेच्या संदर्भात जागतिक आर्थिक मंदीमुळे भारताने कसलाही विपरीत परिणाम दाखवला नाही (स्थिती स्थापकत्व). तरीसुद्धा, भारताला लोकसांख्यिकीय लाभांश असल्याने त्याचा लाभ तरुण वर्गाला उत्पादक क्षेत्रात संघटीत करण्यासाठी करून घेण्याची गरज आहे.**

२००४-०५ ते २०११-१२ या काळात, प्रत्येक वर्षी १० लाख ८० हजार लोकांनी कामगार वर्गात प्रवेश केला आणि तितक्याच लोकांना रोजगार मिळाला जेव्हा की बेरोजगारीचा दर सुमारे २.२ टक्के इतका स्थिर राहिला. रोजगार बाजारपेठेच्या संदर्भात जागतिक आर्थिक मंदीमुळे भारताने कसलाही विपरीत परिणाम दाखवला नाही (स्थिती स्थापकत्व). तरीसुद्धा, भारताला लोकसांख्यिकीय लाभांश असल्याने त्याचा लाभ तरुण वर्गाला उत्पादक क्षेत्रात संघटीत करण्यासाठी करून घेण्याची गरज आहे. कारण एनएसएस अंदाजानुसार तरुणांमधील बेरोजगारी ६ टक्क्यांच्या आसपास फिरत आहे.

वरील पार्श्वभूमीवर, भारत सरकार रोजगार समृद्ध विकासाला प्रोत्साहन, सामाजिक सुरक्षा उपायांची व्याप्ती वाढवणे, कामगार सुधारणा आदी बहुआयामी हस्तक्षेप करून कामगार बाजारपेठेतील स्थिती सुधारण्यावर जोरदार भर देत आहे. वरीलपैकी काही उपायांचे वर्णन खाली दिलेले आहे.

### उद्योगांत खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन

अलीकडच्या काही वर्षांत, मेक इन इंडिया, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया, राष्ट्रीय उत्पादन धोरण २०१५, इज ऑफ डुईंग बिझनेस, अटल नवोन्मेष योजना, १०० स्मार्ट शहरे आणि ५०० अमृत शहर प्रकल्प, स्टार्ट अप इंडिया आणि स्टँड अप इंडिया या योजनाभोवती एक धोरणात्मक पर्यावरण विकसित करण्यात आले आहे. हे उपाय रोजगार निर्मितीच्या वेगाला चालना देण्यासाठी पायाभरणी करत आहेत. रोजगार निर्मितीसाठी जे धोरणात्मक पर्यावरण तयार केले आहे त्याला दोन बाजू आहेत, पुरवठा आणि मागणी बाजू. मागणीच्या बाजूला चालना मुख्यत:

मेक इन इंडिया आणि राष्ट्रीय उत्पादन धोरण या उपायांमुळे दिली जाईल आणि स्मार्ट शहरे प्रकल्प, डिजिटल इंडिया, स्टार्ट अप आणि स्टँड अप इंडिया अशा उपायांमुळे त्यांना समर्थन मिळेल. कृषी आधारित उद्योग, वस्त्रोद्योग आणि चामड्यासारखे कामगार बहुल उद्योग, शिक्षण आणि आरोग्य आदी मध्ये सार्वजनिक गुंतवणूक वाढवणे यातून मागणीची बाजू आणखी सुदृढ करता येऊ शकते.

### कामगार वर्गाच्या कौशल्याचा पाया वाढवणे

कामगार वर्गाच्या कौशल्याचा पाया समन्वयीत पद्धतीने वाढवण्यावर भर देण्यासाठी सरकारने राष्ट्रीय कौशल्य विकास मोहीम सुरु केली असून कौशल्य विकास आणि व्यावसायिकता मंत्रालय स्थापन केले आहे. १२६ प्रकारांमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण (टीव्हीइटी) देण्याकरता १२ हजार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून (आयटीआय) दिले जात आहे. ज्यांची आसन क्षमता १० लाख ७१ हजार आहे. तांत्रिक आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. उमेदवारी प्रशिक्षणाची व्याप्ती लक्षणीय रित्या वाढवण्यात आली आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास आणि व्यावसायिकता मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था (एनएसडीए) सरकारतर्फे सुरु असलेल्या कौशल्य विकास प्रयत्नांचा समन्वय आणि सांगड घालण्याचे काम करते. कुशल कामगारांची मागणी आणि पुरवठा यातील असंतुलन दूर करण्यासाठी मागणी श्रेणीबद्ध कौशल्य विकास करण्यावर भर दिला जात आहे.

### बिनशेती रोजगार संधी वाढवणे

ग्रामीण कामगार वर्गाला कौशल्य प्रदान करण्यासाठी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा मोहीम, राष्ट्रीय कृषी विकास योजना (आरकेव्हीवाय), सानुकूल नोकरी केंद्रे, कृषी चिकित्सालय आणि कृषी उद्योग केंद्रे स्थापित करणे, लघु शेतकरी कृषी व्यवसाय सहाय्यता संघ (एसएफएसी), राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी), महिला सहकारी संस्थांचा विकास असे कार्यक्रम सुरु करण्यात आले आहेत.

---

**विशेषत: गरीब आणि वंचित कामगारांवर लक्ष केंद्रित करून सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा व्यवस्था तयार करण्याच्या दिशेने सरकारने विमा आणि पेन्शन क्षेत्राशी संबंधित तीन सामाजिक सुरक्षा योजना जाहीर केल्या असून प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पीएमएसबीवाय) आणि अटल पेन्शन योजना (एपीवाय) अशी त्यांची नावे आहेत. या योजना अत्यावश्यक आणि परवडणारे सामाजिक संरक्षण सर्व नागरिकांना सुविधाजनक पद्धतीने पुरवतात**

---

### सार्वजनिक रोजगार सेवेचे आधुनिकीकरण (पीइएस)

रोजगार सेवेचा दर्जा आणि वितरण सुधारून रोजगार सेवेत संक्रमण घडवून आणण्याच्या उद्देश्याने राष्ट्रीय करियर सेवा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. www.ncs.gov.in हे नवे राष्ट्रीय पोर्टल विकसित करण्यात आले असून रोजगार मिळवू पाहणारे, मालक आणि प्रशिक्षण देणारे यांना एकाच सामायिक व्यासपीठावर आणले जाते. हे पोर्टल सुयोग्य नोकऱ्या उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाईन नोकऱ्यांची माहिती, रोजगार मेळाव्यांची माहिती आणि प्रशिक्षण तसेच फेर कौशल्याच्या संधी यांची माहिती पुरवण्याचे काम करते.

### कामगार कायद्यात सुधारणा

कामगार सुधारणांच्या व्यापक उद्दिष्टांमध्ये कामगार कायद्यांमधील अनिश्चितता आणि गुंतागुंत कमी करणे, कामगार हक्कांसाठी एक मजबूत आणि सर्वसमावेशक भूमी तयार करणे, सुशासनासाठी तंटे सोडवण्याची आणि निर्णय अमलात आणण्याची यंत्रणा आधुनिक करणे यांचा समावेश आहे. सध्याचे कामगार कायदे व्यावहारिक उपयोग लक्षात घेऊन कामगार संहितांमध्ये वर्गीकृत केले आहेत. वेतन, औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा आणि कल्याण तसेच सुरक्षा आणि कामाचे वातावरण यावरील चार कामगार संहितांचा मसुदा केंद्रीय कामगार कायद्यातील महत्वाच्या तरतुदी सुटसुटीत, एकत्रीकरण आणि सुसूत्रीकरण करून तयार केला जात आहे.

### महिला कामगारांचा सहभाग वाढवणे

रोजगार बाजारपेठेबाबत एक चिंतेचा मुद्दा म्हणजे कमी होत चाललेला महिला कामगारांचा सहभाग हा असून त्यावर विचार करण्यासाठी धोरण विकसित करण्याची गरज आहे. कामगार वर्गातील प्रमाण २००४-०५ मध्ये ४३ टक्क्यांवरून २०११-१२ मध्ये ३९.५ टक्के इतके घसरले. याच कालावधीत महिला सहभागाचे प्रमाण २९ टक्क्यावरून २२.५ टक्क्यावर उतरले असून हा चिंतेचा विषय आहे. सरकारने महिलांचा कामगार वर्गातील सहभाग वाढावा, यासाठी मनरेगा, कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण अशी अनेक पावले उचलली आहेत. सरकारी महिला कर्मचाऱ्यांना मुलांचे संगोपन करण्यासाठी सरकारने नियमांत सुधारणा करून दोन वर्षांची प्रसूती रजा मंजूर केली आहे. कौटुंबिक

जबादाऱ्यांमुळे प्रचंड क्षमता असूनही ज्या महिला कर्मचाऱ्यांनी खासगी नोकऱ्या सोडल्या, त्यांनी पुन्हा नोकरीत यावे म्हणून खासगी क्षेत्रानेही विविध कार्यक्रम सुरु केले आहेत.

५२ टक्क्याहून अधिक लोक स्वयं रोजगारात गुंतलेले असून त्यातील महिला कामगार मूलत: गृहिणी आहेत. महिला कामगारांचा सहभाग वाढवण्यासाठी लक्ष्यीत धोरणे आखण्यावर भर देण्याची गरज आहे.

**अनौपचारिक क्षेत्र मुख्य प्रवाहात आणणे**

अनौपचारिक क्षेत्राचा विशाल आकार पाहता अनौपचारिक क्षेत्राचे औपचारिक क्षेत्रात रुपांतर करण्याची प्रक्रिया समजून घेण्याची गरज आहे. प्रथम क्षेत्र निश्चित करून (अवशिष्ट नव्हे) त्यातील कामगार वर्गाचे कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी लक्ष्यीत धोरणांची चौकट तयार केली जात आहे. उमेदवारी योजनेची व्याप्ती वाढवून त्यात लघु आणि मध्यम व्यवसायांचा समावेश करणे हे एक या दिशेने पाऊल आहे. सामाजिक सुरक्षा लाभांचा समावेश वाढवणे हे दुसरे पाऊल आहे.

विशेषत: गरीब आणि वंचित कामगारांवर लक्ष केंद्रित करून सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा व्यवस्था तयार करण्याच्या दिशेने सरकारने विमा आणि पेन्शन क्षेत्राशी संबंधित तीन सामाजिक सुरक्षा योजना जाहीर केल्या असून प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पीएमएसबीवाय) आणि अटल पेन्शन योजना (एपीवाय) अशी त्यांची नावे आहेत. या योजना अत्यावश्यक आणि परवडणारे सामाजिक संरक्षण सर्व नागरिकांना सुविधाजनक पद्धतीने पुरवतात ज्या बँक खात्यांतून ऑटो डेबिट सुविधेशी जोडल्या गेल्या आहेत. या योजनांमुळे जीवन आणि अपघात विमा कवचामध्ये थोड्याच लोकांचा समावेश आणि वृद्धपणी उत्पन्नाची कमी सुरक्षा हे दोन मुद्दे सुटण्याची अपेक्षा आहे. सध्याच्या योजनांची व्याप्ती वैद्यकीय विमा (इएसआयएस) आणि भविष्य निर्वाह निधी/पेन्शन (इपीएफओ) वाढवण्यात येत असून त्यात बांधकाम मजूर, कंत्राटी कर्मचारी अशा असंघटीत क्षेत्रांना समाविष्ट करण्यात येत आहे.

इपीएफओकडून मिळालेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०१७ ते जून २०१८ या कालावधीत दर महिन्याला ८,६०० आस्थापनांची नव्याने नोंदणी करण्यात आली असून प्रत्येक महिन्याला याच कालावधीत ८५,००० नवे कर्मचारी या आस्थापनांमध्ये सामील झाले. सप्टेंबर २०१७ ते मार्च २०१८ या काळात एकंदरीत १० लाख नवीन युएएन क्रमांक असलेले कर्मचारी इपीएफओ व्यवस्थेत दर महिन्याला जोडले गेले. या आकडेवारीबाबत मर्यादा लक्षात घेऊनही कामगार वर्ग औपचारिक क्षेत्राकडे नेण्याच्या दृष्टीने हे एक अत्यंत महत्वाचे पाऊल आहे.

**सक्रीय कामगार बाजारपेठीय धोरणे (एएलएमपीएस)**

एक क्षेत्र ज्याकडे मोठ्या प्रमाणात लक्ष देणे आवश्यक आहे ते म्हणजे सक्रीय कामगार बाजारपेठीय धोरणांना (एएलएमपीएस) वित्त पुरवठा आणि त्यांची अंमलबजावणी करणे ज्याचा आवाका सार्वजनिक रोजगार सेवांना पाठींबा, स्वयं रोजगार, प्रशिक्षण कार्यक्रम, सार्वजनिक बांधकाम आणि/किंवा रोजगार हमी योजना, वेतन अनुदान आणि अशा अनेक कार्यक्रमांना समर्थन देण्यसाठी निधी पुरवणे इतका विशाल आहे. कौशल्यातील विसंगती, अपुरी कामगार मागणी आणि अशा अनेक विशिष्ट रोजगारातील आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी त्यांची सैद्धांतिक रचना केली आहे.

सक्रीय कामगार बाजारपेठ धोरणांना (एएलएमपीएस) पुरेसे अर्थसंकल्पीय स्त्रोत वाटप करणे हे इच्छित असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे, कारण त्यामुळे रोजगाराबाबत इच्छित परिणामांत सुधारणा होऊ शकते, असे अभ्यासांतून असे निदर्शनास आले आहे. १

| रोजगारातील अडथळे | एएलएमपीएसचा प्रकार | कार्यक्रमाचा उद्देश |
|---|---|---|
| कौशल्यातील विसंगती | प्रशिक्षण (प्रत्यक्ष कामावर, वर्गात) | रोजगारक्षमता वाढवणे |
| माहितीतील विषमता | मध्यस्थ सेवा, रोजगार शोधासाठी सहाय्य, समुपदेशन | रोजगार क्षमता वाढवणे, रोजगार निर्मितीला चालना |
| कामगारांबाबत अपुरी मागणी | वेतन अनुदान, सार्वजनिक बांधकाम कार्यक्रम, रोजगार हमी योजना, स्वयंरोजगार, कामाचे सामायीकरण | रोजगार निर्मितीला चालना |

**टेबल १ : सक्रीय कामगार बाजारपेठीय धोरणे (एएलएमपीएस)-वर्गीकरण**

स्त्रोत : अँजेल-उर्दीनोला, डी एफ आणि लिओन सोलॅनो, आर इ (२०१३) : एएलएमपीएसचे मेना भागातील वितरण सुधारण्यासाठी सुधारणा अजेंडा. आय झेड ए लेबर पॉलिसी जर्नल, २:१३

२००० च्या दशकातील अंदाजावरून असे दिसते की, उभरत्या अर्थव्यवस्थांप्रमाणे ब्रिक्स देश साधारणपणे एएलएमपीएससाठी माफक निधी वाटप करतात. एएलएमपीएससाठी निधी देताना बेछुटपणे केला जाणार नाही याची काळजी घ्यावी लागेल, कारण अनेक मुल्यांकनांवरून असे स्पष्ट झाले आहे की, एएलएमपीएसची परिणामकारकता कोणत्या प्रकारचा उपाय केला जातो आणि एखाद्या देशातील विशिष्ट आर्थिक परिस्थिती कशी आहे, यावर अवलंबून असते. उदाहरणार्थ, एका अभ्यासात विकसित, विकसनशील आणि संक्रमण अर्थव्यवस्थांचा १५२ परिणामांच्या मुल्यांकनांचा समावेश असून त्यांनी खालील निष्कर्ष काढले आहेत.

- रोजगार सेवा आणि कौशल्य प्रशिक्षण यांचा सर्वाधिक सकारात्मक परिमाण रोजगार शक्यता आणि उत्पन्नावर झाला होता.
- सार्वजनिक रोजगार कार्यक्रमाचे निकाल सर्व देशांतून संमिश्र आले होते.
- वेतन आणि रोजगार अनुदान सहसा नकारात्मक होते
- स्वयं रोजगार/लघु उद्योग सहाय्य कार्यक्रम यांच्याशी संबंधित विश्वासार्ह निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा पुरावा नाही

अशा तऱ्हेने, धोरणाची रचना करताना पुरावा आधारित भूमिका तयार करण्यासाठी परिणाम मुल्यांकन हाती घेणे महत्वाचे आहे.

**समारोप**

जोरदार लोकसंख्या लाभांश असलेल्या भारतासारख्या विशाल देशात, प्रशासकीय आकडेवारीला नियमित पाहणीची जोड देऊन रोजगार उपाययोजना करणे महत्वाचे आहे. कर्मचारी भविष्य निधी संघटना (इपीएफओ), कर्मचारी राज्य विमा महामंडळ (इएसआयसी) आणि राष्ट्रीय पेन्शन स्कीम (एनपीएस) अशा प्रशासकीय स्त्रोतांपासून माहिती मिळवून या योजनांच्या लाभार्थीची जे औपचारिक कर्मचारी म्हणून समजता येतील अशांची संख्या नेमकी किती आहे, याची माहिती करून घेऊन सुरुवात करण्यात आली आहे. एनएनएसओकडून वार्षिक आधारावर केल्या जात असलेल्या नियमित कामगार वर्ग पाहणीतून रोजगार रचनेतील बदलांची चांगली कल्पना येते.

आर्थिक विकासाचे रुपांतर कामगार वर्गाला वाढत्या आणि उत्तम रोजगार मिळण्यात होण्यासाठी धोरणे विकसित केली पाहिजेत. इपीएफओ आणि इएसआयसीची व्याप्ती इतर क्षेत्रापर्यंत विस्तारणे आणि प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना सारख्या योजना यामुळे अर्थव्यवस्थेचे औपचारीकीकरण आणि कामगार बाजारपेठेचे संक्रमण यास प्रोत्साहन मिळेल. महिलांना रोजगारांची संधी आणि बाहेर किंवा घरात त्यांचा पगारी कामात सहभाग महिलांचा कामगार वर्गातील सहभाग वाढवण्यात योगदान देईल, वेतन सुरक्षा, रोजगार सुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा देत असतानाच औद्योगिक सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी सक्षम वातावरण तयार करणे महत्वाचे आहे. बदलते संदर्भ आणि कामाची रूपे (निश्चित मुदतीचा रोजगार) सुनिश्चित करून त्यांना विशिष्ट स्वरूप दिल्याने रोजगार बाजारपेठ मजबूत करण्यात सहाय्य करेल. रोजगार निर्मितीतील आव्हाने परतवून लावण्यासाठी आणखी एक पाऊल नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास प्रोत्साहन देण्याचे ठरेल. रोजगार बाजारपेठेसाठी डेटा गोळा करण्याच्या व्यवस्था सशक्त करणे आणि पुराव्यावर आधारित विश्लेषण आणि संशोधन करणे हे अशा प्रकारे महत्वाचे आहे.

■■■

*लेखक केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मध्यवर्ती सांख्यिकी कार्यालयात अतिरिक्त महासंचालक आहेत.*

*ई मेल: pravin.srivastava@nic.in*

**सुवर्णसंधी!**

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com

Government of India

# बदलते जीवन आश्वासक विकास



देशात वाढत जाणारा विश्वास ...

सही नीयत
सही विकास

देशातील सर्व खेडयांमध्ये वीज पोहचली
आता ४ कोटी घरांमध्ये वीज पोहचवणार

उज्जवला योजनेअंतर्गत ५ कोटी
कुटुंबांना गॅस सिलिंडर

जन धन ते जन सुरक्षा :
गरीबांना बँकेत खाते आणि
विम्याचे कवच मिळाले

स्वच्छ भारत योजनेअंतर्गत सुमारे ७ कोटी
२५ लाखांपेक्षा जास्त शौचालयांचे बांधकाम

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत
सुमारे १ कोटी कुटुंबांना घर मिळाले



DAVP22112/13/0002/1819

For more details visit 48months.mygov.in

Published Date: 12th September, 2018
Date of Posting : 16th September, 2018

RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. NMB/137/2016-18



Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout**, Director General, on behalf of Published Division and
Printed at Onlooker Press, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939 Published at - B-701, Kendriya Sadan,
C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400614. Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai - 400 001.